आजचें जग पुस्तकमाला

पुस्तक ३ रें

# विवाहसंस्थेचा इतिहास

087455

लेखक

डॉ. वा. का. किर्लोस्कर

एल. एम्. एस्.

सोल एजंटः

चिटणिस, समर्थ वाङ्मय-प्रसारक मंडळी, पुणें नं. २.

इ. स. १९३७ ] [ किंमत ५ आणे.

प्रकाशक—
श्री. मा. स. कुलकर्णी,
न्यू. पूना बुक डेपो,
अप्पा बळवंत, चौक पुणें २.

मुद्रक—
किर्लोस्कर प्रेस,
किर्लोस्करवाडी.

सहकारी तत्त्वांवर ग्रंथप्रकाशन
व प्रसार करणारी संस्था.
समर्थ वाङ्मय-प्रसारक मंडळी,
पुणें नं. २.

१८
४३४

[ पुस्तकमालेसंबंधीं जास्त माहितीसाठीं न्यू पूना बुक डेपो, अप्पा बळवंत चौक, पुणें २, या पत्त्यावर लिहा. ]

[stamp]

# प्रस्तावना

—×—

“आजचें जग” पुस्तकमालेचें तिसरें पुस्तक “विवाह-संस्थेचा इतिहास” हें आम्ही वाचकांच्या हातीं देत आहोंत. लोकप्रिय “स्त्री” मासिकाच्या वाचकांना ह्या पुस्तकांतील मजकूर, ‘स्त्रियांनो, चाललां आहांत कोठें ?’ या लेखमालेच्या रूपानें वाचावयास मिळालेला आहेच, व त्यांना प्रस्तुत पुस्तकाबद्दल तितकेंसें औत्सुक्य वाटणार नाहीं, हें साहजिक आहे. परंतु बहुसंख्य मराठी वाचकांना एका जिव्हाळ्याच्या विषयावर लिहिलें गेलेलें हें पुस्तक, उपयोगी व महत्वाचें वाटेल, अशी आम्हांस खात्री आहे.

विवाहसंस्थेसंबंधीं जितकी चर्चा आज महाराष्ट्रांत चालली आहे, तितकी दुसऱ्या कोणच्याहि सामाजिक विषयावर चाललेली नाहीं, असें म्हणावयास हरकत नाहीं. नवमतवादी व सनातनी यांचे राजकीय चर्चेतहि खटके उडतात, ते मुख्यतः या विषयावरच. त्याच-प्रमाणें फॅसिझम चांगला कीं कम्युनिझम चांगला, हें ठरवितांनाहि वैवाहिक नीतीचा प्रश्न थोडासा आगंतुकपणानें पुढें येतो. रशि-यांत घटस्फोटाची सुलभता आहे, त्या अर्थीं कम्युनिझमच्या मार्गानें व तत्त्वज्ञानाप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध टक्कर घेणें हिंदी लोकांच्या जीवनाला व संस्कृतीला विघातक आहे, अशा तऱ्हेची विचारसरणी प्रदर्शित केली जात आहे. उलट, नवमतवादाच्या कित्येक पुरस्कर्त्यांकडून वैयक्तिक सुखवादाचें तत्त्व पुढें मांडलें जात आहे. परंतु विवाहसंस्था व लैंगिक नीति या बाबतींत माजलेल्या

या कोलाहलामध्यें जर कोणत्या एका गोष्टीची उणीव भासत असेल तर ती या गोष्टीची, कीं **मनुष्यजातीच्या प्रत्यक्ष सामाजिक उत्क्रांतीमध्यें** लैंगिक व्यवहाराचीं कोणकोणचीं स्वरूपें होतीं व त्या स्वरूपांत कोणकोणचीं स्थित्यंतरें होत गेलीं, याची माहिती मात्र मतप्रचारकांना नसते व बहुसंख्य जनतेला तर नसतेच नसते.

ही माहिती जनतेला मिळावी, या दृष्टीनें प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे. प्रख्यात कम्युनिस्ट तत्त्वज्ञ फ्रेड्रिक एंजल्स यांनीं "कुटुंबसंस्था, खासगी मालमत्ता व शासनसंस्था" या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे, आणि त्या ग्रंथाच्या आधारानेंच प्रस्तुत पुस्तकहि तयार करण्यांत आलें आहे. प्रस्तुत पुस्तकांत वैवाहिक नीतीच्या कल्पना मनुष्याच्या रानटी अवस्थेपासून आजपर्यंत कशा बदलत आल्या आहेत, याचें साधार वर्णन केलें आहे, व त्यामुळें वाचकांना लैंगिक नीतीच्या प्रश्नाकडे उदारपणें व शास्त्रशुद्ध दृष्टीनें पहाण्याची शक्यता येईल. अनेक पूर्वग्रहांचें निराकरण करणारी माहिती या पुस्तकांत कोणाहि जिज्ञासु वाचकाला मिळूं शकेल.

या पुस्तकाचा जो विशेष आहे, तो मात्र लेखकाच्या वैयक्तिक खंबीर आशावादांत आहे. स्त्रीजातीला पुरुषवर्गानें गुलाम बनवून ठेवलें आहे, ही गोष्ट ऐतिहासिक दृष्टीनें दाखवून दिल्यामुळें समान हक्कांसाठीं चाललेली स्त्रियांची चळवळ किती न्याय्य व आवश्यक आहे, हें डॉक्टर किर्लोस्कर यांनीं उत्तम तऱ्हेनें दाखवून दिलें आहे. पण एवढ्यावरच ते थांबलेले नाहींत, तर समान हक्कांसाठीं बंडाचा झेंडा उभारणाऱ्या स्त्रीजातीला खरे समानहक्क, खरें एकनिष्ठ प्रेम व खरें सुखी मातृत्व यांचा लाभ केव्हां व कोणच्या सामाजिक परिस्थितींत होईल हें त्यांनीं मोठ्या खंबीरपणानें, विस्तारानें व पटेल अशा तऱ्हेनें समजावून दिलेलें आहे. आदर्श वैवाहिक जीवन हें, स्वैरा-

चार किंवा आर्थिक विषमतेमुळें उत्पन्न होणारा, उघड किंवा अंगवळणीं पडलेला प्रच्छन्न बलात्कार होत आहे तोंपर्यंत, कोणाहि व्यक्तीला मिळवितां येणार नाहीं. आदर्श वैवाहिक जीवन हें एकनिष्ठ व प्रेमनिष्ठ स्त्रीपुरुषसंबंधांत आहे. असें जीवन बहुजनसमाजाला लाभण्यासाठीं सामाजिक क्रान्ति झाली पाहिजे, व सामुदायिक मालकीचें व व्यवहाराचें तत्त्व अमलांत आलें पाहिजे, इत्यादि सिद्धान्त डॉक्टर किर्लोस्कर यांनीं मांडले आहेत. हे सिद्धान्त कोणाला पटोत वा न पटोत, पण एक गोष्ट मात्र सिद्ध आहे कीं, " विवाह-संस्था पवित्र आहे! सनातन आहे! अविनाशी आहे!" असें नुसतेंच ओरडून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करणें शक्य नाहीं, इष्ट नाहीं व न्याय्य नाहीं, ही गोष्ट लेखकांनीं निर्विवादपणें मांडली आहे. त्यांच्या सर्व लिखाणाचें जर कांहीं सार असेल तर तें हेंच, कीं वैवाहिक नीतीचा किंवा लैंगिक नीतीचा कोणचाहि लहानमोठा प्रश्न बहुजनसमाजाच्या दृष्टीनें सोडविणें इष्ट आहे, त्यासाठीं समतेच्या तत्त्वावर क्रान्ति होणें जरूर आहे. दुसरा मार्ग कोणचा असेल तर तो पुढें येऊन दाखवा, असें त्यांचें आव्हान आहे.

महाराष्ट्रांतील सर्व तऱ्हेच्या विचारसरणीच्या वाचकवर्गास या लहानशा पुस्तकाची अल्पस्वल्प मदत होईल, अशी आशा प्रगट करून ही प्रस्तावना पुरी करतों.

दि. के. बेडेकर.

# विषयप्रवेश

जगाच्या प्रभातकालीं स्त्री व पुरुष या जोडीचा प्रवेश समानतेनें झाला. पुरुष नागडधाउघडच्या स्थितींत शिकार करीत जंगलांतून भटकत होता. स्त्री ही पुरुषाच्या पावलावर पाऊल टाकून जोडीनें चालत होती. पोषणाकरितां जंगलांतील कंदमुळें गोळा करावीं व पुरुषानें आणलेल्या शिकारीचें अन्न तयार करावें, हीं तिचीं कामें असत. याप्रमाणें जंगली स्थितींत हीं दोघें जोडीनें श्रम करीत व समानतेच्या भावनेनें संतुष्ट असत.

असें होतां होतां परिस्थितींत बदल होऊन अशी वेळ आली कीं, हा भटकेपणा जाऊन अशीं अनेक जोडपीं एके ठिकाणीं तळ देऊन राहूं लागलीं. तेथेंहि स्त्रीपुरुषांस हातांत हात घालून जीवनयात्रा सामायिक भावनेनें चालवावी लागली. तीरकमठा घेऊन शिकारीस अगर युद्धास जावें व त्या कामीं लागणारीं आयुधें तयार करावीं, हीं पुरुषांचीं कामें असत. गृहांतील कामें करणें, झोंपडीची पडझड दुरुस्त करणें, थापटून मडकीं करणें, आजूबाजूस उगवणाऱ्या वनस्पतींचा औषधाच्या कामीं उपयोग करणें, त्या वेळचीं वेडींवांकडीं धर्मकृत्यें करणें, हीं कामें स्त्रियांकडे असत. शिवाय स्त्रीस मानववंशाचा विस्तार करणें, आपल्या स्तनपानावर त्याचें पोषण करणें, त्यास थंडीवाऱ्यापासून जपणें, इत्यादि जिव्हाळ्याचीं कामेंहि अर्थात् करावीं लागत. हीं कामें एकपरीं पुरुषांपेक्षांहि कष्टाचीं, खडतर व जोखमीचीं असत. परंतु, बिचारीनें तीं सर्व निमूटपणें पण खुषीनें व समाधानानें अंगावर घेतलीं. कारण तिला पक्कें माहीत

होतें की, हीं सामाजिक कामें करण्याची जबाबदारी आपल्यावरच आहे. अशा प्रकारें पुरुष व स्त्रिया गुण्यागोविंदानें आयुष्य कंठीत.

युगाचीं युगें अशा परिस्थितींत निघून गेलीं. या दीर्घ अवधींत मिळालेल्या अनुभवाचा उपयोग करून मनुष्यानें रानटी स्थितींतच आपल्या उपजीविकेचीं साधनें वाढविलीं. यापूर्वी त्यांस आपल्या उपजीविकेकरितां मुख्यत्वेंकरून निसर्गात आयत्या मिळणाऱ्या जिनसांवर अवलंबून रहावें लागत असे. परंतु आतां त्यानें कृषिविद्या संपादन केली, जंगली जनावरें पाळून त्यांचे कळप बनविले. त्यामुळें अन्नपुरवठा करण्याचें पुरुषाचें काम कमी कष्टाचें होऊं लागलें, त्यास थोडी फुरसत मिळूं लागली. रोजच्या खर्चास पुरून अन्न शिल्लक पडूं लागलें व त्याचा संचित धनाप्रमाणें पुरुषांस उपयोग होऊं लागला. परंतु स्त्रियांचे कौटुंबिक काबाडकष्ट मात्र कमी झाले नाहींत. उलट पुरुषांच्या हातीं खेळूं लागलेल्या गोधनासारख्या संपत्तीच्या जोरावर त्यांच्या वर्चस्वाखालीं स्त्रियांस थोडा मिंधेपणा पतकरावा लागला. शिवाय स्त्रियांचें मोकळ्या हवेंतील काम कमी होऊन त्यांचें पाऊल घरांतच जास्त राहूं लागलें. तथापि स्त्रियांकडे अद्यापि बरीच सामाजिक कामगिरी असल्यामुळें या वर्चस्वाचें स्त्रियांस फारसें कांहीं वाटलें नाहीं.

कंदमुळें गोळा करण्याच्या कामांतून स्त्रियांना जरी मोकळीक मिळाली होती, तथापि टोळीकरितां अन्न शिजवून तयार करणें हें स्त्रियांचेंच काम होतें. त्यांना जरी कापूस अगर ताग पिकवावा लागत नसे, तरी सूत कांतणें व सर्वांकरितां कापड विणणें हीं कामें त्यांच्याकडेच होतीं. त्यांना जरी घरें बांधावीं लागत नसत, तरी घरांतील व्यवस्था व नीटनेटकेपणा त्यांनाच ठेवावा लागत

नगर वाचनालय, सातारा



असे. नवीन औषधें व इतर उपयुक्त वनस्पतींचा शोध लावून त्यांचा उपयोग करणें, हीं कामेंहि स्त्रियांचींच असत. टोळींतील मुलें तिच्याच अंगाखांद्यांवर खेळत व त्यांच्या बाललीलांचा उपभोग घेत त्यांना लहानाचें मोठें करण्याची सामाजिक जबाबदारीहि त्याजवरच असे; व घराच्या आंत दिवस कंठावे लागत असले, तरी पुरुषांच्या बरोबरीचा सामाजिक दर्जा स्त्रियांनीं गमाविला नव्हता.

यावरून सहज लक्षांत येईल कीं, फार पुरातन काळीं स्त्री-पुरुषांतील सामाजिक विषमतेचें व वर्गविषमतेचें बीज त्या वेळीं रुजलेलें नव्हतें. या वेळपावेतों स्त्रीपुरुषांतील व्यवहारास वैवाहिक स्वरूप आलें नव्हतें. वंशपरंपरा ही मातृक म्हणजे मातेकडून धरली जात असे. प्रत्येक व्यक्तीस आपला बाप कोण, हें नक्की समजण्याचें साधन नव्हतें; पण आपली आई कोण, याची जाणीव अर्थातच असे. त्यामुळें गृहांत मातेचा मान व वर्चस्व कायम होतें. त्यामुळें टोळीच्या कारभारी मंडळांत तिला योग्य स्थान मिळालें होतें. प्रत्यक्ष युद्धाचें क्षेत्र सोडून इतर सर्व सामाजिक व्यवस्थेच्या मसलतींत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा व अधिकार असत. परंतु अत्यंत दुःखाची गोष्ट अशी आहे कीं, या वेळेनंतर पुढें लगेच त्यांचा सामाजिक दर्जा नष्ट होऊन तिची मूक कुचंबणा, मानहानि व परावलंबित्व हीं कळसास पोंचलीं ! !

या सर्व अनर्थाचें मूळ कारण पुरातन काळच्या साध्या रहाणींत अस्तित्वांतच नव्हतें. त्याचा उगम त्यानंतरच्या काळांत झाला. शतकानुशतकें, वर्षानुवर्षें, महिन्यामहिन्याला, किंबहुना घटकोघटकीं पुरुषांची खासगी मालमत्तेची हांव हळुहळू पायरीपायरीनें बळावत गेली. त्यापायींच सहकारिणी, सहचारिणी, सहाधिकारिणी या उंच पदांवरून भ्रष्ट होऊन, स्त्रीची सामाजिक उपयुक्तता, तिची सामाजिक

जबाबदारी, तिचीं सामाजिक कर्तव्यें, सारांश, तिचा सामाजिक दर्जा हळुहळु शून्य अंशावर येऊन ठेपला. जें हातीं येईल तें बळकाविण्याची पुरुषांची खोड इतकी बळावली कीं, त्यानें आपल्याच सहचारिणीला, अर्धांगीला अत्यंत हीन स्थितीला आणून पोंचविलें. कविवर्य तांबे म्हणतात, त्याप्रमाणें 'भयचकित नमावें तुज रमणी। जन कसे तुडविती तुज चरणीं॥' असे उद्गार काढावे लागले. पुरुषानें तिला केवळ घरकामांत राबणारी मोलकरीण, संतति निर्माण करणारें एक यंत्र, आपल्या वासनेचें खेळणें बनविलें आहे.

प्रचलित काळीं धनसत्तेची वाढ होण्यापूर्वी पुरुषांची स्वार्थपरायणता इतक्या पराकोटीस गेली नव्हती. पुराणांतरीं जगाच्या घडामोडीस आधारभूत अशा शक्तीस आदिमाया, आदिशक्ति अशीं स्त्रीवाचक नांवेंच दिलीं होतीं. मानवी कुटुंबांत वंशवृद्धि व सुधारणा करण्यांत मातेचें महत्व लक्षांत आणून त्याची उत्पत्तिस्थिति यांसहि कारण एखादी आदिमाताच असली पाहिजे, अशी ही कल्पना बसविली आहे. जगाच्या व्यवहारांत अत्यंत लोभनीय अशा तीन गोष्टी आहेत, त्या म्हणजे सत्ता, संपदा व संस्कृति या होत. सत्तेची प्रतिनिधि महामाया पार्वती, धनसंपत्तीची प्रतिनिधि लक्ष्मी, विद्या व संस्कृतीची प्रतिनिधि सरस्वती अशा या त्रिमूर्तींच्या कल्पनेस स्त्रीरूपच देण्यांत आलें आहे. परंतु स्त्रीसंबंधीं या कृतज्ञता व आदरनिदर्शक भव्य व उदार कल्पना पुराणांत राहून गेल्या. प्रत्यक्ष जगाचा खडतर अनुभव असा आहे कीं, धनसत्तेची एक एक पायरी जसजसा मनुष्य समाज काबीज करीत चालला, तसतसें स्त्रीजीवनांतील सामाजिक महत्व खालच्या पायरीवर उतरत गेलें. पुरुषांच्या भाग्यांत ज्या ज्या वेळीं भर पडत गेली, त्या त्या वेळीं स्त्रीच्या प्रेमी, निःस्वार्थी अंतःकरणाची

गळचेपी व तिच्या मानमान्यतेची छाटाछाट होत गेली. पुरुषांची क्रमाक्रमानें अशी दृढ समजूत होत गेली कीं, स्त्रीचें जिणें हें केवळ पुरुषांची सेवाचाकरी करण्याकरितांच आहे; पुरुषांच्या सुखाकरितां स्त्रीनें आपलें शरीर व मन अर्पण करणें, हेंच तिचें कर्तव्य आहे. बाहेरच्या खुल्या वातावरणांतून हळुहळु रेटीत रेटीत पुरुषानें स्त्रीस स्वयंपाकघराच्या धुरांत व जनानखान्याच्या अंधःकारांत आणून सोडलें आहे. परंतु या उद्वेगजनक स्थित्यंतराला बिचारीनें आजपर्यंत मुकाट्यानें मान दिली आहे व दुःखित अंतःकरणानें प्राप्त स्थितींतच ती राबत आहे. पण यामुळें झालें आहे काय कीं, तिनें आपलें शरीर व मन आजन्म गुलामगिरींत लोटून दिलें आहे.

आपला सारा जन्म न कुरकुरतां अत्यंत सहनशील वृत्तीनें, अंतःकरणांतील प्रेम अंतःकरणांतच ठेवून समर्पण बुद्धीनें ती घालवीत आहे. तिचें बुद्धिवैभव धूळ खात पडलें आहे. तिच्या चारित्र्याचें सौंदर्य नष्ट होऊन त्यावर काळोखी आली आहे. मानवी जीविताचें विशाल व सुंदर स्वरूप तिच्या दृष्टीआड होऊन तिचें खुरटलेलें मन अनेक अज्ञानी व खोट्यानाट्या कल्पनांनीं विकृत झालें आहे. अशा हीन परिस्थितींत झांपड लावलेल्या जनावराप्रमाणें ती संसाराचा गाडा रेटीत आहे व मानवी जीवनांतील अत्यंत जिव्हाळ्याचें व कष्टतर असें जें बाळंतपण तें ती सहन करीत आहे. पुरुषांकडून या मातृपदासारख्या पवित्र कर्तव्याबद्दल तिचें कोडकौतुक तर राहोच, पण केवळ पोटीं जन्मलेल्या मुलाच्या कल्याणाकरितां आपलें सर्वस्व अर्पण करण्यास तयार असलेल्या मातेच्या कष्टाकडे, संकटाकडे व स्वार्थत्यागाकडे पुरुषांचें लक्षहि असत नाहीं. या प्रकारें स्वतःचें शरीरस्वास्थ्य व स्वतःची आत्मोन्नति हीं कस्पटाप्रमाणें मानून ती दिवस कंठीत आहे. उच्च सामाजिक

जीवनांतून स्त्रीची हकालपट्टी करून तिला कोंदट गृहकृत्यांत डांबून टाकली असली, तरी त्यांतल्या त्यांत विचारी कपडेलत्ते, दागदागिने, पोकळ डामडौल, असल्या क्षुल्लक बाबतींत आपल्या शून्य मनाची करमणूक करून घेत आहे.

अंतःकरणास उत्साह वाटणाऱ्या व अंतःकरण उचंबळून येणाऱ्या प्रत्थक चळवळींतून पुरुषांनीं स्त्रियांना दूर लोटून दिल्यामुळें नकळत तिला गोगलगायीप्रमाणें नाजूक, निरुपद्रवी, अर्थशून्य भावनेचें एक गांठोडें बनावें लागलें आहे. सामाजिक जीवनांत कःपदार्थ झालेली स्त्री ही स्वर्गीय देवदूत व बावळट वेडी व्यक्ति यांच्या संकरानें झालेला एक प्राणी, असें समजण्यांत येऊं लागलें आहे. तिच्या बुद्धिसामर्थ्याची आबाळ होऊन तिला स्वयंपाकघराच्या आवारांत कोंडल्यामुळें बाहेरील जगाचा व तिचा संबंधच तुटल्याप्रमाणें झालें आहे व मनुष्यजातींतील स्त्री हा एक वेगळाच वर्ग बनला आहे. याचा दुष्परिणाम असा झाला कीं, समाजांत स्त्री व पुरुष हीं परस्परांपासून तुटक, भिन्न गटानें रहात आहेत. या दोघांच्या आकांक्षा, बौद्धिक जीवन, कर्तव्यें हीं एकमेकांपासून इतकीं वेगळीं मानण्यांत येत आहेत कीं, त्यांना आपण एकाच जातीचे प्राणी आहोंत, याची आठवण फक्त ऐंद्रिय संबंधाच्या वेळीं तेवढी होते.

धनसंचयाच्या उन्मादांत पुरुषांस असें वाटूं लागलें आहे कीं, स्त्री हें आपल्या दौलतीचें प्रतीक आहे; आपल्या हातांतील एक पोकळ बाहुलें आहे; आपल्या घरांतील वस्तूंपैकीं एक सुंदर, उपयुक्त व स्पृहणीय अशी चीज आहे; आपल्या दौलती-प्रमाणें विभूषित करून आपल्या अनन्य सत्तेखालीं मनसोक्त उपभोगण्याचें तें एक साधन आहे. परंतु स्त्री ही एका काळीं समा-जास आधारभूत, पुरुषांच्या बरोबरीची, सामाजिक घटक होती याची पुरुषांना सध्यां अंधुक कल्पनाहि नाहीं. या पुरुषी

........ ..........



मनःस्थितीचा स्वाभाविक परिणाम असा झाला आहे कीं, त्यानें सध्यांच्या समाजांत स्त्रियांची संभावना तीन वर्गांत करून टाकिली आहे. घर राखणारी गृहिणी ( Household lady ), विनावेतनानें राबणारी मोलकरीण (Domestie drudge) व शरीरविक्रय करणारी दासी ( Prostitute ). जिच्या अंतःकरणांत स्वाभिमानाची ज्योत पेटली आहे, अशी स्त्री वरील वर्गीकरणांतून कोणता वर्ग आवडीनें पसंत करील, हें सांगणें फार कठीण आहे.

सध्यां आपल्या डोळ्यांदेखत हजारों, लाखों, कोटयवधि स्त्रिया अशा पडून आहेत कीं, ज्यांना हातपाय, हृदय, मन, बुद्धि हीं आहेत, पण त्यांचा त्यांना स्वतःच्या अगर समाजाच्या कामीं कांहीं उपयोग करतां येत नाहीं. त्यांचा उपयोग पुरुषांची बडेजावी वाढवण्याच्या कामीं त्यांनीं वाटल्यास करावा. उदात्त भावनेच्या दारिद्र्यांत, जीवनाच्या अत्यंत आकुंचित क्षितिजांत, पोकळ डामडौलाच्या गुंगींत, पुरुषांचा शद्ब झेलण्यांत, पुरुषांच्या डोळ्यांचे पांग फेडण्यांत, त्यांनीं दिलेल्या दागदागिन्यांत व नोकरचाकरांत धन्यता मानण्यांत स्त्रियांनीं आपलें बहुमोल आयुष्य घालवावें व आपलें प्रेमी अंतःकरण सुकवून टाकावें, ही एक जगांतील अत्यंत उद्वेगजनक गोष्ट आहे. सध्यांच्या समाजांत स्त्रीला आपल्या सर्व वैयक्तिक गुणांवर व बुद्धिसामर्थ्यावर पाणी सोडावें लागत आहे. त्यामुळें तिची सर्व बौद्धिक, नैतिक व आर्थिक वाढ खुंटली आहे व बंदीखान्यांत अडकून पडलेल्या क्षुद्र कीटकाप्रमाणें तिची असहाय स्थिति झाली आहे. त्यांतून बाहेर पडण्याचा कोणताहि मार्ग तिला सध्यां दिसत नाहीं व कोणींहि तिच्या मदतीस धांवून येईल, अशी तिला आशा दिसत नाहीं अशा स्थितींत वैतागून पुरुषांच्या निर्दय जुलुमाविरुद्ध बंडाळी करून तिनें सुटण्याचा प्रयत्न केल्यास भयंकर आग पाखडण्यांत येते. चहूंकडून हाहाःकार

करण्यांत येतो. बेइमान स्त्री असा जगांत डांगोरा पिटविण्यांत येतो व पुरुषांप्रमाणें आपणांसहि स्वातंत्र्य असावें अशी इच्छा केल्याच्या महापातकाबद्दल वेश्यावृत्तीच्या नरकांत तिला लोटून देण्यांत येतें. तिथेंच तिला कुजत राहून आपल्या मोल्यवान आयुष्याचा तिला अंत करून घ्यावा लागतो.

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' स्त्री ही गृहलक्ष्मी आहे, स्त्री ही गृहस्वामिनी आहे, इत्यादि स्त्रीजीवनाच्या थोरपणाबद्दल मतलबी समाजानें मिठ्ठास पण दांभिक शब्दांच्या गुलाबपाण्याचे कितीहि फवारे उडविले, तरी सध्या अस्तित्वांत असलेली स्त्रियांची स्थिति पाहिल्यास ती वर दिल्याप्रमाणेंच आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. सुखमय, स्वतंत्र असें जीवन कंठण्यास तिला सध्या मार्ग नाहीं. तिला केवळ आपल्या जिवाच्या आशेकरितां, आपला आणि आपल्या पोटीं आलेल्या मुलांच्या उपजीविकेकरितां आपलें शरीर मिंधेपणानें आजन्म पुरुषाच्या स्वाधीन केल्याशिवाय गत्यंतर नाहीं; मग त्या पुरुषावर तिचें प्रेम असो वा नसो. ती तसें न करील, तर समाजानें 'उदार बुद्धीनें' दिलेलें गृहिणीपदहि तिला मिळणार नाहीं. तथापि समाजानें बहाल केलेलें हें गृहिणीपद असो, अगर समाजानें बहिष्कृत केलेला वेश्याव्यवसाय असो, या दोहोंपैकीं कोणताहि मार्ग तिला पतकरावा लागला, तरी त्यांत स्वाभिमानाचा सारखाच चक्काचूर झालेला आढळून येईल

असो. या अनुकंपनीय व निराशामय दिसणाऱ्या परिस्थितींतून मुक्त होण्याची सोन्यासारखी संधि सुदैवानें स्त्रियांच्या दृष्टिपथांत हळुहळु सध्यांच्या काळीं चालून येत आहे. स्वाभिमानाच्या दिव्य प्रकाशांत, बुद्धिसामर्थ्याचीं शस्त्रास्त्रें धैर्यानें हातीं घेऊन गमाविलेलें सामाजिक वैभव व शुद्ध प्रेमाचें साम्राज्य परत

मिळविण्याचा स्त्रियांनीं धडाडीनें प्रयत्न केल्यास या संधीचा फायदा मिळून त्यांच्या न्याय्य व सत्पक्षास या युद्धांत यश आल्याशिवाय रहाणार नाहीं. या भावी युद्धांत स्त्रीवर्गानें आपलें पाऊल कोणत्या धोरणानें कोणत्या दिशेनें टाकावें व अखेर कोणता पल्ला गांठण्याची त्यांनीं शिकस्त करावी याची त्यांना जाणीव करून द्यावी, या हेतूनें ही लेखमाला हातीं घेतली आहे. जगांतील कोणत्याहि युद्धांत पराभूत पक्षाची नेहमीं हानीच होत असते; परंतु या आगामी युद्धांत स्त्री-वर्गास यश प्राप्त झाल्यास पराभूत पक्षाचेंच काय, पण सर्व मानवी समाजाचेंहि कोटिकल्याण होणार आहे.

# प्रकरण १ लें

---

सध्यां महाराष्ट्रांत मध्यम वर्गांतील स्त्रियांमध्यें जी विचारजागृति दिसून येत आहे, ती अत्यंत कौतुकास्पद व एकंदर राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीनें फार आशाजनक आहे. जगांत सध्यां विचार-क्रांतीची लाटच उठली आहे, त्याचें महाराष्ट्रांतील स्त्रियांची चळवळ हें एक प्रतिबिंब आहे. हिंदुस्थानांतील इतर प्रांतांशीं तुलना केल्यास येथील स्त्रियांनीं दाखवलेली प्रगति व तडफ महाराष्ट्राच्या परंपरेला साजेशीच आहे. या जागृतीचा परिणाम स्वातंत्र्यप्रिय महाराष्ट्रावर खात्रीनें इष्ट असाच झाल्याशिवाय रहाणार नाहीं. सनातनी विचारसरणीच्या पाशांतून महाराष्ट्रास मुक्त करण्याचे प्रयत्न आजवर पुरुषवर्गानें केले. त्याला आतां स्त्रीवर्गाचाहि दुजोरा मिळूं लागला आहे, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. मुक्त झालेली ही राष्ट्रीय विचारशक्ति चालू आर्थिक व राजकीय झगडयांत यशस्वी झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

विचारस्वातंत्र्यावरील दडपण एक वेळ दूर झालें कीं, ज्या ज्या ठिकाणीं अत्याचाराचा, अनिष्ट वर्चस्वाचा अगर गुलामगिरीचा वास येईल, त्या त्या ठिकाणीं चोहोंकडून मारा होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. या गोष्टीस अनुसरून आपल्या इकडील स्त्री-वर्गानें आज हजारों वर्षें निमूटपणें सहन केलेला पुरुषवर्गाचा अनिष्ट वरचष्मा झुगारून देण्याचा निश्चय केला आहे. केवळ मानवी हक्काची कुटुंबांतील योग्य अशा स्थानाची मागणी करण्याकरितां त्यांनीं झगडण्यास उद्युक्त व्हावें, हें क्रमप्राप्त आहे. अशा प्रसंगीं कु. बाळूताई खरे यांसारख्या विदुषींनीं स्त्रियांना मार्गदर्शक होतील

असे 'हिंदुव्यवहारधर्मशास्त्र' 'स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा' इत्यादि विद्वत्ताप्रचुर ग्रंथ लिहून मदत करावी हें त्यांस उचित व भूषणावह आहे. अशा वेळीं स्त्रियांनीं आपली दृष्टि पायांपुरती संकुचित ठेवतां कामा नये. फार प्राचीन म्हणजे प्रागैतिहासिक काळापासून आर्थिक परिस्थितीच्या फेऱ्यांत सांपडून कुटुंबांतील स्त्रियांचें स्थान आतांपर्यंत खालावत चाललें आहे. यास्तव स्त्रियांच्या परवशतेचे धागेदोरे भूतकाळीं किती लांबवर गेले आहेत व ते तसे कां गेले, याची माहिती त्यांनीं करवून घेणें अत्यावश्यक आहे. ती झाल्यास भूतकाळीं आपल्यास कशा प्रकारच्या अग्निदिव्यांतून जावें लागलें आहे, याची योग्य कल्पना येईल, व आपल्या सामाजिक सामर्थ्याची मजल कोठपर्यंत आहे व ती गांठण्यास कोणती सामाजिक परिस्थिति निर्माण व्हावयास पाहिजे, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें त्यांस स्पष्टपणें देतां येतील. अशा प्रकारची संकलित माहिती मराठींत उपलब्ध असल्याचें आढळून आलें नाहीं, ती थोडक्यांत पुरवावी या हेतूनें विषयप्रवेशांत सूचित केल्याप्रमाणें ही लेखमाला आम्ही हातीं घेत आहों.

हल्लीं प्रचारांत असलेली कुटुंबसंस्था ही विवाहबद्ध स्त्रीपुरुष व त्यांचीं अपत्यें यांनीं मर्यादित आहे. सध्यां याच कुटुंबास समाजजीवनाचा आदर्शभूत घटक ( Economic unit ) असें समजलें जातें. त्यांतील व्यक्तींचे परस्पर संबंध धर्मशास्त्रानें, रूढीनें व कायद्यानें नियंत्रित आहेत. ही संस्था जशीच्या तशी कोणीं निर्माण करून पृथ्वीवर आणून सोडली आहे असें नाहीं. परंतु अशी सार्वत्रिक समजूत आहे कीं, ती अनादिकालापासून चालत आली आहे. तिच्या रचनेंत किंचितहि फरक झाल्यास समाजांत सर्वत्र घोंटाळा होऊन तो रसातळास जाईल ! या समजुतीस शास्त्राचे आधार व रूढि यांनीं इतकी बळकटी आली

आहे कीं, प्रचलित कुटुंबरचनेशिवाय अन्य रचना पूर्वी कधीं होती व पुढें कधींकाळीं तींत फरक होऊं शकेल, या गोष्टीवर कोणाचा भरंवसाच बसत नाहीं. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, ज्याप्रमाणें मनुष्याचें शरीर हजारों वर्षांच्या फेऱ्यांत उत्क्रान्त होत जाऊन सध्यांच्या अवस्थेस प्राप्त झालें आहे, त्याप्रमाणें मनुष्याच्या सामाजिक जीवनांतहि परिस्थितीस जुळवून घेणाऱ्या वेगवेगळ्या स्वरूपांच्या कुटुंबसंस्था निर्माण होण्याची क्रिया अनादिकालापासून चालत आली आहे. जीवनकलहांत प्राप्त झालेल्या पायरीप्रमाणें उपजीविकेच्या साधनसामुग्रींत वेळोवेळीं जसजशी प्रगति होत गेली, त्याप्रमाणें मनुष्याच्या संघरचनेंतहि महत्वाचे फेरफार झालेले दिसून येतात. इतकेंच नव्हे, तर या फेरफाराची क्रिया सध्यांच्या काळीं चालू असून यथापरिस्थिति यापुढेंहि चालू राहील यांत तिळमात्र संशय नाहीं.

समाज-उत्क्रान्तीच्या अभ्यासास अलीकडे बरीच चालना मिळाली आहे. या कामीं अतिप्राचीन ग्रंथांत सांपडणाऱ्या तुटक उल्लेखांचा व संस्कृतीचा अभ्यास करावा लागतो. एवढेंच नव्हे, तर सध्यां पृथ्वीच्या पाठीवर ज्या अनेक रानटी जाति अस्तित्वांत आहेत, त्यांच्या चालीरीती, नातींगोतीं यांचाहि अभ्यास करावा लागतो. असा अभ्यास करण्यांत अलीकडे अनेक विद्वानांनीं आपलें आयुष्य खर्च केलें आहे. त्यांपैकीं अमेरिकेंतील **लुई मॉर्गन** यास प्रमुख स्थान देणें भाग आहे. त्यानें अमेरिका खंडांतील रेड् इंडियन् नांवाच्या रानटी जातीचा अभ्यास करण्यांत आपल्या आयुष्याचीं चाळीस वर्षें त्या जातींत सामील होऊन घालविलीं आहेत व त्या जातीच्या कुटुंबरचनेचें संशोधन आपल्या 'Ancient Society' या ग्रंथांत १८७७ सालीं प्रसिद्ध केलें आहे. मनुष्याच्या शरिराची उत्क्रांति उकलून सांगण्यांत डार्विनला जें महत्व आहे, तेंच मॉर्गनला

समाजरचनाशास्त्रांत आहे. या विषयावरील अलीकडील संशोधन हें मॉर्गन यानें लाविलेल्या शोधांच्या आधारावरच चालूं आहे.

मानवी कुटुंबाची रचना ही परिस्थितीस अनुरूप अशी बदलत आली आहे; याचें ज्ञान जरी विद्वान लोकांत दृढ होत चाललें आहे, तथापि त्याची सामान्य लोकांत वाढ होण्याच्या मार्गांत अनेक विघ्नें आहेत. एक वेळ स्थिर झालेल्या समाजरचनेंत बदल होणें झाल्यास ती गोष्ट झगड्याशिवाय कधींहि साध्य होत नसते. कारण समाजाची स्थिति अगदीं स्थिर अशी कधींच नसते. त्यांत कालानुरोधानें थोडा फरक हा चाललेलाच असतो. परंतु बराच वेळ स्थिरावलेल्या परिस्थितींत समाजांतील एक वर्ग हळूहळू प्रबळ होतो व दुसऱ्या वर्गावर भुरळ घालून अगर जबरदस्ती करून कृत्रिम बंधनें लादण्याचा त्यांचा क्रम सुरू होतो. याच बंधनांना पुढें धर्मशास्त्र, सरकारी अनुशासन इत्यादि भारदस्त नांवें पडतात. अशा रीतीनें वरचढ झालेला वर्ग जेणेंकरून आपलें स्थिर आसन किंचितहि डळमळणार नाहीं अशी खबरदारी घेत असतो. सध्यांच्या कुटुंबरचनेंतील मुख्य घटक जे विवाहित स्त्री व पुरुष यांपैकीं स्त्रियांची परवशता व पुरुषांचा वरचष्मा इतका उघड उघड दिसून येत आहे कीं, त्याच्या अस्तित्वाबद्दल सध्यांच्या काळीं कोणी संशय घेईल, असें वाटत नाहीं. अशा परिस्थितींत कितीहि इष्ट असला तरी, प्रचलित कुटुंबरचनेंत किंचित्‌हि बदल न व्हावा, अशी खबरदारी बलिष्ठ वर्गाकडून घेण्यांत यावी, हें क्रमप्राप्तच आहे; व जेणेंकरून असा बदल करण्याची प्रवृत्ति होईल, अशा ज्ञानास अडथळा करण्याचें कामहि याच वर्गाचें असतें.

दुसरें विघ्न परमार्थजीवि वर्गाचें. चालू आचारधर्मांत किंचितहि परिवर्तन होऊं नये, याकरितां किती कसोशीनें हा वर्ग

प्रयत्न करीत असतो, हें सर्वश्रुत आहे. स्त्रियांना सर्वस्वीं अज्ञानांत व पराधीनतेंत ठेवण्यांत या वर्गाचा हात आहे. कशाहि परिस्थितींत पुरुषांची सेवा करणें, हेंच आपल्या जीविताचें साफल्य आहे, इत्यादि कल्पना त्यांच्या डोक्यांत कोंबून पुरुषदास्याला त्यांचीं मनें प्रवृत्त करण्याचें महनीय काम याच वर्गाकडे आहे. “ब्रह्मदेवानें नवराबायकोंची घातलेली गांठ उकलण्याचा अधिकार कोणालाहि ( निदान स्त्रीला तरी ) नाहीं. अग्निनारायणासमक्ष उच्चारलेला ‘ नातिचरामि ’ हा करार पुरुषांनीं मोडला तरी स्त्रियांनीं तो मोडणें हें भयंकर पाप आहे,” ही समजूत दृढ करणें या वर्गाला इष्ट असतें. रोगी, दुर्व्यसनी, कसाहि पति असला, तरी जन्मोजन्मीं तोच मिळावा याकरितां नाना प्रकारचीं व्रतें, वैकल्यें स्त्रियांच्या पाठीस लावणें आणि पतीच्या मरणानंतर विधवांनीं आपणांस जिवंतपणीं जाळून घेण्यापर्यंत त्यांची स्थिति आणणें हीं सर्व कृत्यें याच परमार्थजीवि वर्गाचीं आहेत. तेव्हां इतर धार्मिक आचारविचारांप्रमाणें कुटुंबसंस्था व त्यांतील घटकांचे परस्परसंबंध हीं परिवर्तनशील आहेत, इत्यादि ऐतिहासिक ज्ञानाच्या प्रसारास अडथळा करणें, हें याच वर्गाचें पवित्र कर्तव्य होऊन बसलें आहे. ही जी मनःप्रवृत्ति आपल्या इकडील पुरुषांची आणि परमार्थजीवि वर्गाची, तीच युरोपादि इतर भूभागांतील लोकांची.

याचा परिणाम असा झाला कीं, वर निर्दिष्ट केलेला मॉर्गन याचा ग्रंथ सध्यां अनुपलब्ध झाला आहे. तथापि या ग्रंथाचा उद्धार करून व नवीन संशोधन करून फ्रेडरिक एन्गल्स ( F. Engels ) या विद्वानानें या विषयांत महत्वाची भर टाकिली आहे. मुख्यत्वें याच एन्गल्सच्या ग्रंथाच्या आधारावर आम्हीं प्रस्तुत

लेख उभारला आहे. या एकंदर प्रागैतिहासिक संशोधनानें मनुष्य-प्राण्याच्या कौटुंबिक जीवनाची उत्क्रान्ति कोणकोणत्या पायऱ्यांनीं कसकशी होत आली आहे, याचें साद्यंत ज्ञान उपलब्ध झालें आहे. फार प्राचीन काळच्या ग्रंथांतून उल्लेखिलेल्या तुटक तुटक पण विपरीत भासणाऱ्या गोष्टींची या संशोधनानें समाधानकारक रीतीनें संगति लागली आहे.

या संशोधनावरून एक महत्वाची गोष्ट सिद्ध झाली आहे, ती ही कीं, अनादिकालापासून मनुष्याची जी सांसारिक धडपड चालली आहे, त्याच्या बुडाशीं दोनच प्रभावी प्रेरणा असतात. त्यांपैकीं एक म्हणजे प्रजोत्पादन व वंशवृद्धि करणें ही आहे व दुसरी म्हणजे उपजीविकेचीं साधनें (अन्न, वस्त्र, आसरा) यांची वृद्धि करणें ही आहे. कोणत्याहि देशांत, कोणत्याहि ऐतिहासिक कालखंडांत, मनुष्याच्या समाजांत जी कौटुंबिक रचना दिसून येते, ती या दुहेरी प्रेरणेचें मिश्र फळ असतें. याचा अर्थ असा कीं, मनुष्याची विवक्षित कुटुंबरचना ही त्या समाजांतील प्रजावृद्धि व अर्थवृद्धि यांवर अवलंबून असते.

दुसरी महत्वाची गोष्ट जी समजली आहे, ती ही कीं, कोणत्याहि मानवी समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत ज्या वेळीं निर्माण होणाऱ्या निर्वाहाच्या साधनांची वाढ अगदीं कमी असते, त्या वेळीं त्या समाजांतील गट हे नात्या-गोत्याचे बनलेले असतात. म्हणजे मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेंत ज्या वेळीं उद्योगधंद्यांची वाढ मुळींच झालेली नसते; शिकार, थोडी शेती व जनावरें पाळणें यांवरच समाजाचा सर्व निर्वाह होत असतो व शिल्लक राहील अशी संपत्ति निर्माण होत नसते, अशा काळीं एके ठिकाणीं रहाणाऱ्या मनुष्यांच्या लहानमोठ्या टोळ्या या

सर्वस्वी रक्तसंबंधाच्या म्हणजे नात्यागोत्याच्या बनलेल्या असाव्या लागतात. नात्यागोत्याशिवाय इतरांचा अशा संघांत समावेश होणें शक्य नसतें. असा संघ बनवल्याशिवाय सहकार्यानें संघाचा उदरनिर्वाह व संरक्षण होणें त्या काळीं शक्य नसतें. जास्तींत जास्त उत्पादन होण्याचें साधन म्हणून असे संघ बनवणें त्यांस भागच पडतें, या संघांत उत्पादन ( Production ) अगर संघसेवा ( Social service ) करण्याचा हक्क ( right ) व त्याबद्दल करावयाचीं कर्तव्यें (Duty) हीं सर्वांस समान असतात. त्यांत उच्चनीच भावाचा अगर ऐतखाऊ वर्गांचा समावेश होणें संभवत नाहीं. हा एक प्राथमिक अवस्थेंतील समाजसमतासंघ (Primitive Communism ) असतो. परंतु हीच रचना बराच वेळ चालल्यानंतर अशा संघांतील उत्पादनाचें प्रमाण व त्याची अदलाबदल ( व्यापार ) होण्याचें प्रमाण वाढत जाऊन कांहीं अन्नसामुग्री व साधनसंपत्ति चालू उदरनिर्वाहास पुरून शिल्लक उरूं लागते व हें संचित धन पुढाऱ्यांची अगर बलिष्ठांची खाजगी मालमत्ता अशी समजण्यांत येऊं लागतें. त्यानंतर मात्र संघांत गरीब आणि श्रीमंत असे गट पडून त्यांत हितविरोध उत्पन्न होतो.

सामाजिक उत्पादनांत व वांटणींत आमूलाग्र बदल होऊन वर्गविरोध उत्पन्न झाल्यानंतर पूर्वींची नात्यागोत्याची समाजरचना कायम टिकणें कठीण जाऊं लागतें. जुन्या सामाजिक रचनेंत वर्गविरोधाची भर पडल्यानें पूर्वींची समतोल घडी बिघडून कलह माजूं लागतात व जुन्यानव्यांची तडजोड होणें शक्य नसल्यामुळें अखेर क्रान्ति होऊन रक्तसंबंधविशिष्ट रचना नष्ट होऊन त्या ठिकाणीं नवीन रचना अमलांत येते. या नवीन रचनेंत समाजांतील घटक जे बनतात ते नात्यानें बद्ध न रहातां खाजगी

मालमत्तेच्या जोरावर त्याची रचना स्थलविशिष्ट बनते. संपत्तीच्या विषम वांटणीवर याप्रमाणें एकवार समाजरचना झाली कीं, त्याच्या पोटीं सत्ताधारी वर्ग निर्माण होऊन गरीब वर्गाची लुबाडणूक सुरू होते. याच सत्ताधारी वर्गाचें बळ वाढून त्याचीं राज्यें, साम्राज्यें बनतात. आजपर्यंत उपलब्ध असलेला मानवी इतिहास हा अशा सत्ताधाऱ्यांचीं आपसांत भांडणें अगर सत्ताधारी वर्गाचीं पीडित वर्गाशीं भांडणें यांनींच भरलेला आहे.

मानवी समाजसंस्थेचा विकास व विस्तार याचा वर जो त्रोटक गोषवारा दिला आहे, त्यावरून दिसून येईल कीं, वेळोवेळीं समाजांत जीं उपजीविकेचीं व संरक्षणाचीं साधनें निर्माण होत जातात त्यांवरच हा विकास अवलंबून आहे व अशा साधनांच्या स्थित्यंतरावर मानवी कुटुंबरचना हेलकावे खात असते. कुटुंबांतील प्रमुख घटक जी स्त्री, तिचें स्थान वरील कारणांमुळें कसकसें बदलत आलें आहे व तें सध्यां कोणत्या पायरीवर आहे, याचें ज्ञान करून घेणें झाल्यास उपजीविकेचीं साधनें व चढाईचीं हत्यारें यांमुळें एकंदर मानवी समाजांत फार प्राचीन काळापासून कसकशीं स्थित्यंतरें घडून आलीं, हें पहाणें अवश्य आहे.

इतर प्राण्यांप्रमाणें मानवी प्राण्याची उत्क्रांति झाल्यावर त्याला समाज करून रहातां येण्याला पंधरावीस हजार वर्षें लागलीं आहेत. परंतु अशा समाजांत पुढें त्यांची जी प्रगति झाली आहे, तिचे अलीकडील संशोधनावरून तीन अवस्थाखंड पाडतां येतात. ( १ ) **जंगली** अवस्था ( Savagery ), ( २ ) **रानटी** अवस्था. ( Barbarism ), ( ३ ) **नागरी** अवस्था ( Civilization ). उपजीविकेच्या साधनांकरितां इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्यास केवळ निसर्गांत आयत्या सांपडणाऱ्या पदार्थांवर अवलंबून रहाण्याची गरज नाहीं. बुद्धिसामर्थ्यानें निसर्गावर मात करून आपल्या भक्ष्य व

भोग्य पदार्थांत त्याला भर घालतां येते. वर जीं एकापेक्षां एक वरचढ तीन अवस्थांतरें दिलीं आहेत, तीं गांठण्यास त्यास याच सामर्थ्याचा उपयोग झाला आहे. या एकएक अवस्थांतून प्रवास करते वेळीं समाजाची प्रगति कोणत्या धोरणानें होत गेली, याची थोडी तपशीलवार माहिती आपण आतां करून घेऊं.

## (१) जंगली अवस्था

या अवस्थेंत मनुष्यप्राण्याचा निर्वाह आयतीं सांपडणारीं कंदमुळें व फळें यांवरच होत होता, व हिंस्र पशूंपासून संरक्षण होण्याकरितां जंगलांतील झाडांवरच वस्ती करून रहाण्याची त्यांस जरुरी पडत होती. वाणीचा उपयोग बोलण्याच्या कामीं त्यास याच वेळीं प्रथम करतां येऊं लागला. अशी स्थिति हजारों वर्षें गेल्यानंतर त्यास विस्तवाचा उपयोग करून घेतां येऊं लागला, व त्यामुळें कंदमुळें भाजून खाण्याची त्यास सोय झाली. पूर्वीं उपलब्ध असलेल्या कंदमुळांत पुढें नदीनाल्यांत सांपडणाऱ्या माशांची भर पडली व त्यामुळें इतउत्तर जंगलवस्ती सोडून मोठमोठ्या नद्यांच्या कांठानें त्यांची वस्ती पसरत चालली. धातूंचा शोध अद्यापि त्यांस लागला नव्हता. त्यामुळें याच स्थितींत भाला, बरची यांचीं टोकें व विळे, कुऱ्हाडी इत्यादि हत्यारें व अन्न वाटण्याकरितां पाटेवरवंटे इत्यादि जिन्नस कठीण गारगोटीचे बनविले जात असत. अशा वस्तूंचे अवशेष पृथ्वीवरील बहुतेक मोठमोठ्या नदीकांठच्या प्रदेशांत अद्यापि सांपडतात. याच स्थितीच्या वरच्या पायरींत तिरकमठ्याचा शोध लागला. तो अत्यंत महत्वाचा होता. या शोधामुळें उपजीविकेच्या साधनांत भर पडून समाजाची वाढ झपाट्यानें होत गेली व कच्च्या मातीचीं व लांकडांचीं घरें बांधून लहान लहान खेड्यांतून त्यांना वस्ती करतां येऊं लागली. सारांश, विस्तवाचा

उपयोग, दगडी हत्यारें व तिरकमठा याच जंगली स्थितींतील प्रगतीच्या द्योतक खुणा समजल्या जातात.

## (२) वन्य अगर रानटी अवस्था

जंगली अवस्थेच्या शेवटीं वरच्या पायरीवर समाजाची प्रगति होण्यास पक्क्या मातीचीं भांडीं करण्याची विद्या त्यास फार उपयोगी पडली. विस्तवाचा उपयोग कंदमुळें, मासे इत्यादि भाजण्याच्या कामीं होऊं लागल्यावर मातीचीं भाजून भांडीं करण्याची कुंभारविद्या मनुष्यास प्राप्त होण्यास फारसा वेळ लागला नसेल. परंतु त्यामुळें घर बांधण्याच्या, अन्न शिजविण्याच्या आणि सांठा करण्याच्या कामीं येणाऱ्या अनेक घरगुती अडचणी एकदम दूर झाल्या.

रानटी अवस्थेंत येथपर्यंत मानवी समाजाची जी प्रगति झाली, ती पृथ्वीवरील वस्ति होण्याजोग्या सर्व भागांत सर्वसामान्य झाल्याचें दिसून येतें. परंतु यानंतर पृथ्वीच्या पूर्व व पश्चिम गोलार्धांत त्याची गति परिस्थितीस अनुरूप भिन्न दिशेनें होत गेली. पूर्वेकडील गोलार्ध म्हणजे आशिया, युरोप व आफ्रिका. या खंडांत पाळतां येण्याजोगीं सर्व जातीचीं जनावरें व शेतीच्या उपयोगी पडणारीं सर्व धान्यें नैसर्गिक स्थितींत उपलब्ध होतीं. परंतु पश्चिम गोलार्धांत म्हणजे अमेरिका खंडांत पूर्व गोलार्धांतील एकहि जनावर व धान्यांपैकीं एकहि धान्य उपलब्ध नव्हतें. पाळतां येण्याजोग्या जंगली जनावरांपैकीं फक्त लामा नांवाचें जनावर, टर्की नांवाची कोंबडी ( तीहि मध्य-अमेरिकेंत मेक्सिको प्रांतांत ) होती. धान्यांपैकीं मात्र मका हें उच्च दर्जाचें धान्य चहूंकडे विपुल होतें. अशा परिस्थितिभिन्नत्वामुळें या दोन गोलार्धांतील मानवसमाजाची प्रगति भिन्न

दिशेनें होत गेली. अमेरिका खंडांत मका, भाजी व फळें यांची लागवड व या कामीं उपयोगी पडणारे तलाव आणि कालवे इत्यादि बांधण्याची विद्या यांचा फैलाव होत गेला. **कृषिविद्या व शिकार** हींच त्यांच्या उपजीविकेचीं मुख्य साधनें राहिलीं. त्याचप्रमाणें खनिज पदार्थांपैकीं तांबें, कथील इत्यादि मृदु धातूंचा शोधहि अमेरिकेंतील रेड इंडियन लोकांनीं लाविला. लोखंड गाळण्याची विद्या मात्र अद्यापि त्यांस साधली नव्हती. अशा रानटी स्थितीप्रत ते पोंचले असतांना त्यांना युरोपांतील स्पॅनिश लोकांनीं जिकलें व त्यानंतर त्यांच्यांत होणारी स्वतंत्र नैसर्गिक प्रगति खुंटली.

आपल्या पूर्वगोलार्धांत शेळ्या, मेंढ्या, गायी, उंट इत्यादि दूध व मांस देणाऱ्या **जनावरांस माणसाळण्याची** क्रिया प्रथम सुरू झाली. अशा जनावरांचे कळप वाढत गेल्यानें हिंदुस्थानांतील व मध्यएशियांतील मोठमोठ्या नदीकांठच्या प्रशस्त कुरणांतून ते कळप घेऊन भटकणाऱ्या अनेक टोळ्या उत्पन्न झाल्या. आर्य लोक व मध्यएशियांतील सेमिटिक लोक हे प्रथम अशा भटक्या टोळ्यांपैकींच होते. एके ठिकाणीं स्थानबद्ध होऊन फार दिवस रहाण्याची अशा टोळ्यांस सवड नसे. त्यामुळें धान्याची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्याची विद्या या भटक्या लोकांस फार मागाहून प्राप्त झाली. पण धान्याची लागवड पूर्वगोलार्धांत सार्वत्रिक सुरू होण्याच्या अगोदरच मध्यएशियांतील आर्य व सेमिटिक टोळ्यांची इतर टोळ्यांपासून फुटाफूट झाली. या व इतर टोळ्यांनीं पश्चिमेकडील युरोपखंडांत आपल्या वसाहती वाढविल्या. त्यामुळें बहुतेक युरोपियन भाषेंत पाळीव जनावरांच्या नांवांच्या व्युत्पत्तींत अद्यापि साम्य दिसून येतें. जसें इंग्रजींत कौ ( Cow ) तर संस्कृत गो. परंतु धान्यांच्या नांवांत व्युत्पत्तिसाम्य मुळींच नाहीं. त्या

वेळच्या इतर रानटी जातीपेक्षां आर्य व सेमिटिक लोकांची संपत्ति व सामाजिक प्रगति श्रेष्ठ असण्याचें कारण त्यांस इतर खाद्य पदार्थांबरोबर दूध, तूप, मांस यांचा मुबलक पुरवठा होता, हें होय.

या लोकांस पुढें लोखंड गाळण्याची विद्या साध्य झाल्यानें त्यांचें बळ झपाट्यानें वाढत गेलें. लागवडीच्या कामीं अत्यंत उपयोगी अशा नांगरांचे लोखंडी फाळ याच लोकांनीं प्रथम प्रचारांत आणले. लोखंडी औतें, कुऱ्हाडी, कोयते, तरवारी, भाले इत्यादि अवजारें व आयुधें यांचा मुबलक पुरवठा त्यांस होत गेला, त्यामुळें पश्चिमगोलार्धांतील प्रगतीपेक्षां पूर्वगोलार्धांतील प्रगति फार झपाट्यानें पुढें गेली. संपत्तीची वाढ झाल्यानें कलाकौशल्यास उत्तेजन मिळालें. लिपीचा शोध लागला व वाङ्मय निर्माण होऊं लागलें व एकंदर भरभराट इतकी झाली कीं, थोड्याच शतकांत माणसांनीं गजबलेलीं मोठमोठीं नगरें वसलीं; राज्यें, साम्राज्यें स्थापन झालीं. याच सुमारास ग्रीस देशांत व हिंदुस्थानांत होमर, व्यास, वाल्मीकि यांचीं वीररसात्मक पुराणें निर्माण झालीं.

## ( ३ ) नागरी अवस्था

वन्य अवस्थेंतील भटकेपणा कमी होऊन, मनुष्यसमाजास नगरांतून वस्ती करून रहाण्याची नागरी स्थिति प्राप्त होऊन आज पांच हजारांवर वर्षें झालीं आहेत. मागील दोनहि अवस्थांपेक्षां या अवस्थेंत समाजाची प्रगति फारच झपाट्यानें म्हणजे भूमितिश्रेढीनें होत गेली. भक्ष्याकरितां लागणारी अनेकविध धान्याची लागवड वाढत्या प्रमाणावर होऊं लागली. कोट्यवधि एकर जंगलें तोडून ती जमीन नांगराखालीं आणण्यांत आली. शेतीकरितां पाणी पुरवठ्याचीं अनेक कृत्रिम साधनें निर्माण होऊन उत्पादनाच्या प्रमाणांत भर पडली. भक्ष्याकरितां, शेतीच्या व वहातुकीच्या

कामाकरितां जनावरांची पैदास मोठ्या प्रमाणावर होऊं लागली. लोखंड, तांबें आणि कथील यांशिवाय चांदी, सोनें इत्यादि धातूंचे अनेक उपयोग प्रचारांत येऊं लागले. उद्योगधंद्यास लागणारीं कुशल कारागिरीचीं हत्यारें, कारागिरीचे जिन्नस, शिल्प हीं निर्माण झालीं. पुराणांशिवाय विविध प्रकारची वाङ्मय-निर्मिति झाली. बाण, भाले, तरवारी यांच्या जोडीला बार होणाऱ्या दारूचा शोध लागून रक्षणाच्या व चढाईच्या कामीं बंदुका उपयोगांत येऊं लागल्या. अज्ञात असलेले मोठमोठे पृथ्वीचे विभाग यांचा शोध लागल्यामुळें उत्पादनांत व हत्यारांत होत जाणारी ही प्रगति अलीकडील चारशें वर्षांत फारच झपा-ट्यानें होत चालली आहे. या शोधांचा फायदा युरोपखंडाच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या राष्ट्रांना इतका मिळाला कीं, त्यांनीं आधिभौतिक शास्त्रांत व यंत्रशास्त्रांत आघाडी मारून जगांत नवीनच यंत्रयुगाची स्थापना केली आहे. याच युगाच्या साधकबाधक धक्काबुक्कींत सध्यां आपण आह्मीं.

तीन वेगवेगळ्या अवस्थांतून मानवी समाजाच्या उत्क्रान्तीचा इतिहास जो वर थोडक्यांत दिला आहे, त्यावरून पायरीपायरीनें झालेल्या प्रगतीची उभारणी कोणत्या पायावर झाली, हें सहज ध्यानांत येण्याजोगें आहे. उपजीविकेचें व संरक्षणाचें एकेक साधन जसजसें मनुष्याच्या स्वाधीन होत गेलें, तसतसें त्याची रहाणी व समाजरचना हीं बदलत आलीं आहेत. आत्मसंरक्षणाचीं व चढाईचीं हत्यारें जसजशीं त्यांस उपलब्ध झालीं, तसतसें त्यांस नैसर्गिक मानवी शत्रूंपासून आपला बचाव करतां येऊं लागला. एवढेंच नव्हे, तर त्यांपासून मिळालेल्या सत्तेच्या जोरावर समाजां-तील मिरासदार वर्गास दलित वर्गावरील वर्चस्व जबरदस्तीनें कायम ठेवण्याचें एक प्रभावी साधन मिळालें.

वर दिलेल्या समाजोन्नतीच्या तीन अवस्था सूत्ररूपानें खालीलप्रमाणें मांडतां येतील—

(१) **जंगली अवस्थाः**– निसर्गांत आयत्या मिळणाऱ्या खाद्य वस्तूंचा उदरनिर्वाहाकडे उपयोग करणें व आयत्या मिळणाऱ्या गारगोटी, बांबू इत्यादि पदार्थांपासून हत्यारें तयार करणें.

(२) **रानटी अवस्थाः**– जंगली जनावरें पाळून त्यांचा भक्ष्य व इतर तऱ्हेनें उपयोग करणें; धान्य व फळांची लागवड करून कृत्रिम रीतीनें वाटेल तितका अन्नाचा पुरवठा करणें व या कामीं लागणारीं हत्यारें लोखंड व इतर खनिज धातूंपासून तयार करणें.

(३) **नागरी अवस्थाः**– कृत्रिम व नैसर्गिक खाद्यभोग्य पदार्थांची विपुल उत्पत्ति; संचित संपत्तीची वाढ; व लेखनादि कलांमुळें झालेली सांस्कृतिक वाढ.

याचप्रमाणें बचावाच्या व चढाईच्या हत्यारांचा विचार सूत्ररूपानें मांडणें झाल्यास जंगली अवस्थेंत तिरकमठा, रानटी अवस्थेंत तरवार व नागरी अवस्थेंत बंदुक अशी त्यांची वांटणी करतां येईल. यापुढें जें युग येणार आहे त्यांतील प्रमुख हत्यार प्राणघातक वायु हें राहील. त्याहीपुढील भविष्यकाळीं प्राणघातक विद्युत्किरणांनीं दूरदूरच्या मनुष्यसमुदायाचा एकदम संहार करणें असेंहि कदाचित् होऊं शकेल. परंतु अशा वेळीं समाजाची रचना कशी असेल, हें कोणीं सांगावें ?

तें कसेंहि असो. प्रस्तुत आपणापुढें प्रश्न आहे तो असाः– मनुष्यसमाजाची उत्तरोत्तर ऐहिक उन्नति होत आली आहे. तिचा पाया म्हणजे उपजीविकेच्या साधनांची व हत्यारांची वाढ हा आहे. साधनांच्या अनुकूलतेप्रमाणें मनुष्यानें आपल्या समाजरचनेंत महत्वाचे फेरफार केले आहेत. रक्तसंबंधी नातेवाइ-

कांच्या टोळ्या करून रहाण्याची रचना मोडून **संपत्तीच्या** वांटणीवर झालेली **स्थानविशिष्ट** रचना प्रचारांत आणली. रानटी स्थितींतील पुरुषवर्गाकडे **सहकारितेनें** उपजीविकेची सामुग्री रोजच्या रोज मिळवून ती वस्तीच्या ठिकाणीं आणून टाकणें हें **सामाजिक** काम होतें; तर ही सामुग्री **एकत्रित** करून सर्व टोळीच्या निर्वाहाची सोय करणें, मुलांबाळांचा समाईक रीतीनें संभाळ करणें, ही महत्वाची **सामाजिक** कामगिरी स्त्रीवर्गाकडे असे. या नैसर्गिक श्रमविभागांत प्रत्येक वर्गाला आपआपल्या प्रांतांत स्वाभिमानपूर्वक रहातां येत असे. कोणत्याहि एका वर्गास दुसऱ्या वर्गाशिवाय गत नसल्यानें एका वर्गाचें वर्चस्व दुसऱ्या वर्गावर चालणें अशक्य असे. त्या वेळीं एकंदर उपजीविकेचीं साधनें अपुरीं आणि अपरिपक्व दशेंत असल्यानें पुरुष व स्त्रिया या दोनहि वर्गास जीवनकलहांत जिवापाड मेहनत करावी लागत असे, हें खरें. तथापि प्रत्येक वर्गास मिंधेपणाची भावना मनांत न आणतां सामाजिक कार्यांत **मानानें समान भूमिकेवर** भाग घेतां येत असे.

अशा संघरचनेंत स्त्रीपुरुषांचे लैंगिक संबंध कशा प्रकारचे होते, उत्क्रान्तीच्या वेगवेगळ्या अवस्थांतरांत हे संबंध कसे बदलत गेले, हा बदल स्त्रीवर्गाच्या हिताच्या दृष्टीनें कोणत्या दिशेनें झुकत चालला होता, सध्यांच्या सुधारलेल्या मानवी कुटुंबांत स्त्रियांचें मान्यतेचें व कर्तव्याचें स्थान कोणत्या पायरीवर आहे, तें त्या ठिकाणीं येण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत झाली, इत्यादि प्रश्नांचा खल पुढील प्रकरणांत करूं.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत
(५५४७)
भाव|२३४
भा
२३४

## प्रकरण २ रें

मनुष्याच्या शरिराची उत्क्रान्ति वानराच्या एका जातीपासून पायरीपायरीनें झाली आहे. ही उत्क्रान्ति होत असतां संक्रमणकालांत उद्‌भवलेल्या कांहीं प्राण्यांच्या जाति अद्यापि जंगलांतून सांपडतात. परंतु त्यांपैकीं पुष्कळ जाति कालाच्या ओघांत गडप (Extinct) झाल्या आहेत. अशा रीतीनें कालवश झालेल्या प्राण्यांचे सांगाडे सांपडतात. त्यांवरून या उत्क्रान्तीची संगतवार सांखळी सध्यां अवगत झाली आहे.

तसेंच मागील लेखांत सांगितल्याप्रमाणें समाजरचनेची उत्क्रान्ति जंगली स्थितींतून सध्यांच्या परिणत अवस्थेप्रत येऊन पोंचली आहे. हिंदुस्थान, अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, पॅसिफिक महासागरांतील बेटें, इत्यादि ठिकाणीं सध्यां रानटी जातींची वस्ती आहे. त्यावरून संक्रमित जातींतील समाजरचनेचे नमुने पहावयास सांपडतात. या जातींची भाशा, चालीरीति, नातींगोतीं, दंतकथा, इत्यादिकांचा बारीक अभ्यास करून संशोधकांनीं समाजाच्या उत्क्रान्तीची सांखळी अद्यावत् आणून पोंचविली आहे.

भा २३४

यावरून अवगत झालें आहे कीं, मनुष्यप्राण्यांचा जंगली स्थितींतून रानटी स्थितींत प्रवेश होतेवेळीं तो लहान लहान टोळ्या करून, गवताच्या झोंपड्या बांधून रहात असे. उपजीविकेकरितां त्यास रोजच्या रोज मिळालेली शिकार, कंदमुळें, फळें, मासे यांवर अवलंबून रहावें लागत असे. अन्नसामुग्री मिळवावयाचें काम पुरुषाचें, व मिळविलेली सर्व सामुग्री समाईक असे. अन्नाची

सिद्धि करणें व त्याची वाटणी करणें हीं कामें स्त्रियांचीं व तींहि समाईक असत. अशा समाईक रहाणीच्या पद्धतींत स्त्रीपुरुषांतील व्यवहारहि समाईकच होता. म्हणजे टोळींतील वयांत आलेल्या सर्व पुरुषांचा वयांत आलेल्या सर्व स्त्रियांशीं समाईक व्यवहार असे. या व्यवहारपद्धतींत मत्सरभावाचा अगर हेव्याचा उद्‌भव होणें शक्य नव्हतें. प्राथमिक स्थितींत, मत्सराला प्राधान्य देऊन स्त्री-पुरुषांनीं आपला संसार तुटक चालविण्याचे ते दिवस नव्हते. उदरं-भरण व संरक्षण होण्यास मत्सरासारख्या तुटकपणा उत्पन्न कर-णाऱ्या मनोभावनेची निपज होणें अशा समाजांत विसंगत आहे. या भावनेचा उद्‌भव हा अलीकडच्या काळांतला आहे. तुटकपणानें राहूनहि ज्या वेळीं भोज्य व भोग्य वस्तूंची निपज व आपलें संरक्षण करण्याची शक्यता निर्माण झाली, त्यानंतरच या भावनेचा परिपोष झाला आहे.

वर वर्णन केलेली स्त्रीपुरुषांच्या व्यवहाराची कल्पना प्रथम दर्शनीं जितकी किळसवाणी वाटते, तितकी ती समजण्याचें कारण नाहीं. सध्यांच्या काळीं प्रचारांत असलेल्या छिनालवाड्याच्या अगर वेश्यागृहाच्या दृष्टीनें या व्यवहाराकडे पहाणें हें अन्यायाचें होणार आहे. स्त्रीपुरुषव्यवहाराचें क्षेत्र परिस्थित्यनुरूप आकुंचन पावत सध्यांच्या एकपति अगर एकपत्नी पद्धतीस पोंचल्यावर जे नैतिक व लौकिक निबंध आपल्या अंगवळणीं पडलेले असतात, त्यांचा गंधहि नसलेल्या परिस्थितींत अनिवार्यतेमुळें रूढ झालेल्या प्रकारांत गौणपणा अगर हीनपणा मानला जात नसल्यास त्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. विद्यमान नैतिक कल्पनेप्रमाणें त्या वेळच्या व्यवहारास **स्वैराचार** हें नांव ठेवणें योग्य होणार नाहीं. फार झाल्यास याला **स्वैरविहार** असें नांव देतां येईल. उलट, त्या वेळच्या व्यवहारास 'एष धर्मः सनातनः' असेंच समजलें जात

from Velkar Dictionary —
Consanguinity = relationship by blood
रक्तसंबंध, एका हाडामासाचा संबंध.



असेल. कारण हाच प्रकार त्या वेळीं समाजाचें धारणपोषण करण्यास समर्थ होता.

सध्यांच्या काळीं हा सामाजिक स्त्रीपुरुषव्यवहार रूढ असलेली रानटी जात कोठेंहि उपलब्ध नाहीं. तथापि, अशा पाशवी स्थितींत मनुष्याचा समाज एके काळीं होता, ही गोष्ट सध्या आपणांस कितीहि लज्जास्पद वाटली, तरी ती नाकारतां येणार नाहीं. ही जात सध्यां नष्ट झाली आहे, याचीं अनेक कारणें आहेत. एक तर ही स्थिति फारच प्राचीन काळची होती. तथापि ती नष्ट होण्याचें बलवत्तर कारण असें आहे कीं, इतर प्राण्यांस लागू न होणारा एक जीवनक्रियेचा नियम मनुष्यप्राण्यासच लागू होतो. तो म्हणजे सपिंड शरीरसंबंधाचा घातुकपणा हा होय. पिंड म्हणजे शरीर, रक्त. एका रक्तसंबंधाचे ते सपिंड होत. आईबाप व त्यांचीं मुलें अगर भाऊ व बहीण अशांच्या शरीरसंबंधापासून झालेली संतति ही कमकुवत व अल्पायुषी होते. हा निकट रक्तसंबंध मनुष्यप्राण्याच्यासंबंधानें जितका घातुक होतो, तितका दुसऱ्या कोणत्याहि उत्क्रान्तींतील खालच्या श्रेणींतील प्राण्यांत होत नाहीं. हाच तो शारीरशास्त्रांतील अनिवार्य आणि घातुक नियम होय.

## (१) सपिंड समूहकुटुंबपद्धति
## (Consanguineous Family)

ज्या रानटी स्थितींतील समाजाचा आपण विचार करीत आहों, त्यांत स्त्रीपुरुषांची सरमिसळ सपिंडतेचा विचार न करतां होत असली पाहिजे. निकट रक्तसंबंधाचा अनिष्ट परिणाम मनुष्याच्या ध्यानांत येण्यापूर्वीं आईबाप व त्यांचीं वयांत आलेलीं अपत्यें

अथवा वयांत आलेलीं बंधुभगिनी यांतील अगम्यागमन सध्यांप्रमाणें तिरस्करणीय वाटत नसलें पाहिजे, हें उघड आहे. आईबापांत व वयांत आलेल्या त्यांच्या अपत्यांत सध्यां जाणवणारा वात्सल्यभाव व भावाबहिणींतील बंधुभगिनीप्रेम या उच्च भावनांचा उगम त्या वेळीं झाला नव्हता. या कारणानें या भावनेंतील व विषयवासनेंतील पृथक्‌पणा त्या वेळीं लक्षांत येणें शक्य नव्हतें. या कारणानें अशा संबंधावरच उभारलेली कुटुंबपद्धति प्रथम विचारांत आली. कुटुंबांत आईबाप व त्यांचीं अपत्यें यांतील वयभेद लक्षांत घेतां या दोघांच्या संबंधापेक्षां समवयस्क सख्ख्या अगर चुलत भावां-बहिणींच्या संबंधानेंच ही कुटुंबवृद्धि होत गेली. ही परंपरा शेंकडों वर्षें कायम राहिल्यानंतर सपिंडतेचा अगर निकट रक्तसंबंधाचा विघातकपणा बाधल्याशिवाय कसा राहील? भावाबहिणींच्या संबंधांवर रचलेलीं कुटुंबें हळुहळु कमकुवत होतात, व हा संबंध चुकवून बनलेलीं कुटुंबें सशक्त व पराक्रमी निपजतात, हा अनुभव हजारों वर्षांच्या जीवनकलहांत मनुष्याला आला असला पाहिजे. उत्क्रान्तिक्रियेंतील नैसर्गिक निवडीच्या ( Natural selection ) तत्त्वाप्रमाणें असपिंड स्त्रीपुरुषांचा एकमेकांकडे जास्त ओढा होणें अगर सपिंड स्त्रीपुरुषांना एकमेकांबद्दल तिट-कारा वाटणें या भावना उदित झाल्या असतील अगर जगण्यास पात्र ( Survival of the fittest ) असलेल्यांचाच जगांत निभाव लागतो, या दुसऱ्या एका उत्क्रान्तीच्या तत्त्वाप्रमाणें असपिंड कुटुंबापुढें सपिंड कुटुंबाचा जीवनकलहांत निभाव लागत नाहीं हें कळून आलें असेल. यामुळें सपिंड कुटुंबाचा आस्ते आस्ते नाश होत गेला असला पाहिजे.

याप्रमाणें सपिंड कुटुंबपद्धतीवर उभारलेली कोणतीहि रानटी जात पृथ्वीच्या पाठीवर सध्यां कां हयात नाहीं, याचा योग्य

उलगडा होतो. परंतु असा समाज पूर्वी अस्तित्वांत होता, याबद्दल अतिप्राचीन रोमन व ग्रीक दंतकथांतून व आपल्या पुराणांतून पुरावा मिळतो. आपल्या इकडे फार प्राचीन काळीं विवाहसंस्थाच अस्तित्वांत नसल्याचा उल्लेख महाभारत आदिपर्वांत पंडु व कुंती यांच्या संभाषणांत आला आहे. पंडु कुंतीस सांगतो, "हे सुंदरी, पूर्वी स्त्रिया कळपांतील गायींप्रमाणें स्वैरवर्तन करीत. त्यांस कोणीहि अडथळा करीत नसे. असें असतांहि त्यांस अधर्म घडत नसे. कारण त्या वेळीं तो धर्मच समजला जाई ! हा धर्म सनातन व प्रमाण-दृष्ट सुखप्रद असल्यानें उत्तर कुरुदेशांत सांप्रत याच धर्मानें लोक-व्यवहार चालला आहे." या उताऱ्यावरून पांडवांच्या काळीं कांहीं भागांत गावस्थितींतच समाज होता, असें मानतां येत नाहीं. सपिंड समूहकुटुंबपद्धति ही पांडवांच्या अगोदर फार पूर्वीच नष्ट झाली होती. तथापि त्यानंतर जी असपिंड कुटुंबपद्धति अमलांत आली, त्यांत हीं विवाहबंधनें इतकीं शिथिल होतीं कीं, त्याहि स्थितीस पंडूनें गावस्थिति असें नांव दिलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अशीच दुसरी कथा श्वेतकेतु उद्दालक याची आहे. श्वेतकेतूच्या आईला त्याचा बाप उद्दालक याच्यासमक्ष दुसऱ्या एका तरुणानें हात धरून नेलें. यांत कांहीं गैर आहे, असें त्या वेळीं वाटत नव्हतें. ही सुधारलेली असपिंड कुटुंबपद्धति कशा प्रकारें निर्माण झाली, याचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें आहे.

## (२) असपिंड समूहकुटुंबपद्धति (पुनावली कुटुंब)
## (Punaluan Family)

सपिंडतेचा घातुकपणा लक्षांत आल्यावर त्यासंबंधांत वाटणारा तिटकारा व भीति यांचा परिणाम कुटुंबरचनेवर झाल्या-शिवाय कसा राहील ? प्रथम मातापिता व त्यांचीं अपत्यें यांचा

विवाह संस्थेचा इतिहास ५-९-५९

उ० भाग्या २८५

संबंध तुटला. परंतु भावाबहिणींतील संबंध तुटणें त्यांच्या वयांतील साम्यतेमुळें थोडें जड गेलें असावें. तथापि नैसर्गिक निवडीच्या रेट्यामध्यें याहि संबंधास आळा पडून कुटुंबरचनेंतील दुसऱ्या पायरीस आरंभ झाला. प्रथम सख्ख्या भावाबहिणींच्या संबंधास बंदी व पुढेंपुढें दूरदूरच्या चुलत भावाबहिणींच्या बाबतींतहि बंदी होत गेली. या बंदीचें क्षेत्र वाढून त्याचा अंमल मनुष्यांच्या आचारांवर इतका प्रभावी झाला कीं, ही बंदी मुळांत रक्तमिश्रणाचा परिणाम चुकविण्याकरितां केली आहे, ही गोष्ट विसरून केवळ बंधुभगिनीभावनेलाच प्राधान्य मिळत चाललें. गुरुकन्या देवयानी व कच यांचा संबंध रक्तानें बंधुभगिनींचा नव्हता; परंतु केवळ गुरुकन्या या नात्यानें "तूं माझी बहीण आहेस, बहिणीशीं लग्न करतां येत नाहीं," अशी कचानें त्या विवाहास हरकत घेतली आहे.

सपिंड कुटुंबाचें असपिंड कुटुंबांत कसें परिवर्तन होत गेलें, तें आतां पाहूं. प्राथमिक अवस्थेंतील सपिंड कुटुंबाची वाढ होत कांहीं मर्यादेच्या पलीकडे गेल्यावर त्यांपैकीं कांहीं व्यक्तींस विभक्त झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असा प्रसंग यावयाचाच. अशी वांटणी होतेवेळीं असपिंड कुटुंबाचा पाया घालण्याची संधि त्यांस मिळाली. मूळ कुटुंबांतील कांहीं बहिणींनीं, नात्यानें भाऊ नसलेल्या बाहेरच्या पुरुषांबरोबर संसार थाटला. त्याचप्रमाणें मूळ कुटुंबांतील कांहीं भाऊ वेगळे होऊन, नात्यानें बहिणी नाहींत, अशा बाहेरील स्त्रियांबरोबर वेगळा संसार चालवूं लागले. अशा रीतीनें फाळणी होत असलेलीं कुटुंबें पॅसिफिक महासागरांतील हवाई बेटांत गेल्या पाऊणशें वर्षांपर्यंत होतीं. बहिणींबरोबर संसार करणारे पुरुष नात्यानें परस्परांचे भाऊ नसल्यानें ते एकमेकांस "पुनालुवा" म्हणजे निकट सोयरा या नात्यानें संबोधीत असत. त्याचप्रमाणें भावांच्या कुटुंबांतील बाहेरून

आणलेल्या स्त्रिया ह्या एकमेकांच्या बहिणी नसल्यामुळें त्याहि एकमेकींस पुनालुवा म्हणत. अशा कुटुंबास मॉर्गनसाहेबानें पुनालवी ( Punaluan family ) असें नांव दिलें आहे. अशा कुटुंबांत जेवढ्या स्त्रिया असत, तेवढ्या सर्व समाईकपणें सर्व पुरुषांच्या बायका. या बायकांच्या पोटीं होईल, ती कुटुंबाची समाईक प्रजा. हीं मुलें वयांत आल्यावर त्यांपैकीं मुलींचा संबंध भावांशीं टाळण्याकरितां बाहेरील पुरुषास कुटुंबांत सामील करून घेण्यांत येत असे आणि मुलांस आपल्या आईचें कुटुंब सोडून दुसऱ्या कुटुंबांत जावें लागत असे.

पुनालवी कुटुंबांत सपिंडतेचा दोष घालविण्याचा अशा रीतीनें प्रयत्न केला, तरी त्यांतील समूहविवाहपद्धतीमुळें तो तितकासा समाधानकारक नव्हता. आईबापांच्या रक्तांत यापेक्षा जास्त विषमता असण्याची जरुरी भासूं लागली व कालांतरानें जास्त कार्यक्षम व आटोपशीर अशी नवीन रचना अस्तित्वांत झाली. या नवीन रचनेचा सविस्तर उल्लेख पुढें येईल. परंतु तो करण्याच्या अगोदर पुनालवी कुटुंबपद्धतींत नातींगोतीं कशीं रूढ झालीं हें पहाणें अवश्य आहे. कारण एक महत्वाची गोष्ट अशी आहे कीं, कांहीं कारणामुळें कुटुंबाची आंतररचना बदलत गेली, तरी ज्या नांवानें पूर्वीच्या कुटुंबपद्धतींत एकमेकांना संबोधीत असत, तींच नात्यांचीं नांवें पुढें अनेक शतकें नवीन कुटुंबरचनेंत चालूं रहातात. त्यामुळें नवीन रचनेंतील प्रत्यक्ष नातीं वेगळीं व हांका मारावयाचीं नातीं वेगळीं, असा विपरीत प्रकार दिसून येतो. परंतु याचा समाधानकारक उलगडा पूर्वींची कुटुंबरचना लक्षांत घेतल्यावर होतो व नवीन रचनेवर ऐतिहासिक प्रकाश पडतो. पुनालवी कुटुंबांत एका शाखेची उत्पत्ति बहिणीबहिणींच्या पोटीं समाईक पतीपासून झालेली असते. त्यामुळें या संबंधापासून झालेलीं मुलें एकमेकांस

भाऊबहीण या नात्यानें ओळखतात व आपल्या आयांच्या सर्व बहिणींस ते आयाच म्हणतात. त्याचप्रमाणें दुसऱ्या शाखेंतील प्रजा ही भावाभावांपासून समाईक अशा अन्य स्त्रियांच्या पोटीं झाली असल्यानें तीं एकमेकांस भाऊबहीण या नात्यानेंच हांका मारतात व बापाच्या सर्व भावांस ते बाबा म्हणतात. परंतु पहिल्या शाखेंतील आया त्यांच्या भावाच्या म्हणजे दुसऱ्या शाखेंतील मुलांस पुतण्या अगर पुतणी म्हणतात. त्याचप्रमाणें दुसऱ्या शाखेंतील बाप त्यांच्या बहिणीच्या म्हणजे पहिल्या शाखेंतील मुलांस पुतण्या अगर पुतणी असें संबोधतात. याच नात्याची उलट मांडणी केल्यास पहिल्या शाखेंतील सर्व स्त्रिया आपल्या बहिणीच्या मुलांस आपलीं मुलें असें म्हणतात व दुसऱ्या शाखेंतील पुरुष आपल्या भावांच्या मुलांस आपलीं मुलें असें संबोधतात.

हीं सर्व नातीं पुनालवी कुटुंबरचनेंत अगदीं योग्य आहेत. परंतु लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी आहे कीं, मागें सूचित केल्याप्रमाणें ही समाईक पतिपत्नींची कुटुंबरचना बदलून 'एक एव पतिर्नार्याः' एका वेळीं एका स्त्रीस एकच पति असावा, अशी नवीन कुटुंबरचना अमलांत आल्यानंतर हीं वरील पुनालवी नातीं अगदीं तंतोतंत जशींच्या तशीं शेंकडों प्रकारांत चालू असलेलीं आढळून येतात. यामुळें प्रथम प्रथम संशोधकांचा गोंधळ उडून गेला होता. परंतु पुनालवी कुटुंबपद्धतीचा शोध लागल्यानंतर हा सर्व गोंधळ एकदम मावळून कुटुंबरचनेंत झालेल्या स्थित्यंतराची सांखळी अखंड जमून आली. हा नात्यागोत्याचा पुनालवी प्रकार एकहि अपवाद न सांपडतां अमेरिका खंडांतील सबंध रेड इंडियन जातींत दिसून येतो. इतकेंच नव्हे, तर आपल्या दक्षिण हिंदुस्थानांतील द्राविडी आणि तामीळ मूळ रहिवाशांत आणि उत्तर हिंदुस्थानांतील गोंड जातींत हीं नातीं तंतोतंत शेंकडों तपशिलांत जशींच्या तशीं

'पुनालवी' प्रकारचीं अद्याप आहेत. इतक्या विस्तृत भूपृष्ठावरून पसरलेला हा नात्याचा प्रकार केवळ काकतालीय न्यायानें जमून आला असेल, असें समजणें हें अगदीं असमंजसपणाचें व हटवादी-पणाचें होणार आहे. या नात्यांच्या रूढीमागें तसेंच बलवत्तर ऐतिहासिक कारण असलें पाहिजे हें उघड आहे, व या पुराव्यावरून सध्यांच्या काळीं अनेक रानटी जातींत व बऱ्याच नागरी स्थितींतील देशांत जी एकपति-कुटुंबसंस्था जारी आहे, त्याच्या अगोदर या जातींत व देशांत फार प्राचीन काळीं पुनालवी कुटुंबसंस्था रूढ होती, हें निश्चित होत आहे.

या पुनालवी कुटुंबांत मुलाचा बाप कोण हें अनिश्चित असतें; परंतु मुलाची आई कोण, हें निश्चित असल्यामुळें अशा कुटुंबांत वंशपरंपरा ही आयांकडून धरली जाते. बहुतेक सर्व जंगली जातींत व खालच्या पायरीवर असलेल्या वन्य जातींत ही मातृ-परंपराच रूढ झालेली आढळून येते. याचें कारण हें असें आहे. या मातृपरंपरेस 'Maternal Law' असें म्हणतात; व कुटुंबां-तील मूळ पूर्वजाचा मान मातेसच देण्यांत येतो. पुनालवी कुटुंबाच्या शाखेंत जन्मास आलेलीं मुलें एकाच रक्तसंबंधाचीं असल्यामुळें एकाच मूळ पूर्वजाची प्रजा अशी समजली जाते, व पुढें कितीहि पिढ्या गेल्या, तरी या कुटुंबांत केव्हांहि परस्पर-संबंध होतां कामा नये, असा कटाक्ष कायम होतो. अशा निकट रक्तसंबंधी नातेवाइकांच्या समूहास आपल्या आर्य लोकांत सगोत्रिक अथवा एकाच गणांतील (एकच गणगोत असलेले) असें मानण्यांत येऊं लागलें व ग्रीक आणि रोमन लोकांत अशा समूहास 'Gens' अशी संज्ञा असे. गोत्र या शद्बांत समाईकपणें गायी बाळगणारा समूह असा अर्थ आहे; व जेन अगर गण या

शद्वांत जन (उत्पन्न करणें) या संस्कृत धातूपासून झालेला, एकाच पूर्वजापासून झालेली जनता असा अर्थ आहे. त्यानंतर पुनालवी कुटुंबपद्धतींत बदल होऊन त्यानें तिसरी पायरी कशी गांठली, तें पाहूं.

## ( ३ ) दांपत्य कुटुंबपद्धति
## ( Pairing Family )

रक्तसंबंधी माणसास दूर ठेवण्याची प्रवृत्ति प्रबळ होऊन ती पसरत गेल्याप्रमाणें निषिद्ध माणसांचें क्षेत्र वाढत गेलें व एकंदर समाईक विवाहपद्धतीलाच आळा बसत चालला. याचा परिणाम असा झाला कीं, एक वेळ विवाहयोग्य स्त्रीपुरुषांचा संबंध जुळून आल्यावर तो फार दिवस टिकत जाऊं लागला आणि वर उल्लेखिलेल्या कुटुंबपद्धतीचा पुरस्कार होत गेला. अशा कुटुंबांत पुरुष एकाच स्त्रीबरोबर अशा रीतीनें रहात असे कीं, तेवढ्या वेळेपुरतें स्त्रीनें मात्र अन्य पुरुषाची अपेक्षा करतां कामा नये. परंतु पुरुषास मात्र वेळींप्रसंगीं अविवाहित स्त्रियांशीं व्यभिचार करण्याची मोकळीक असे. तथापि या दांपत्यास कोणत्याहि एका पक्षाच्या मर्जीप्रमाणें लग्न मोडतां येत असे. तसें झाल्यास त्यांना झालेलीं मुलें आईच्या स्वाधीन, आईच्या कुटुंबांतच रहावयाचीं. अशा रीतीनें एकपतिविवाह रूढ होत चालला तरी हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, तसें होण्यास वधूवरांतील प्रेमसंबंध फारसा नसे. ही उत्कट प्रेमाची कल्पना व त्याची लग्नसंबंधांत अपेक्षा हीं अगदीं अलीकडील काळांतील आहेत. फार प्राचीन काळापासून व अद्यापीहि आपल्यांत व कांहीं अंशीं युरोपियन लोकांतहि वधूवरांची पसंती ही वधूवरांच्या आईबापांकडेच आहे. "दांपत्यविवाहपद्धती"च्या प्राथमिक अवस्थेंत

 नगर वाचनालय, सातारा

तर आम्हीं समजतों अशा प्रेमसंबंधाचा मागमूसहि नव्हता. अमेरिकन, रेड इंडियन व तत्समान इतर रानटी जातींत ज्यांचा लग्नसंबंध जोडावयाचा, त्या वधूवरांस, समारंभाच्या वेळेपर्यंत आपलें कोणाशीं लग्न व्हावयाचें, याची दखलगिरी असत नाहीं. अशा समारंभाच्या वेळीं वरानें वधूची आई, मामा वगैरे आईकडील नातेवाइकांस ( वधूच्या बापास अगर त्याच्या नातेवाइकांस नव्हे ) कांहीं आहेर करावयाचे आणि वधूच्या कुटुंबांत जाऊन रहावयाचें, अशी वहिवाट आहे. हें लग्न दोघांपैकीं कोणाच्याहि मर्जीप्रमाणें मोडलें जातें मुलें झालीं असल्यास तीं आईच्या स्वाधीन रहातात आणि दोघांसहि नवीन लग्नसंबंध करण्यास मोकळीक असते.

लग्न झालेल्या दांपत्याचा संसार जरी पृथक् चालत असला तरी त्यास एकंदर गणगोत सोडून स्वतंत्र संसार करणें त्या वेळीं शक्य नव्हतें. गणगोतांतील समाईक रहाणी ( Primitive communism ) त्यांस कायम ठेवावी लागत असे. अन्नाचें उत्पादन, पाकसिद्धि व कुटुंबरक्षण हीं कामें समाईक असत. अशा कुटुंबांत वंशपरंपरा मातेकडून चालू असल्यामुळें त्यांत स्त्रियांचें स्वातंत्र्य व मातेचा दर्जा सर्वांत मोठा असणें अपरिहार्य होतें. अमेरिकन इंडियनांपैकीं "सानिका" जातींत मिशनरी या नात्यानें रहाणाऱ्या आर्थर राइट यानें त्या जातींतील स्त्रीवर्गासंबंधानें काय उद्गार काढले आहेत, ते लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. तो म्हणतो,

" या जातीचीं अनेक कुटुंबें अद्याप एकत्र रहातात. या सर्वांत स्त्रियांचें वर्चस्व असतें. कुटुंबातील उपवर वधूकरितां अन्य कुटुंबांतील वराची निवड करणें हें स्त्रियांचें काम. कुटुंबास समाईक रीतीनें लागणारे सर्व खाद्य पदार्थ पुरुषानें सहकार्यानें मिळवून आणावयाचे,

पण एखाद्या मुलीच्या नवऱ्यानें कामांत अंगचोरपणा केल्यास त्यास तावडतोब स्त्रियांकडून ताकीद मिळाल्याशिवाय रहात नाहीं. इतकेंहि करून तो आळशी राहूं लागला, तर त्यास त्या वेळीं कितीहि मुलें झालीं असलीं, तरी तीं सर्व मागें ठेवून आपलें चंबूगबाळें घेऊन एकटें कुटुंबातून चालतें व्हावें लागतें. त्यानंतर त्याला आपल्या जन्मकुटुंबांत तरी रहावें लागतें अगर दुसऱ्या कुटुंबांत बायको मिळून त्या कुटुंबांत जावें लागतें. स्त्रियांची सत्ता कुटुंबांत एवढी असते कीं, त्यांना पुरुषांपैकीं नायक जो असतो, त्याची सत्ता काढून घेऊन त्यास सामान्य पुरुषांत ढकलतां येतें."

अशा गणगोतांतील सर्व स्त्रिया एकाच रक्तसंबंधाच्या असत व त्यांत बाहेरून आलेले पुरुष अन्य गोतांतील असत. त्यामुळें सर्व वन्य जातींत स्त्रियांचा सामाजिक दर्जा उच्च प्रकारचा आढळून येतो. रानटी स्थितीमध्यें अशा स्त्रियांस जिवापाड कष्ट करावे लागत, हें खरें; तथापि त्यांना समाजांत माता या दृष्टीनें जो आदर व बहुमान मिळतो व पुरुषांच्या बरोबरीनें जबाबदारी उचलावी लागते, त्यामुळें त्यांस कुटुंबाच्या क्षेत्रांत जी सत्ता उपभोगावयास मिळते, ती एका बाजूला व सध्यांच्या आपल्या समाजांत स्त्री-संबंधानें दाखविण्यांत असलेलें पोकळ व दांभिक स्त्रीदाक्षिण्य आणि सामाजिक व कौटुंबिक जबाबदारींतून मुक्त झाल्यामुळें आलेली निष्क्रियता व सत्ताहीनपणा हीं दुसऱ्या बाजूला, यांची तुलना केल्यास काय निष्कर्ष निघतो, हें पहाणें आम्ही आपल्या स्त्रीवर्गावरच सोंपवतों.

असो, महत्त्वाची गोष्ट अशी कीं, सपिंडतेमुळें होणारा वंश-क्षय चुकविण्याकरितां मनुष्यप्राण्यानें परिस्थितीस अनुसरून जीवन-कलहांत उत्क्रान्ति घडवून आणली असून कुटुंबरचनेंतील अवस्था-

तरांतून निष्प्रतिबंध स्वैराचारास क्रमाक्रमानें आळा बसवीत आणला आहे. या क्रियेंत जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग करावा लागला असेल, त्यांत पुरुषवर्गाचा भाग किती व स्त्रियांचा भाग किती, यांची तुलना केल्यास ही महत्वाची कामगिरी स्त्रियांनींच मुख्यत्वेंकरून घडवून आणली आहे, असें दिसून येईल.

जंगली स्थितींत ज्या वेळीं स्त्रीपुरुषांत स्वैरविहार असे, त्या वेळीं प्रत्येक टोळींत थोडींच माणसें असल्यामुळें व सर्वांसच सारा दिवस जिवापाड मेहनत करावी लागत असल्यामुळें या स्वैर-विहाराचा स्त्रियांवर अतिरेक अगर दुष्परिणाम होण्याचा संभव नव्हता. अशा नैसर्गिक स्थितींतील स्वैराचाराकडे सध्यांच्या छिनाल-वाड्यांतील वेश्याव्यवसायाच्या दृष्टीनें न पहाण्याविषयीं मागें आम्हीं सूचना दिलीच आहे. तथापि या प्राथमिक जंगली स्थितींत सुधारणा होत जाऊन टोळ्यांतील माणसांची संख्या वाढत गेल्यानंतर हा स्वैरविहार स्त्रियांच्या संबधानें अडचणीचा आणि अपायकारक होत गेला असला पाहिजे. अशा परिस्थितींत सपिंडतेनें होणारा वंशक्षय टाळण्याची जेव्हां वेळ येऊन ठेपली व कुटुंबरचनेंत त्याकरितां बदल करण्याची वेळ आली, त्या वेळीं स्वैरविहारास आळा घालण्याच्या कामांत स्त्रियांनीं आपल्यावरील अत्याचार चुकवण्याकरितां स्वखुषीनें पुढाकार घेतला असला पाहिजे, हें उघड आहे. केवळ पुरुषवर्गावर ही कामगिरी सोंपविली असती तर हें काम कधींच घडून आलें नसतें. कारण पुरुषवर्गानें स्वैरविहारांत मिळालेल्या सवलतींवर व बेफाम भोगेच्छेवर आपण होऊन आळा घालण्याची तयारी आज-पर्यंत कधींच दाखवली नाहीं. ज्या ज्या वेळीं स्वैरविहारास निर्बंध घालण्याची पाळी येई, त्या त्या वेळीं त्या निर्बंधांची अंमलबजावणी

स्त्रियांवर कडक रीतीनें करण्यांत येऊन पुरुषांनीं त्यांतून पळवाट काढण्याची खबरदारी ठेवली आहे. परंतु आपली सोडवणूक करून घेण्याची संधि स्त्रियांना मिळाल्याकारणानें त्यांनीं प्रथम या निर्बंधांचें स्वागत खुषीनें केलें असलें पाहिजे, हें खास.

सारांश, येथपर्यंत झालेल्या प्रगतीचें श्रेय कोणालाहि दिलें तरी एकंदर मनुष्यांच्या कुटुंबरचनेंत महत्वाची सुधारणा व स्थिरस्थावर होऊन स्त्रीपुरुषांचा संबंध गावस्थितीपासून, 'एक एव पतिर्नार्याः' एका स्त्रीस एका वेळीं एकच असपिंड पति असावा येथपर्यंत त्या प्रगतीची मजल येऊन ठेपली. शिवाय वंशवृद्धि ही मातृपरंपरेवर ( Maternal law ) स्थिर झाली. हीं सर्व परिवर्तनें कांहीं अंशीं उपजीविकेच्या साधनांतील प्रगतीमुळें झालीं असलीं, तरी त्यांस बलवत्तर कारण वंशक्षयाची आपत्ति टाळणें हें होतें. केवळ **सपिंडता टाळणें** एवढेंच कार्य सिद्ध करावयाचें असतें, तर झाली एवढी प्रगति समाधानकारक होती. त्याचप्रमाणें त्या वेळच्या उपजीविकेच्या परिस्थितीचा विचार करतां कुटुंबांतील सामाजिक **श्रमविभागणी** पुरुष व स्त्रीवर्गांत समाधानकारक झाली होती. रणांत पराक्रम करून शत्रूंचा नाश करावा, रानांत शिकार करावी, मासे धरावे, कंदमुळें गोळा करावीं व या वेगवेगळ्या व्यवसायांकरितां हत्यारें बनवावीं, हीं कामें पुरुषांकडे असत. गृहांची सर्व व्यवस्था पहावी, अन्न व वस्त्रें तयार करावीं, मुलांची जोपसना करावी व एकंदर वंशवृद्धीची काळजी घ्यावी, हीं कामें स्त्रियांकडे असत. पुरुष रानावनाचा स्वामी तर स्त्री गृहाची स्वामिनी. प्रत्येकास आपआपल्या क्षेत्रांत पूर्ण स्वातंत्र्य व आपल्या सामर्थ्याचा विकास करण्यास व मानानें आयुष्य कंठण्यास पूर्ण मोकळीक असे. युद्धोपयोगी व शिकारीच्या हत्याराचें स्वतंत्र

... वाचनालय, सातारा



मालक पुरुष; घरगुती सामान, माग, भांडीकुंडीं, किडुकमिडुक यांची स्वतंत्र मालकी स्त्रियांकडे. खाणेंपिणें, घराचा आसरा, सर्वांना समाईक. कोणी कोणाचा ना मालक, ना कोणी कोणाचा चाकर. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांवर रचलेली ही कुटुंबसंस्था अस्तित्वांत असतां पुढच्याच युगांत यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणें या कुटुंबरचनेंत आमूलाग्र फरक घडून आले. स्त्रियांवरील एकपतिव्रताची बजावणी अत्यंत कठोरपणानें करण्यांत येऊं लागली; पण पुरुषास एकाच वेळीं अनेक स्त्रिया करणें व प्रसंगविशेषीं व्यभिचार व वेश्यागमन इत्यादि हक्क मिळाले. मातेकडून धरावयाची वंशपरंपरा नष्ट होऊन ती पित्याकडून धरण्याची प्रथा (Paternal Law) दृढ झाली. कुटुंबांतील जेवढी म्हणून जिंदगी ती यच्चयावत् पुरुषाच्या एकट्याच्याच मालकीची झाली. बायकांचा सुतळीच्या तोड्यावरहि हक्क नाहीं, एवढेंच नव्हे तर बायको म्हणजे एक चालतीबोलती पुरुषाची जिंदगी असें मानण्यांत येऊं लागलें. सारांश, सामाजिक जीवनांत स्त्रीचें काडीचेंहि महत्व राहिलें नाहीं, अशी विपरीत स्थिति निर्माण झाली !! या स्थित्यंतरास तसेंच कांहींतरी बलवत्तर ऐतिहासिक कारण असलें पाहिजे, हें निश्चत आहे. पण या सर्व महत्वाच्या गोष्टींचा खल आम्ही पुढील प्रकरणांत करणार आहों.

# प्रकरण ३ रें

---

वरच्या पायरीवर गेलेल्या रानटी जातींतील कुटुंबरचना व त्यांतील स्त्रीपुरुषांचा परस्पर सामाजिक दर्जा यांचें वर्णन मागील प्रकरणांत आलें आहे. युरोपियन लोकांचा अमेरिका खंडांत प्रवेश होण्यापूर्वी तेथील रानटी जातींत तंतोतंत अशीच स्थिति होती. परंतु त्यानंतर वरिष्ठ संस्कृतीच्या लोकांशीं गांठ पडल्यामुळें अमेरिकेंतील मूळ रहिवाशी लोकांची उत्क्रान्ति एकदम खुंटली. एवढेंच नव्हे, तर या विषम संस्कृतीच्या झगड्यांत हीन संस्कृतीचा जवळ जवळ निःपात होऊन गेला.

यास्तव मागील प्रकरणाच्या शेवटीं सूचित केलेली कुटुंबरचनेंतील क्रान्ति व स्त्रीवर्गाचा अधःपात यांचा माग काढणें झाल्यास आपणांस पूर्वगोलार्धांत पूर्णतेस आलेल्या संस्कृतीकडेच लक्ष द्यावें लागेल. उपजीविकेच्या साधनांत पूर्व व पश्चिम गोलार्धांत कोणकोणत्या बाबतींत अंतर आहे, हें पूर्वी सांगितलेलें आहे. आपल्या पूर्वगोलार्धांत उपलब्ध होणारीं धान्यें व विशेषेंकरून गायी, शेळ्या, मेंढ्या, उंट, घोडे, डुकरें इत्यादि पाळण्यास योग्य असलेलीं जनावरें यांची समृद्धि असल्यामुळें इकडे मनुष्यांच्या संपत्तींत अपूर्व भर पडली व कुटुंबरचनेंतहि त्यामुळें आश्चर्यकारक फरक घडून आले. हिंदुस्थानांतील सिंधु, गंगा, यमुना इत्यादि नद्यांच्या तटाकीं व मध्यएशियांतील युफ्राटिस व टैग्रिस नद्यांच्या काठीं आर्य व सेमेटिक लोकांत जनावरें पाळणें हाच महत्वाचा धंदा होऊन बसला. ही जीवसंपत्ति (गोधन) अशा प्रकारची होती कीं, ती पाळण्यास अगर तिची झपाट्यानें वाढ करण्यास मुळीच श्रम करावे लागत नसत. या मोठमोठ्या नद्यांच्या कांठीं असलेल्या विस्तीर्ण व सुपीक कुरणांमधून

या जनावरांच्या कळपास चरण्यास आयती सोय झाल्यामुळें दूध-दुभतें व मांस यांची चंगळ झाली व पूर्वीच्या काळीं उपजीविकेस अवश्य असलेला शिकारीचा धंदा हें आतां चैनीचें व करमणुकीचें साधन होऊन बसलें.

याप्रमाणें संपत्तींत महत्त्वाची भर पडली हें खरें; पण या संपत्तीची मालकी कोणाकडे ? यापूर्वीच्या काळांत संचित संपत्ति अशी कांहींच नसे. परंतु ती आतां सांठूं लागल्यावर वास्तविक ती कुटुंबाची समाईक अशी समजावयास पाहिजे होती. पण तशी ती न समजली जातां लवकरच तिला वैयक्तिक खासगी मालमत्तेचें स्वरूप आलें. हें रूपान्तर होण्याचें कारण असें कीं, पूर्वीपासून रानावनांतील कारभार पुरुषांचा व गृहांतील कारभार स्त्रियांचा अशी स्वाभाविक वांटणी झालीच होती. त्यामुळें रानावनांत राहून जनावरांची जोपासना, वाढ व संरक्षण करणाऱ्या पुरुषवर्गाकडेच या संपत्तीची मालकी जाणें हें अपरिहार्य होतें. त्यांत लांबलांब पसरलेले वेगवेगळे कळप राखण्याचें काम ज्यांच्याकडे गेलें ते त्या कळपाचे अखेर खासगी मालक बनले. यानंतर गोधनाशिवाय संपत्ति जमा होण्याचे अनेक मार्ग हळुहळू निर्माण झाले. तांबें, कथील, लोखंड या धातूंचीं हत्यारें बनविणें, मागावर जाडेभरडें कापड विणणें, व पुढें शेती करून धान्य उत्पन्न करणें इत्यादि उद्योगधंदे चालू लागले. तथापि अंगमेहनतीनें बनविलेल्या जिनसांपेक्षां शेळ्या, मेंढ्या, गायी, बैल इत्यादि जनावरांची वाढ झपाट्यानें व बिनसायासानें होत गेल्यानें गायींचे, मेंढ्यांचे कळप ( गोधन ) हीच मुख्य संपत्ति समजली जाई. सध्यांच्या व्यापारी युगांत नाण्याचा उपयोग जसा होतो तसा त्या वेळीं मालाच्या देवघेवींत गायींचा उपयोग होत असे. आपल्या विवाहपद्धतींपैकीं— अगदीं प्राचीन " आर्ष " (ऋषींसंबंधीं) पद्धतींत

वराकडून एक बैलाची जोडी घेऊन त्याला कन्या देणें असा प्रकार होता. गोधन हरण केल्याबद्दल महाभारतकाळीं युद्धें होत असत. गोधन ही प्रत्येकाची खासगी मालमत्ता समजली जाऊं लागल्यानें त्याच्या अदलाबदलींत इतर उद्योगधंद्यांची वाढ झाली व मनुष्याच्या रहाणीवर त्यामुळें गंभीर स्वरूपाचा बदल होत चालला. तथापि गोधन व त्यांनीं मिळवलेली इतर संपत्ति याची मालकी पुरुषवर्गाकडेच राहिली. याचा परिणाम प्रत्यक्ष कुटुंबरचनेवर काय झाला हें पुढें सांगावयाचें आहे. परंतु सध्यांच्या प्रसंगीं सांपत्तिक वाढीचा परिणाम एका वेगळ्या अनिष्ट दिशेनें प्रकट होऊं लागला, त्याची हकीगत या ठिकाणीं सांगणें अगत्याचें आहे.

कुटुंबांतील माणसांच्या वाढीपेक्षां जनावरांची वाढ झपाट्यानें होऊं लागली. कळपांची निगा राखण्यास माणसांचा तुटवडा पडूं लागला. त्याचप्रमाणें हस्तकौशल्याचीं कामें करणाऱ्या कारागिरांची तेजी होत चालली. कारण माणसांच्या उपजीविकेस लागणाऱ्या पदार्थांच्या किमतीपेक्षां त्यांच्या मेहनतीवर संपत्तीची जास्त पैदास होऊं लागली. अशा रीतीनें भासूं लागलेली माणसांची उणीव युद्धांत पादाक्रान्त केलेल्या माणसांस दास अथवा गुलाम करून भरून काढण्याची प्रथा सुरू झाली. फार प्राचीन काळीं आत्मसंरक्षणाकरितां कराव्या लागत असलेल्या युद्धांत सांपडलेल्या माणसांची कत्तल करावी लागत असे. कारण त्या वेळच्या परिस्थितींत जास्त माणसांची अगर नोकरांची त्यांस गरज नव्हती. परंतु या वेळीं बदललेल्या सांपत्तिक परिस्थितींत युद्धांत मिळालेल्या कैद्यांस गुलाम म्हणून राबवून आपल्या संपत्तींत वाढ करण्याची सोय झाली होती. शिवाय जनावरांच्या वाढीप्रमाणें गुलाम बनलेल्या स्त्रीपुरुषांत वाढ होत गेल्यानें ही गुलाम बाळगण्याची संस्था सर्वत्र कायम झाली.

अशा अनेकविध मार्गांनीं संपत्तीची वाढ होत गेल्यानें व ती संपत्ति खासगी मालमत्ता अशी समजली गेल्यानें त्या वेळच्या मातृपरंपरेंत व दांपत्यकुटुंबपद्धतींत क्रांतिकारक फेरफार घडून आले. दांपत्यकुटुंबांतील पूर्वापार वहिवाटीप्रमाणें विवाहित स्त्री-पुरुषांस आपखुषीनें केव्हांहि विवाहसंबंध तोडतां येत असे. त्यामुळें पुरुषास कुटुंबांतून बाहेर पडण्याचा प्रसंग आल्यास उपयोगी पडावीं म्हणून शिकारीचीं, युद्धाचीं हत्यारें वगैरे जिन्नस त्यास आपल्या मालकीचे राखून ठेवावे लागत असत. त्याच परंपरेस अनुसरून आतांच्या वेळीं त्यांच्या ताब्यात असलेले जनावरांचे कळप व त्यावर खरेदी केलेले जिन्नस व गुलाम ही महत्वाची संपत्ति पुरुषांच्याच मालकीची झाली. पूर्वी पुरुषांची स्वतःची अशी फारशी संपत्ति नव्हती. त्या वेळीं त्यांस घरांतील स्त्रियांचें वर्चस्व कबूल करून स्वतःस दुय्यम दर्जा पत्करावा लागत असे. परंतु संचित संपत्तीचा धनि पुरुष झाल्यानंतर व जनावरें, हत्यारें, दासदासी यांचाहि मालक तोच ठरल्यानंतर घरांतील स्त्रियांचें वर्चस्व स्वाभाविकपणेंच कमी झालें व पुरुषास आपल्या पोटच्या मुलास आपल्यामागें जिदगी मिळावी अशी इच्छाहि उत्पन्न झाली. 'पुनालवी' कुटुंबपद्धतींत मुलाचा नक्की बाप कोण हें समजण्याचें साधन नव्हतें. परंतु आतांच्या दांपत्य-पद्धतींत मुलाचा बाप नक्की ठरला गेला. तथापि त्या वेळीं वंश-परंपरा मातृक असल्यामुळें मृत्यूनंतर अशा पुरुषाची जिदगी त्याच्या औरस मुलास मिळण्याची सोय नव्हती. कारण हा मुलगा आईच्या गणगोतांतील. आईची चीजवस्त असेल तिचाच तो वारस. पण बाप दुसऱ्या गणगोतांतील. बापाची जिदगी त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या जन्मदात्या गणगोतांत त्याच्या भावास- बहिणीस व तिच्या मुलांस अगर त्याच्या आईच्या बहिणीस मिळत असे. त्याच्या जिदगीवर वारसा नसे.

त्या वेळच्या बदललेल्या परिस्थितींत स्त्रीपेक्षां पतीची जिंदगी अनेक पटीनें जास्त झाली होती. त्याचप्रमाणें स्त्रीस झालेलीं मुलें कोणत्या पुरुषाच्या पोटचीं हेंहि निश्चित झालें होतें. पण पोटच्या मुलाला आपल्यामागें आपली संपत्ति मिळावी ही नैसर्गिक इच्छा तृप्त होण्यास मातृक परंपरेमुळें मार्ग नाहीं, असा विपरीत प्रसंग आला. त्यामुळें कुटुंबांत असंतोष व धुस-फुस सुरु होणें अगदीं स्वाभाविक होतें. या झगड्यांत संपत्तीच्या श्रेष्ठपणामुळें मिळालेल्या सत्तेच्या आधारावर पुरुषवर्गानें मातृ-परंपरा नष्ट करुन पितृपरंपरा अमलांत आणली. यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. परंतु ही क्रांतिकारक घटना विशेष तीव्र स्वरुपाच्या झगड्याशिवाय कशी अमलांत आली हें पहाणें मनोवेधक आहे.

वंशपरंपरेच्या या अदलाबदलींत फक्त एका विवक्षित समजुतींत अगर रुढींत बदल केला कीं ही गोष्ट साध्य होण्याजोगी होती. ती गोष्ट अशी. मातृपरंपरेच्या कोणत्याहि गणगोतांत जन्मलेल्या अपत्यापैकीं मुलींना विवाहबद्ध झाल्यावरहि त्याच गणगोतांत रहावें लागत असे. पण तिच्या भावास मात्र अन्य गणगोतांत विवाह करुन त्यांत सामील व्हावें लागत असे. मुलीस झालेलीं अपत्यें मुलींच्या गणगोताचीं व तिच्या भावाचीं अपत्यें तिच्या भावाच्या म्हणजे अन्य गणगोताचीं समजलीं जात. परंतु आतां बदललेल्या अडचणीच्या परिस्थितींत एवढेंच करावें लागलें कीं, मुलीचीं अपत्यें तिच्या पतीच्या म्हणजे अन्य गणगोताचीं समजण्यांत येऊं लागलीं व तिच्या भावाचीं परक्या गणगोतांतील अपत्यें भावाच्या जन्म-दात्या गणगोताचीं समजण्यांत येऊं लागलीं. बापाची जिंदगी त्या वेळीं आईपेक्षां मोठी असल्यानें अशा व्यवस्थेस कोणाचीहि फारशी हरकत येण्याचें कारण नव्हतें.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



या बदलावदलीचा उघड परिणाम इतउत्तर असा झाला कीं, वंशपरंपरा पूर्वी जी आईकडून धरली जात असे ती बापाकडून धरली जाऊं लागली व साहजिकच बापाच्या मालमत्तेचा वारस त्याचा औरस मुलगाच ठरला. हा अत्यंत महत्त्वाचा फेरफार ऐतिहासिक कालाच्या किती अगोदर झाला हें नक्की सांगतां येत नाहीं; तथापि या मातृक वंशपरंपरेचा अवशेष अद्यापहि कोठेंकोठें आढळून येतो. आपल्या हिंदुस्थानांत अद्यापि मलबारांतील नायर जातींत ही परंपरा आढळून येते. संपत्तीची वाढ व त्यावरील: पुरुषांची खाजगी सत्ता स्थापित झाल्यावर मातृवंशपरंपरा नष्ट होऊन त्या जागीं पितृवंशपरंपरा ही किती झपाट्यानें व सुलभतेनें होते याचें उदाहरण हवें असल्यास अमेरिकेंतील रेडइंडियन जातीचें देतां येईल. युरोपियन लोकांचा संबंध येण्यापूर्वी या सर्व रानटी जातींत मातृपरंपरा चालत होती. परंतु त्यानंतर झालेल्या संपत्तीच्या वाढीमुळें व युरोपियनांसारख्या पितृपरंपरेच्या लोकांशीं संघटण झाल्यामुळें मिसोरी प्रांतांतील आठ रेडइंडियन जातींपैकीं सहा जातींत पितृ-परंपरा सुरू झाली. फक्त दोन गरीब जातींत अद्याप मातृपरंपराच अमलांत आहे.

वंशपरंपरेचा हा महत्त्वाचा बदल होण्याच्या कालापर्यंत कुटुंबां-तील स्त्रीपुरुषव्यवहारांत स्वैरविहारापासून दांपत्यकुटुंबरचने-पर्यंत जी सुधारणा होत आली ती अगदीं नैसर्गिक कारणामुळें म्हणजे जीवरक्षण, वंशरक्षण हेतुप्रेरित शुद्ध समाजहित-परिणामी अशा स्वरूपाची होती. त्यांत एका वर्गाचें हित तें दुसऱ्या वर्गाचें अनहित असा प्रकार नव्हता. परंतु पितृपरंपरा स्थापन झाल्यानंतर कुटुंबसंस्थेंत ज्या घडामोडी झाल्या त्या नैसर्गिक आवश्यकतेमुळें न होतां सांपत्तिक विषमतेमुळें (Economic unequality) घडून आल्या व समाजांत वरिष्ठ

वर्गाकडून दुबळ्या वर्गावर जुलूमजबरदस्ती, लुबाडणूक हीं होऊं लागलीं. या वर्गकलहांत स्त्रीवर्गहि गोंवला गेल्यानें कुटुंब-संस्था जरी बाह्यतः दांपत्यस्वरूपाची राहिली होती तरी त्या-पैकीं दुबळ्या स्त्रीवर्गावर अनेक हानिकारक जुलूम लादण्यांत येऊं लागले व कुटुंबांतील स्त्रीपुरुषाची समान हक्काची व समान कर्तव्याची घडी मोडून कुटुंबरचनेंतील दांपत्यस्वरूप जाऊन त्याचा एक पति पण अनेक पत्नी असा अधःपात होत गेला, त्याची हकीगत अशी आहे–

## (४) एकपति-अनेकपत्नी-कुटुंबपद्धति
## ( Monogamous Family. True only for woman.)

मातृपरंपरेचा पाडाव व पितृपरंपरेचा उदय म्हणजे स्त्रीवर्गाचा अत्यंत हानिकारक ऐतिहासिक पराजय होय. कारण त्यानंतर स्त्रियांचें कौटुंबिक व सामाजिक जीवन व त्यांची मानमान्यता जी एकवार खालावत चालली ती अद्यापपावेतों कमीजास्त प्रमा-णांत चालू आहे. स्त्रियांचें कौटुंबिक वर्चस्व पुरुषांनीं सर्वस्वीं काढून घेतलें, एवढेंच नव्हे, तर त्यांना केवळ गुलामाप्रमाणें खरेदीविक्रीचे प्राणी व केवळ विषयोपभोगाचें व संतति उत्पन्न करावयाचें एक साधन या पायरीला आणून पोंचविलें आहे. या गुलामगिरीच्या स्थितीवर पुराणकालीं अगर अलिकडे कितीहि सफेती फांसण्याचा प्रयत्न केला असला तरी मुळांतील हिडिस स्वरूपास अद्यापपावेतों आळा बसलेला नाहीं.

पितृपरंपरा (Patriarchal Family) स्थापित झाल्यावर स्त्रियांचा अधःपात आपल्याइकडे वैदिक काळीं कोणत्या थरापर्यंत गेला होता, याचें उदाहरण तीन हजार वर्षांपूर्वीच्या जैमिनीच्या

सूत्रांत आढळून येते. या सूत्रावर पुढें शबरानें जें भाष्य केलें आहे, त्यावरून आतांप्रमाणें त्या वेळींहि स्त्रीपुरुषांची समानता, धनधारण करण्याची व सहाधिकाराची पात्रता हे वादाचे विषय होऊन बसले होते. शबरभाष्यांतील पूर्वपक्ष असा मांडला आहे.

"पुरुष हे द्रव्यवान आहेत. यज्ञादि कर्मेंहि द्रव्याशीं संयुक्त आहेत. स्त्रिया या अद्रव्यवान आहेत. कारण त्यांचा क्रयविक्रय होतो. पित्याकडून त्या विकल्या जातात व भर्त्याकडून विकत घेतल्या जातात. विकल्या जातात म्हणून पित्याच्या धनावर त्यांची सत्ता नाहीं. विकत घेतल्या जातात म्हणून पतीच्या धनावर त्यांची सत्ता नाहीं. स्त्रिया इथाच दुसऱ्यांच्या द्रव्य झाल्या आहेत. जें त्यांचें तें त्यांच्या पतीचेंच होतें. पति हा त्यांचा स्वामी, त्याचें काम त्यांनीं करावयाचें, तें सोडून दुसरें करणें हें अयोग्य होय. स्त्रिया दुसऱ्या कोणत्याहि प्रकारें द्रव्य मिळवतील तर तें पतीचेंच होय. कारण भार्या पुत्रश्च दासश्च निर्धनाः सर्व एव ते। यत्ते समाधिगच्छन्ति यस्य ते तस्य ते धनम् ॥" असें म्हटलें आहे. या शेवटच्या मनुवाक्यांत पुत्रांचे, स्त्रियांचे व दासांचे हक्क यांची मोट एकत्र बांधली आहे. या वचनाप्रमाणें स्त्रियांचे हक्क जात असल्यास पुत्राचेहि जातात. पण स्त्रियांचेच तेवढे हक्क बुडवून पुढें पुत्राचे कायम ठेवण्यांत आले. हा स्वार्थ अगर अन्याय वाचकांनीं लक्षांत ठेवावा. तसेंच वरील पूर्वपक्षांत वर्णन केलेली स्त्रियांची स्थिति व गुलामगिरीची स्थिति यांत अंतर काय आहे हेंहि त्यांनींच ठरवावें.

असो. पितृपरंपरेमुळें आपल्याइकडे वैदिक काळीं स्त्रियांची जशी दैना झाली होती, त्याच प्रकारें आरबी, ग्रीक, रोमन इत्यादि संस्कृतींतहि झाली. आरबी संस्कृतींत पैतृक कुटुंबात कुटुंबनायक

(Patriarch), त्याची अनेक बायकामुलें व गुलाम असत. या अनेकपत्नीत्वाबद्दल पुढें खुलासा येईल. पण या ठिकाणीं लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, पैतृक कुटुंबांत गुलाम व त्या गुलामांच्या बायका यांचाहि समावेश त्या वेळीं झाला होता. या गुलाम-मिश्रित एकत्रिक कुटुंबातील माणसांनीं शेळ्यामेंढ्यांचे कळप पाळून आपला चरितार्थ चालवावा अशी वहिवाट होती. कुटुंबांत नवराबायको व त्यांचीं मुलें यांपेक्षां गुलामांचें प्रस्थ घरबांपेक्षां रोमन कुटुंबांत जास्त होतें. इंग्रजींतील कुटुंब (Family) हा शब्द रोमन भाषेंतील Famulus म्हणजे घरगुती गुलाम या शब्दावरून झाला आहे. रोमन लोकांत कुटुंबनायकाला वाटेल त्या पत्नीचा अगर गुलामाचा वाटल्यास जीव घेण्याचा अधिकार तेथील कायद्यानेंच प्राप्त झाला होता. पुरुषाच्या धनाचा वारसा हा कायदेशीर ठरण्याकरितां त्याचा औरसपणा निश्चितपणें ठरवण्याची गरज होती. यास्तव विवाहित स्त्रीचें पातिव्रत्य वाटेल त्या मार्गानें शुद्ध राखण्याचा अधिकार कायद्यानें पुरुषास दिला होता. परंतु पुरुषानें आपलें आचरण चोख ठेवावें याबद्दल कायद्यांत खबरदारी घेण्याची आवश्यकता मुळींच भासली नाहीं. त्यामुळें जुलमी कायद्यांचा स्त्रियांच्या स्वातंत्र्याविरुद्ध करडा अंमल करणें अगर प्रसंगविशेषीं त्यांचा जीव घेणें या गोष्टी म्हणजे पुरुषांना कायद्यानें मिळालेला हक्कच होता.

एवढ्याच अन्यायावर ही गोष्ट थांबली नाहीं. पूर्वीच्या दांपत्यविवाहाच्या समतोल स्वरूपांत स्त्री व पुरुष यांस आपापला वैवाहिक संबंध स्वखुषीनें केव्हांहि मोडण्याची मोकळीक होती. त्यामुळें दोघांसहि वैवाहिक नीतीचा चोरून भंग करण्याचा मोह फारसा होत नसे परंतु पितृपरंपरा सुरू झाल्यावर या बाबतींत महदन्तर पडत चाललें. स्त्रियांच्या नैतिक भंगाबद्दल त्यांच्यावरील

निर्बंध व त्याबद्दल शिक्षा अत्यंत कडक करण्यांत आल्या. एवढेंच नव्हे, तर लग्न मोडण्याचा स्त्रियांचा हक्क हळुहळु संपुष्टांत येऊन तो अजिबात नाहींसा झाला. पुरुषांना मात्र वाटेल त्या स्त्रीला घराबाहेरील रस्ता दाखविण्याचा अधिकार अद्यापि कायम राहिला. " एक एव पतिर्नार्याः " एका स्त्रीला एका वेळीं एकच पति असावा एवढा नियम करून काम भागेना. " एक एव पतिर्नार्याः ॥ यावज्जीव परायणम् ॥ मृते जीवति वा तस्मिन् ना परं प्राप्नुयान्नरम् ॥ " स्त्रीला यावज्जीव एकच पति करतां येईल, असा त्या नियमांत जांवईशोध घालण्यांत आला ! पहिला पति मरो अगर जिवंत असो, स्त्रीच्या जिवांत जीव असेपर्यंत तिला दुसरा पति करण्याची मोकळीक नाहीं. या विषम, अन्यायी, क्रूर, अनैसर्गिक नियमाची अंमलबजावणी आज हजारों वर्षें हिंदूंतील चातुर्वर्ण्यांत, मुख्यत्वेंकरून वरच्या वर्गांत, अद्याप चालू आहे. या वर्गांतील विधवांना पुर्नविवाह करण्याची कायदेशीर मोकळीक अगदीं अलिकडे इंग्रजांच्या अमदानींत भीतभीत देण्यांत आली.

स्त्रियांच्या हक्कांची ही पायमल्ली आपल्या पौर्वात्य आरबी संस्कृतींत जितकी झाली, तितकी पाश्चात्य ग्रीक, रोमन संस्कृतीवर उभारलेल्या युरोपियन समाजांत झाली नाहीं. याला अनेक ऐतिहासिक कारणें आहेत. तीं विस्तारेंकरून पुढें देण्यांत येतील. परंतु त्यांपैकीं मुख्य कारण उघड आहे कीं, संपत्तीची वाढ आपल्या आर्यसंस्कृतींत पूर्वीच्या काळीं जितकी झाली तितकी पाश्चिमात्य देशांत झाली नाहीं. केवळ तीनशें वर्षांच्या अगोदरपर्यंत आर्यावर्त ही सुवर्णभूमि आहे अशी सर्वत्र समजूत होती.

कुटुंबरचनेंत होत जाणारे फेरबदल मुख्यत्वेंकरून सांपत्तिक स्थितीवर कसे अवलंबून असतात, हें यावरून सहज लक्षांत येण्याजोगें आहे. स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली होण्यास संपत्तीची

वाढ होणें, ती पुरुषांची खासगी मालमत्ता समजली जाणें व खाजगी मत्ता आपल्या औरस मुलांसच वंशपरंपरा मिळावी अशी खबरदारी घेणें, हीं जशीं मुख्य कारणें आहेत, त्याचप्रमाणें पुरुषांची दानत, भूतदया, नीतिमत्ता हीं भ्रष्ट करण्यासहि याच गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत. संपत्तीच्या बळावर पुरुषास वाटेल तितके गुलाम विकत घेण्याची ऐपत आली होती हें आपण पाहिलें आहे. अशा गुलामांत सुंदर, तरुण स्त्रियांचाहि समावेश होत होता. अलेक्झांडरच्या स्वारीबरोबर आलेल्या ग्रीक लोकांनीं लिहून ठेवलें आहे कीं. "हिंदुस्थानांत तक्षशिला या नगरींत प्रौढ कन्या बाजारांत विकावयास आणीत, व जो अधिक द्रव्य देईल त्यांस त्यांना विकीत." अशा रीतीनें राजरोस विकत घेतलेल्या स्त्रिया बाळगण्याची सवलत पुरुषांना मिळाल्यानंतर पुरुषांची वैवाहिक नीति भ्रष्ट होण्यास कितीसा अवकाश लागणार ? ज्याच्याजवळ पैसा आहे त्याला अनेक बायका करण्याची चाल पाडून तिला धर्मशास्त्राचा अगर कायद्याचा आधार मिळवण्यास फारसे प्रयास करावे लागले नाहींत. बायकांना आजन्म एकपतिव्रताच्या मगरमिठींत अडकवून पुरुषांनीं अनेकपत्नित्वाची सवलत मिळवली. एवढेंच नव्हे, तर विवाहित पुरुषांनीं वेश्यागमन केल्यास ती गोष्ट लज्जास्पद, बेइमानपणाची अगर अधार्मिक अशी न समजली जातां थोडी क्षम्य गैरवर्तणूक एवढ्यावरच नेली गेली. राजेरजवाडे व थोरामोठ्यांच्या बाबतींत तर ती गोष्ट भूषणावह व आपल्या वैभवाचें द्योतक अशी मानली गेली. मनुष्यसमाज जंगली स्थितीतून वर येत चालला, त्या मानानें स्त्रीपुरुषांच्या व्यवहारांतील स्वैरविहारास योग्य प्रकारें निर्बंध बसत चालले असतांना पैशाकरितां वाटेल त्याला शरीरविक्री करणारा वेश्यावर्ग व त्याचा अनिर्बंध रीतीनें उपभोग घेणारा पुरुषवर्ग

(५४५) भाषा २३८

हा समाजांत का उत्पन्न झाला हें समजणें आपल्या विषयास धरून आहे. त्याचा उलगडा पुढें होईल. पण या ठिकाणीं स्त्रीपुरुषांच्या व्यवहारांत आर्थिक परिस्थितीमुळें जसा स्त्रियांचा तसाच पुरुषांचाहि अधःपात होत गेला हें लक्षांत ठेवावें.

असो. याप्रमाणें पौर्वात्य देशांत स्त्रियांचें पारतंत्र्य, द्रव्यहीनपणा व सामाजिक अधोगति इतकी कमालीस येऊन पोंचली कीं, आरबी संस्कृतींत स्त्रियांना यावज्जन्म पडद्याआड अंधारकोठडीची शिक्षा फर्मावण्यांत आली. आर्यावर्तांत असा प्रकार जरी झाला नाहीं, तरी स्त्रियांच्या द्रव्यहीनपणाची कमाल इकडे जितकी झाली, तितकी जगांत इतरत्र कोठेंहि झाली नाहीं. स्त्रियांस पोटगीशिवाय कोणताहि हक्क उरला नाहीं. परंतु या हीनपणाची प्रतिक्रिया होऊन बंगाल प्रांतांत जिमूतवाहन या उदार शास्त्रकारानें भूतदयेनें प्रेरित होऊन, पतिनिधनानंतर त्याच्या धनावर त्याच्या निपुत्रिक विधवेचा तहहयात हक्क स्थापित केला. परंतु अत्यंत तिटकाऱ्याची व त्वेष येणारी गोष्ट अशी आहे कीं, या अल्प सवलतीचा फायदाहि स्त्रियांस न मिळावा म्हणून विधवा स्त्रियांवर बंगाल प्रांतांत जो अमानुष अत्याचार होऊं लागला, त्याला जगांत कोठेंहि तोड मिळावयाची नाहीं. स्त्रियांवर पातिव्रत्याचा पगडा बसविण्याकरितां अनेक दंतकथा, पुराणें, व्रतें यांची रचना परमार्थजीवि पुरुषवर्गानें करून बिचाऱ्या स्त्रियांची अत्यंत दिशाभूल करण्यांत आली; एवढेंच नव्हे, तर पतिनिधनानंतर संन्यस्त वृत्तीचा तिच्यामागें असा लकडा लावून दिला कीं, या स्थितीपेक्षां जिवाचा सोक्षमोक्ष केलेला बरा असें त्यांस साहजिकच वाटूं लागलें.

या मनःस्थितीच्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन स्त्रियांनीं पतिनिधनानंतर सती जाणें हें अत्यंत पुण्यकारक व इहपर-

लोकीं श्रेयस्कर आहे, असा शास्त्रार्थ बनविण्यांत आला. या शास्त्रार्थास व लौकिकी विचारसरणीस बळी पडून अनेक श्रद्धा-युक्त विधवांनीं आपणांस जाळूनहि घेतलें. परंतु पुढें जिमूत-वाहनाच्या शास्त्रार्थाप्रमाणें निपुत्रिक मृत पतीची धनसंपत्ति बंगाल प्रांतापुरती पतीच्या इतर नातेवाइकांकडे न जातां ती विधवेस मिळावी असें ठरल्यानंतर त्या प्रांतांत सती जाण्याच्या नांवाखालीं जतक्या विधवा जाळण्यांत येऊं लागल्या त्याची सर हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि प्रांतास येणार नाहीं. हा केवळ काकतालीय न्याय आहे कीं त्याच्या बुडाशीं क्षुद्र धनतृष्णा आहे ह्याचा निवाडा करण्याचें काम आम्ही वाचकांवरच सोंपवतों. दीन, दु:खी, निराधारी शेंकडों स्त्रियांस जाळण्याची अमानुष निर्घृणता मनुष्याच्या हातून घडेल याची कल्पनाहि करवत नाहीं. परंतु राममोहन राय यांसारख्या जगप्रसिद्ध बंगाली विद्वानानें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेल्या अंगावर शहारे आणणाऱ्या हिडीस गोष्टी लिहून ठेवल्या आहेत त्या तरी खोट्या कशा म्हणाव्या ? तो लिहितो–

"पति मृत्युमुखीं पडल्यामुळें गांगरून गेलेली विधवा बऱ्या बोलानें सती जाण्यास कबूल न झाल्यास तिला उपाशी ठेवून, मादक पदार्थ चारून व ती धुंदींत असतांनाच मतलबी नातेवाईक व भटजी तिजकडून पडत्या फळाची संमति मिळवीत व तशा स्थितींतच तिला चितेवर बांधून अग्नि देत. इतकेंहि करून तिनें धडपड करून अग्नींतून बाहेर येण्याचा प्रयत्न केल्यास सभोंवार जमलेली मंडळी लांबलांब बांबूच्या काठ्यांनीं तिला पुन्हा अग्नींत लोटून देत व तिच्या किंकाळ्या ऐकूं न याव्या म्हणून मंगल (?) वाद्यांचा धूमधडाका व भटांचा मंत्रघोष सुरू करीत."

हृदयाला पीळ पडणाऱ्या या जुन्या गोष्टीचा या ठिकाणीं पुनरुच्चार करण्याचें कारण कीं, पतीच्या मागें मृत्यूस

त्यांच्यावर पुत्रवत प्रेम करणाऱ्या त्यांच्या प्रेमळ भावजयीच्या बाबतीत हे घडले होते.

कवटाळणाऱ्या विधवेचें हें दृश्य म्हणजे पतीच्या विरहामुळें प्रेमदग्ध होऊन जीव नकोसा झालेल्या आर्यपत्नीचा आत्मनाश नव्हे, अथवा स्वर्गात अशा पतीशीं पुनर्मीलित होण्याच्या आनंदातिशयाच्या भरांत केलेलें हें आर्य स्त्रीचें आत्मसमर्पणहि नव्हे, तर पुरुषांच्या क्रूर राक्षसी लोभाविष्टतेचें व विशेषेंकरून स्त्रियांच्या पराधीनतेचें, व पुरुषांच्या वर्चस्वास त्या संपूर्ण बळी पडल्याचें हें एक भेसूर प्रदर्शन होय.

असो. याप्रमाणें आपल्याइकडील जुन्या संस्कृतींत स्त्रियांचें सामाजिक जीवन शून्य अंशावर आलें असतांना युरोपांतील ग्रीक व रोमन संस्कृतींत स्त्रियांची घसरगुंडी कोणत्या अंशावर आली होती हें पाहणें अवश्य आहे. ग्रीक साम्राज्याचा उदय होण्यापूर्वीच तेथील गण (gens) संस्था व मातृपरंपरा नष्ट होऊन पितृपरंपरा स्थापन झाली होती व खासगी मालमत्तेच्या जोरावर विवाहित बायकांना कडक एकपतिव्रत व पुरुषांना मात्र वाटेल तो अनाचार करण्याची मुभा अशा पायरीवर तेथील कुटुंबसंस्था झाली होती. परंतु यापुढील ऐतिहासिक कालांत ग्रीक व रोमन संस्कृतीवर उभारलेल्या युरोपियन समाजांत स्त्रियांची अवनति इकडच्याइतकी झाली नाहीं, इतकेंच नव्हे, तर तिकडील समाजानें बहुपत्नीक कुटुंबपद्धति नष्ट करून एकपति- एकपत्नी या वरच्या पायरीस ती नेली. स्त्रियांच्या दृष्टीनें हा इष्ट परिणाम घडून येण्याला योग्य ऐतिहासिक कारण असलेंच पाहिजे. त्याची चर्चा पुढील प्रकरणांत करूं.

# प्रकरण ४ थें

---

मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या एकपति कुटुंबसंस्थेचें खरें रहस्य काय आहे याचा उलगडा झाल्यानंतर उघड होत आहे, कीं या पद्धतीमुळें स्त्रीपुरुषांचा समाधानकारक रीतीनें समेट मुळींच झालेला नाहीं. अगर या संस्थेस कुटुंबरचनेची निर्दोष पूर्णावस्था असेंहि मानतां येत नाहीं. याचें स्वरूप युरोपखंडांतील ग्रीक व रोमन साम्राज्यांत कसें व्यक्त झालें हें पहाण्याचें आपण ठरविलें आहे, म्हणून तिकडे वळूं.

इसवी सनाच्या पूर्वी चारपांचशें वर्षांपासून ग्रीक लोकांमध्यें पितृवंशपरंपरा व त्याबरोबरील एकपति-विवाहसंस्था अमलांत आली होती. त्या वेळच्या स्त्रियांस घरांतसुद्धां पूर्ण मोकळीक नव्हती. घरांतील एका भागाचा झनान्याप्रमाणें उपयोग करण्यांत येत असे. अपरिचित पुरुष घरांत आल्यास स्त्रियांना या झनान्याचा आश्रय करावा लागत असे. विवाहित स्त्रियांना दुसऱ्या स्त्रीच्या सोबतीशिवाय घराबाहेर जातां येत नव्हतें. एवढेंच नव्हे, तर घरां-तहि सक्त पहारा ठेवण्यांत येत होता. या कामीं श्रीमंतांच्या घरीं प्रतिहारी किंवा खोजे यांचा उपयोग करीत असत. प्रणयी दोस्तापासून विवाहित स्त्रीचें रक्षण करण्याकरितां "मोलासियन्" जातीचे कुत्रे खिडक्यांबाहेर ठेवावे लागत असत, असें इतिहास-कारांनीं लिहून ठेवलें आहे. पुरुषास घराबाहेर करम-णुकीचे खेळ, शिकार, राजकीय उद्योग इत्यादि मोकळे असत. परंतु बायकांना या सर्व गोष्टींची बंदी असे. पैसेवाल्याच्या पदरीं विकत घेतलेल्या दासी असत. या दासींना घरीं आणून ठेवायचें नाहीं एव-

ढाच निबंध होता. परंतु या दासींवर देखरेख ठेवण्याचें काम घर-धनीण या नात्यानें विवाहित स्त्रीस मुकाट्यानें करावें लागत असे. या खासगी दासींशिवाय विश्वयोषितांचा बाजारहि भरभराटींत चालत असे. या स्त्रिया नट्टापट्ट्यांत व विद्याव्यासंगांतहि विवाहित स्त्रियांपेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें त्यांची समाजांत व राजकीय क्षेत्रांतहि चांगली मानमान्यता होती.

एकंदरींत त्या वेळच्या विवाहित स्त्रीपुरुषांच्या व्यवहारांत उत्कट प्रेमाचा अंश मुळींच नव्हता. कुटुंबांत पुरुषाचें वर्चस्व कसें राखावें, औरस अशी प्रजा कशी निर्माण करावी, आपल्या मागें संपत्तीस कायदेशीर वारस कसा तयार करावा, एवढीच फिकीर ग्रीक लोकांस होती. व या गोष्टी साधणें हेंच कुटुंबसंस्थेचें अंतिम ध्येय आहे असें ते लोक उघडउघड मानीत असत. ही संस्था म्हणजे इतर दृष्टीनें आपल्या गळ्यांतील एक धोंड आहे व केवळ पूर्वजांचें ऋण फेडण्याकरितांच व राष्ट्रीय कर्तव्य म्हणून आपण ही संस्था चालविली पाहिजे अशी त्यांची समजूत होती. अथेन्स संस्थानच्या कायद्याप्रमाणें प्रत्येक पुरुषास सक्तीनें लग्न करावें लागत असे, एवढेंच नव्हे, तर स्त्रीशीं वैवाहिक संबंध कमींत कमी किती ठेवावा याबद्दलहि कायदा असे.

वर वर्णन केलेली ग्रीक कुटुंबाची रचना पाहून पुन्हा असेच उद्गार काढावे लागतात, कीं एकपति-कुटुंबरचनेमुळें आपल्या पौर्वात्य देशांत स्त्रियांची सामाजिक अवहेलना ज्या स्वरूपांत झाली, तेंच ऐतिहासिक स्वरूप ग्रीक संस्कृतींतहि दिसून आलें. तें स्वरूप म्हणजे पुरुषानें स्त्रीवर्गावर संपूर्ण ताबेदारी मिळवणें असें आहे. इतिहासांत या वेळपावेतों घडून आलेल्या कुटुंबसंस्थेंतील स्त्रीपुरुषव्यवहारांत प्रेमाचा भाग फारसा नव्हता हें आपण

पाहिलेंच आहे. विषयवासना तृप्त करणें यापलीकडे मजल गेली नव्हती. तथापि स्त्रीपुरुषांमध्यें **वर्गविरोध** असा या काळापूर्वी अस्तित्वांत नव्हता. तसें म्हटल्यास समाजांत अंतर्विरोध असा कोणत्याहि वर्गांत यापूर्वी नव्हता. **प्रथम** हा विरोध व्यक्त झाला तो **स्त्री व पुरुष** याच दोन वर्गांत होय. त्याचप्रमाणें एका वर्गाचें दुसऱ्या वर्गावर वर्चस्व स्थापन होऊन निर्बळ वर्गावर जुलूमजबरदस्ती प्रथम कोठें अमलांत आली असेल तर ती एकपति विवाहसंस्था रूढ झाल्यापासूनच होय. समाजांतील स्त्रीपुरुषव्यवहाराचें स्वरूप पायरीपायरीनें हा वेळपर्यंत शुद्ध होत चाललें होतें. या कामांत विघ्नें उत्पन्न होण्यास दोन कारणें झालीं. हीं कारणें म्हणजे पुरुषांस **खासगी संपत्ति** सांठविण्याची संधि व संपत्तीच्या जोरावर **दासी खरेदी** करण्याची मुभा, हीं होत. या दोन कारणांमुळेंच एका वर्गाचें कल्याण तें दुसऱ्या वर्गाचें अकल्याण, एका वर्गाचें स्वातंत्र्य तें दुसऱ्या वर्गाचें पारतंत्र्य अशी अनवस्था उत्पन्न झाली व त्यानंतरच्या काळीं आजपावेतों कुटुंबांत जे अनेक विरोध, भांडणतंटे, अन्याय, नैतिक अधःपात इत्यादि झाले आहेत, त्याच्या मुळाशीं याच दोन बाबी असल्याचें दिसून येईल. मुख्यत्वेंकरून एकपति–विवाहपद्धतीच्या पोटीं दोन नवीनच सामाजिक अरिष्टें उदयास आलीं; त्यांचा या ठिकाणीं उल्लेख करणें जरूर आहे. तीं अरिष्टें म्हणजे **वेश्यावृत्ति** व **व्यभिचार** हीं होत.

कुटुंबरचनेची पायरी स्वैरविहारापासून एकपति–विवाहपद्धतीपर्यंत जरी चढत गेली, तरी पुरुषांची तत्पूर्वीची स्वैरविहाराची चटक अगदींच कांहीं सुटली नव्हती. ही चटक अगदीं प्रस्तुत काळच्या सुधारणेलाहि एखाद्या काळ्या डागाप्रमाणें चिकटून राहिली आहे. हा **स्वैराचाराचा** षोक एकपतिविवाह रूढ

झाल्यावर जुन्या काळीं मर्यादित रीतीनें का होईना चालू ठेवण्याची मोकळीक धर्माच्या नांवाखालीं मिळाली होती, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे ! ख्रिश्चन धर्माचा फैलाव होण्यापूर्वी ग्रीक व रोमन लोकांत अनेक देवतांचीं सुंदर व भव्य देवळें असत; त्यांत कामदेवाचींहि कांहीं असत. लग्नापूर्वी या देवतांना तरुण स्त्रिया वहाण्याची चाल स्पार्टन लोकांत होती. त्या स्त्रियांनीं आपआपल्या प्रियकरासह स्वैरविहार करून मिळवलेले पैसे त्या देवतांच्या खजिन्यांत जमा होत असत. कायदेशीर लग्न करून पातिव्रत्याचा हक्क संपादन करण्यापूर्वी तेथील स्त्रियांस हें धर्मकृत्य करावें लागत असे ! पुढें ख्रिश्चन धर्माचा फैलाव होण्याच्या सुमारास या स्वैरविहारास आळा पडून या देवतांच्या पुजारिणी असतील, तेवढ्यांनींच हें धर्मकृत्य स्त्रीवर्गाच्या प्रतिनिधि म्हणून चालू ठेवलें होतें. आपल्या इकडे देवाला मुरळ्या अगर जोगतिणी वाहण्याची चाल व देवालयांत देवदासी ठेवण्याची चाल अद्याप चालू आहे. हा सर्व प्रकार म्हणजे स्वैरविहाराचा अवशेष नव्हे तर काय ? तसेंच ब्राझिल वगैरे दक्षिण अमेरिकेंतील इंडियन जातींत स्त्रियांचें राजरोस लग्न होण्यापूर्वी त्यांस संभोगस्वातंत्र्य असे. आपल्या पुराणांतरींहि कर्णाप्रमाणें लग्नापूर्वी मुलें झालेलीं अनेक उदाहरणें सांपडतात. कांहीं धर्मपंथांत अद्यापिहि घटकंचुकीसारखे प्रकार रूढ असल्याचें आढळून येतें. हे सर्व प्रकार स्वैरविहाराची संक्षिप्त आवृत्ति समजण्यास हरकत नाहीं. स्वैरविहारांत स्त्रिया व पुरुष या दोघांचाहि संबंध येत असला तरी त्यांतील पुरुषांचा भाग उपेक्षणीय समजला जाऊन स्त्रियांसच जबाबदार धरण्यांत येतें. सामाजिक हीनतेचें खापर त्यांच्याच डोक्यावर फोडण्यांत येतें. स्त्री म्हणजे पुरुषाच्या मुक्तीच्या आड येणारी धोंड आहे असें समजण्यांत येतें. वास्तविक पहातां पूर्वापार चालत आलेली पुरुषाची स्वैरविहाराची हौसच या तत्त्वज्ञानाच्या मुळाशीं आहे.

कोणत्याहि व्यक्तीच्या अगर वर्गाच्या अंतरंगांत एखादी गोष्ट करण्याची उत्कट इच्छा असून त्याप्रमाणें गोष्टी जमून येण्यास जर योग्य वाव मिळत नसेल, तर ती व्यक्ति अगर तो वर्ग आपल्या कल्पनाशक्तीस मोकळें रान करून देतो, व आपणांस अनुकूल असें काल्पनिक वातावरण निर्माण करतो. परंतु या काल्पनिक गोष्टीवरूनच त्यांच्या मनांतील षोक उघडकीस येतो. या नियमास अनुसरून प्रत्येक धर्मांत पुरुषवर्गानें स्वर्गांतील सुखाच्या परमावधीची जी कल्पना केली आहे त्यांत चिरयौवन, लावण्यसंपन्न, कामलोलुप अशा पऱ्यांच्या, अप्सरांच्या, देवांगनांचा भरपूर पुरवठा केला आहे. पण त्यांतल्या त्यांत ही खबरदारी घेतली आहे, कीं अशा स्त्रियांशीं रममाण होणाऱ्या गुलहौशी देवपितरांपेक्षां या स्त्रियांस हीन दर्जा देण्यांत आला आहे.

असो. पुरुषवर्गांत वसणाऱ्या या स्वैरवासनेंतच वेश्यावर्गाची संस्था निर्माण झाली आहे. एकपति-विवाहसंस्था जेव्हांपासून अमलांत आली, तेव्हांपासून जुळ्या बहिणीप्रमाणें वेश्यासंस्थाहि अस्तित्वांत आहे, इतकी ती पुराणी आहे. गुलाम विकत घेऊन त्यांजकडून विनावेतन काम करून घेण्याचा वहिवाट रूढ झाल्यावर त्याबरोबरच गुलाम नसलेला पण वेतन घेऊन काम करणारा मजूरवर्ग निर्माण झाला. त्याप्रमाणें दासी विकत घेऊन त्यांस आजन्म रखेल्या ठेवण्याची पद्धत रूढ झाल्यावर त्याबरोबरच गुलाम नसलेला, पण पैसे घेऊन आपलें शरीरविक्रय करणारा वेश्यावर्ग निर्माण झाला. धनस्वातंत्र्याच्या जोरावर स्त्रियांवर पुरुषांचें जोंपर्यंत वर्चस्व कायम राहील व स्वैरविहाराची जोंपर्यंत पुरुषांना सवलत मिळत जाईल, तोंपर्यंत वेश्येच्या धंद्याला लोकांनीं वरवर कितीहि झिडकारलें तरी वेश्यावृत्ति ही समाजांतून केव्हांहि नष्ट होणार

Imp.

नाहीं. परंतु त्याचा एवढाच परिणाम झाला आहे, कीं "करून अकर्ता" ढोंगी पुरुषांना कोणतीहि सामाजिक हीनता न चिकटतां हा धंदा करणाऱ्या स्त्रिया मात्र समाजाकडून बहिष्कृत समजल्या जातात. या पुरुषार्थामुळें पुनःपुन्हा जगांत असा डांगोरा पिटविण्यांत येत आहे, कीं स्त्रियांवर पुरुषांचें वर्चस्व हें 'विनशर्त' आहे व स्त्रियांचें सामाजिक जीवन हें कवडीमोल आहे.

पुरुषांच्या दृष्टीनें हा एकतर्फी निकाल झाला खरा, पण जगांत वरिष्ठांच्याच मनाप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत नसतात. हातांतील अर्धी काकडी खाल्ल्यानंतर तीच पुन्हा सबंध असावी अशी अपेक्षा करून कसें चालेल ? वेश्येच्या संगतींत मौजेनें आयुष्य घालविणाऱ्याच्या घरांत यौवनानें मुसमुसलेली पण उपेक्षिलेली त्याची पत्नी असणार. तिची वाट काय ? तिची कितीहि आबाळ केली तरी तिच्या वासना मारून टाकणें शक्य नाहीं. अशा परिस्थितींत कुटुंबाच्या रंगभूमीवर दोन नव्या भूमिका निर्माण झाल्या. त्या म्हणजे अशा जहांबाज स्त्रीचा बावळट पति व त्या स्त्रीचा प्रियकर दोस्त. या दोन व्यक्ति निर्माण करून पुरुषांच्या वर्चस्वावर स्त्रियांनीं हा मुकुटच चढविला म्हणावयाचा. एकपति-विवाहपद्धतीच्या एका बाजूला वेश्यावृत्ति तर दुसऱ्या बाजूला व्यभिचार येऊन बसला; इतकेंच नव्हे, तर व्यभिचाराच्या या गढूळ पाण्यांतून निःसंदिग्ध औरस वारस कसा निवडावयाचा ही अडचण येऊन पडली. या अडचणींतून युरोपियन कायद्यानें गमतीनें वाट काढली आहे. त्यांच्या व्यवहारशास्त्राचा आधारग्रंथ जें नेपोलियनचें कोड त्यांतील ३१२ कलम असें आहे– "विवाह झाल्यानंतर स्त्रीच्या पोटीं जें मूल निपजेल त्याचा बाप त्या स्त्रीचा पति आहे असें समजावें." एकपतिविवाहसंस्था सारखी हजारों वर्षे चालल्यानंतर त्याचा शेवटीं हा असा परिणाम व्हावा ना ?

V. imp.

सारांश, एकपति-अनेकपत्नी विवाहसंस्थेमुळें समाजाचें पाऊल पुढें पडलें नाहीं किंवा स्त्रीपुरुषसंबंधांतील शुद्धीहि वाढली नाहीं. परंतु त्यांमधील विरोध, तेढ, अन्याय, पुरुषांचें जुलमी वर्चस्व, स्त्रियांची अवहेलना ही मात्र जास्त वाढलीं. हीच स्थिति आमच्याइकडील पौर्वात्य देशांत अद्याप कायम आहे व पश्चिमेकडील देशांत रोमन साम्राज्याचा मोड होईपर्यंत तेथेंहि होती. परंतु त्यानंतर तिकडील समाजांत कांहीं महत्वाच्या ऐतिहासिक घटनेमुळें या लग्नसंस्थेंत सुधारणा होऊन त्याला एकपति-एकपत्नी असें स्वरूपच प्राप्त झालें. तें कसें झालें तें आतां पाहू.

## (५) एकपति-एकपत्नी-कुटुंबपद्धति

## ( Monogamous family ) → X Imp.

( With equal rights and duties for man and woman. BUT IN LAW ONLY. )

समाजांतील कोणत्याहि एका वर्गास दुसऱ्या वर्गावर चढेलपणा गाजविण्याची चटक लागली कीं तो आपण होऊन ती सोडून देईल असें इतिहासांत क्वचित् घडतें. एकपतिविवाहपद्धतींत स्त्रियांच्या सामाजिक जीवनांत होत चाललेल्या अधःपातास व पुरुषांच्या बहुपत्नीकत्वास आळा पडून युरोपिअन समाजांत जी सुधारणा झाली ती ख्रिश्चन धर्मांतील समानतेच्या तत्त्वामुळें झाली असें त्या धर्माचे अभिमानी सांगत असतात. परंतु खरी गोष्ट अशी आहे, कीं रोमन साम्राज्याचा खिळखिळा झालेला गाडा ज्या रानटी जर्मन टोळधाडीनें मोडून टाकला त्याजकडे या गोष्टीचें श्रेय आहे. या सुमारास जर्मन लोकांची सांपत्तिक स्थिति अगदीं गरिबीची होती व त्यांच्यांतील मातृक वंशपरंपरा नुकतीच नष्ट होऊन पितृपरंपरा चालू झाली होती. त्यांच्यांतील कुटुंबसंस्थेचें स्वरूप अद्याप जवळ

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

जवळ दांपत्यस्थितींत होतें. या कारणामुळें त्यांच्यांतील स्त्रियांकडे अद्याप बरेंच सामाजिक महत्व कायम होतें, व सामाजिक जबाबदारीस त्या अगदीं पारख्या झाल्या नव्हत्या. अशा स्थितींत रोमन साम्राज्याचें घबाड जर्मन लोकांच्या हातीं आल्यामुळें त्या साम्राज्याची घडी बसवण्याच्या कामीं अर्थात् जर्मन लोकांना त्यांच्या स्त्रियांची मदत झाली. या संधीचा फायदा घेऊन स्त्रीवर्गानें आपला कौटुंबिक दर्जा वाढवून घेतला. एका स्त्रीस एका वेळीं एकच पति असावा, पण पुरुषांनीं मात्र वाटल्यास अनेक स्त्रिया कराव्या, शिवाय इतर भानगडी कराव्या, अशी जी त्या वेळीं रूढि होती त्यांत बदल करून घेऊन एका पुरुषानें एकापेक्षां जास्त स्त्रियांबरोबर विवाह अगर संबंध ठेवूं नये, असा कायदा त्यांनीं करून घेतला व त्या गोष्टीला त्या वेळीं उदय पावत असलेल्या ख्रिश्चन धर्माचा पाठिंबा त्यांनीं मिळविला. अशा रीतीनें एक वेळ बस्तान बसल्यावर अन्य रीतीनें स्त्रियांवर अनेक आर्थिक निर्बंध जरी घालण्यांत आले, तरी कायदेशीर दृष्टीनें तरी एकपति-एकपत्नी-विवाहसंस्था अद्याप कायम राहिली. एवढेंच नव्हे, तर मनुष्याच्या अंतःकरणांतील अत्यंत उच्च व प्रबळ भावना म्हणजे स्त्रीपुरुषांमधील परस्पर प्रेम याला याच विवाहपद्धतींत प्रथम मान मिळाला.

याचा अर्थ असा नव्हे कीं या एकपत्नी-विवाहपद्धतीस प्रेमविवाह म्हणतां येईल; अगर या पद्धतींत उत्कट व पवित्र प्रेमाव्यतिरिक्त अन्य कोणताहि व्यावहारिक विचार लोक करीत नसत. यापूर्वींच्या विवाहपद्धतींत वधूवरांची निवड करणें व त्यांचीं लग्नें लावणें हीं सर्वस्वीं वडीलवाऱ्यांचीं कामें असत. परस्पर प्रेमास फारच अल्प महत्व देण्यांत येत होतें. परंतु या नवीन एकपत्नी-विवाहपद्धतींत वराला आपल्या वधूची निवड

करण्याची मर्यादित मोकळीक देण्यांत येऊं लागली, एवढेंच. कोणत्याहि विवाहपद्धतीस प्रेमविवाह म्हणणें झाल्यास त्यांत कोण-कोणत्या गोष्टींचा समावेश झाला पाहिजे, अगर या गोष्टी कोणत्या सामाजिक परिस्थितींत शक्य आहेत, याची वाटाघाट पुढें करूं. पण ज्याला युरोपियन पद्धतीप्रमाणें प्रेमविवाह असें आपण म्हणतों, अगर आपल्याकडेहि प्रेमविवाह या नांवाखालीं जी कल्पना रूढ होऊं पहात आहे, त्यांत खऱ्या प्रेमाचा अंश किती मर्यादित असतो हें आपण पाहूं. अलीकडे आपल्यामध्यें व पूर्वीपासून युरो-पियन लोकांमध्यें विवाहापूर्वीच्या निकट प्रेमाचा कितीहि डांगोरा पिटविला, तरी प्रत्यक्ष होत असलेल्या विवाहांत संप्रदाय, लोकाचार, व्यवहार, वर्गविशिष्ट विचार, इत्यादींना धरूनच ते होतात यांत संशय नाहीं

संपत्तीची मालकी व विल्हेवाट पुरुषाकडे असल्यामुळें सामा-जिक उत्पादनांत व सामाजिक जबाबदारींत स्त्रियांची हकालपट्टी झाली आहे. त्यामुळें व कायदा, रूढि आणि धर्म हीं सर्व पुरुषांच्या हक्काबद्दल जागरूक असल्यामुळें एकपत्नी-विवाहपद्धतींत प्रेमाची लुडबूड मर्यादित प्रमाणांतच राखलेली असते. यामुळें तरुण जोड-प्यांचें तात्पुरतें समाधान होत असलें, तरी स्त्रियांच्या जीवनावरील अनिष्ट दडपण त्यामुळें कमी झालेलें नसतें. अशा आचारप्रभव विवाहानें बद्ध झालेल्या जोडप्यांत शेंकडा नव्याण्णव उदाहरणांत नवऱ्याचा व विशेषेंकरून बायकोचा एक प्रकारचा शरीरविक्रयच झालेला असतो. खऱ्या उन्मादक प्रेमाशिवाय अन्य कोणत्याहि प्रेरणेनें उद्युक्त होऊन एकानें आपलें शरीर दुसऱ्याच्या स्वाधीन करणें हा शरीरविक्रयच नव्हे तर काय ? धंदेवाईक विश्वयोषिता या कांहीं वेळापुरती कांहीं रकमेकरितां विक्रीच्या मालाप्रमाणें आपल्या शरिराची विल्हेवाट लावीत असतात; तर आचारप्रभव

विवाहानें बद्ध झालेलें जोडपें आपलीं शरिरें गुलामाप्रमाणें आजन्म विकून टाकतें, एवढेंच या दोहोंमध्यें अंतर आहे. ज्याप्रमाणें दोन नकार एके ठिकाणीं आल्यास त्याचा एक रुकार होतो, त्याप्रमाणें दोन शरीरविक्रय म्हणजे एक वैवाहिक सद्गुण असें मानतां येईल.

सारांश, खऱ्या प्रेमाच्या प्रेरणेनेंच एकपत्नीविवाह होणें कोणत्या एका वर्गांत शक्य असेल तर तो, लोकाचाराचा ज्यावर पगडा बसलेला नाहीं असा बिनभांडवली युरोपमधील कामगार-वर्ग होय. या वर्गांत संपत्तीचा लोभ आडवा येण्याचें कारण नाहीं; तसेंच आपल्या संपत्तीला कायदेशीर वारस तयार करण्याचीहि या वर्गास फारशी जरूर नसते. याकरितां स्त्रियांवर यावज्जन्म एकपतिव्रत लादण्याची या वर्गास आवश्यकता वाटत नाहीं. खऱ्या प्रेमाच्या अभावीं स्त्रियांची नाखुशी असतांनाहि त्यांस कायद्याच्या दडपणाखालीं आपल्या संसारांत डांबून ठेवण्याची या वर्गास गरज नसते. एवढेंच नव्हे, तर या कामीं कोर्टकचेऱ्यांची पायरी चढण्यास गरिबीमुळें या वर्गास सवड नसते. मोठमोठ्या औद्योगिक केंद्रांच्या ठिकाणीं कारखान्यांतून स्त्रियांना स्वतंत्र मिळकतीची सोय झालेली असते. यामुळें या वर्गांतील कुटुंबांत पुरुषांचें स्त्रीवरील वर्चस्व अगदीं संपुष्टांत आलेलें असतें. धटिंगणपणाच्या जोरावर स्त्रियांना केव्हां केव्हां मारहाण करणें एवढाच नवरोबाचा हक्क शिल्लक असतो. वास्तव कायद्याच्या पुस्तकांत अगर धर्मशास्त्रांत एकपत्नीविवाह हें नांव जरी कायम असलें, तरी या मजूरवर्गांत पत्नीच्या तोंडांतील कांटेरी लगाम बराच ढिला असतो. एवढेंच नव्हे, तर या वर्गांत प्रेमाचा व इमान-दारीचा अंश भांडवलवाल्यांपेक्षां खात्रीनें जास्त असतो.

वरील वर्णन आमच्या इकडील कामगारवर्गाला लागूं नाहीं. कारण ज्या समाजांतून हे कामगार निघाले आहेत तो समाजच अद्यापि एकपतिविवाहपद्धतीच्या पायरीवर आहे. मर्यादित प्रमाणांत का होईना, पण विवाहांत प्रेमाचा शिरकाव अद्यापि आपल्या समाजांत झालेला नाहीं; त्याचा अल्प प्रारंभ होण्याचीं चिन्हें सध्यां वरच्या वर्गांत दिसूं लागलीं आहेत. आमच्या मजूरवर्गांत अद्याप पाळण्यांतच लग्नें लावण्याची वहिवाट आहे.

एकपत्नीविवाहपद्धतींतहि कांहीं दोष व न्यूनता आहे हें सर्व कबूल; पण आमचे कायदेपंडित असा मुद्दा पुढें आणतात, कीं स्त्रियांच्या न्याय्य व कायदेशीर हक्कसंबंधांत उत्तरोत्तर सुधारणा होत चालली आहे व लौकरच पुरुष आणि स्त्रिया यांस कायद्याच्या दृष्टीनें समानतेच्या भूमीवर आणतां येईल व असें झालें म्हणजे सध्यांच्या एकपत्नीविवाहपद्धतींतील दोष नाहींसे होऊन स्त्रियांच्या सर्व तक्रारी मिटतील. तेव्हां कायदेपंडितांची ही समानतेची भूमिका म्हणजे काय हें आपण पाहूं. सध्यांच्या दिवाणी कायद्याप्रमाणें विवाह अगदीं कायदेशीर होण्यास दोन गोष्टींची आवश्यकता असते. पहिली गोष्ट अशी, कीं विवाहांत वधूवरांची परस्पर राजीखुषीची संमति ( Free Contract ) असावी लागते व दुसरी गोष्ट अशी, कीं हीं दोघें विवाहबद्ध आहेत, तोंपर्यंत परस्परांसंबंधीं त्यांचे हक्क व कर्तव्यें समान भूमिकेवर असावीं लागतात. या दोन गोष्टी कायद्याच्या जोरावर अमलांत आणतां आल्या तर स्त्रियांना जें पाहिजे तें सर्व मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. कायद्याच्या या मूलभूत तत्त्वाच्या कसाला लावून पाहिल्यास सध्यांची वधूवरांची राजीखुषीची संमति व वैवाहिक जीवनांतील समान हक्क व कर्तव्यें हीं किती निकस ठरतात हें समजून येईल.

युरोपियन कायद्याप्रमाणें अगर आपल्याइकडे नुकत्याच अस्तित्वांत आलेल्या स्पेशल मॅरेज ॲक्टप्रमाणें "परस्परां-बरोबर विवाहबद्ध होण्यास आमची संमति आहे" एवढ्या मजकुराखालीं वधूवरांनीं आपली सही ठोकली कीं कायद्यानें आपलें काम चोख बजावलें असें समजलें जातें. पण ही संमति कोणत्या परिस्थितींत मिळवलेली असते अगर प्रत्यक्ष विवाहित जीवनांत हक्क व कर्तव्यासंबंधीं कशी बजावणी होत असते हें पहाणें कायद्याचें काम नाहीं. परंतु थोडी अतर्दृष्टि करून पाहिल्यास ही **संमति** व ही **समानता** किती भ्रामक आहे याबद्दल कायदेपंडितांची खात्री होईल. आपल्याइकडील बालविवाहाची चाल व वधूवर पसंत कर-ण्याची वडिलधाऱ्यांची अनियंत्रित सत्ता इत्यादि एका बाजूस ठेवून प्रत्यक्ष युरोपांत– प्रेमविवाहाच्या माहेरघरांत–वधूवरांनीं परस्परांची निवड करण्याची मोकळीक किती मर्यादित आहे हें पाहिल्यास आश्चर्य वाटेल. जर्मनीसारख्या ज्या युरोपियन राष्ट्रांत वडिलार्जित इस्टेटीवर मुलाचा वारसाहक्क अप्रतिबंध आहे, म्हणजे मुलाच्या कोणत्याहि कृत्याबद्दल बापास आपल्या मलास बेवारस करतां येत नाहीं, तेथें मुलाच्या लग्नास **आईबापांची संमति** अवश्य मिळालीच पाहिजे असा कायदा आहे व इंग्लंड-सारख्या ज्या देशांत मुलाचें लग्न कायदेशीर ठरण्यास आईबापांच्या संमतीची मुळींच गरज नाहीं, तेथें बापास आपली संपत्ति वाटेल त्याला बहाल करण्याची व स्वतःच्या मुलाचा **वारसा रद्द कर-ण्याची** सरमोकळीक आहे! एकूण गोळाबेरीज अशी आहे, कीं ज्याच्याजवळ मुलास मिळवतां येण्याजोगा कांहीं पैसा आहे त्यांच्या मुलास आपली वधू पसंत करण्याची मोकळीक जितकी इंग्लंडअमे-रिकेंत आहे तितकीच फरान्स-जर्मनींत आहे.

ही झाली राजीखुषीची **संमति**. आतां विवाहित नवरा-बायकोंच्या कायदेशीर **समान भूमिकेची** काय वाट लागते ती

पाहूं. अत्यंत प्राची काळीं जेव्हां कुटुंबसंस्थेची पायरी दांपत्यविवाहा-पर्यंत आली होती व अनेक विवाहित कुटुंबें एकाच छावणींत रहात असत, त्या वेळीं अशा छावणीची समाईक गृहव्यवस्था ही एक अत्यंत महत्वाची सामाजिक कामगिरी बायकांकडे होती. छावणी-करितां पुरुषांनीं अन्नाचा पुरवठा करणें, या गोष्टीस त्या वेळीं जितकें सामाजिक महत्व होतें, तितकेंच छावणीची व्यवस्था, मुलांबाळांचें संगोपन या बायकांच्या कामासहि होतें. याचा तप-शीलवार उल्लेख मागें एके ठिकाणीं केला आहे. परंतु ही परिस्थिति पितृवंशपरंपरा स्थापन झाल्यावर, विशेषेंकरून एकपतिविवाहसंस्था रूढ झाल्यावर पार बदलून गेली. त्यानंतर गृहकृत्याचें सार्वजनिक स्वरूप नष्ट होऊन ती निव्वळ खासगी बाब झाली.

समाजास खासगी घरांत लक्ष देण्याचें कारण राहिलें नाहीं. गृह हें त्याचें साम्राज्य. पुरुष हा त्याचा अनियंत्रित सम्राट. अशा गृहांत नोकर होऊन राहण्याचा पहिला बहुमान (!) स्त्रियांस देण्यांत आला व स्त्रियांस सार्वजनिक हक्कापासून व कर्तव्या-पासून मोकळें करण्यांत आलें. अलीकडे औद्योगिक युगांत भांड-वलदारांच्या खासगी फायद्याकरितां फक्त मजुरांच्या स्त्रियांस उत्पादनाच्या कार्यांत भाग घेण्याची संधि देण्यांत आली आणि तीहि अशा अडचणींत, कीं पैसे मिळविण्याच्या कामीं त्यांनीं भाग घेतल्यास त्यांस गृहिणीचें व मातेचें कर्तव्य करण्यास संधीच मिळूं नये; व गृहकृत्याकडे त्यांनीं लक्ष दिल्यास उत्पादनाचें काम त्यांना करतां येऊं नये. स्वतंत्र रीतीनें पैसे मिळविण्याकरितां गिरणींत कामास जावयाचें असेल तर मुलांस पाठीशीं बांधून घेऊन गिरणीं-तील सार्वजनिक पाळण्यांत त्यांस टाकून मगच स्त्रियांनीं कामा-वर जावें; नाहींतर मुलें पाजीत घरीं स्वस्थ बसावें. ही जी मजूर स्त्रियांची अवस्था, तीच पांढरपेशा वर्गांतील शिकल्यासवरलेल्या,

धंदा करण्याची इच्छा करणाऱ्या बायकांची आहे. डॉक्टरणीचा, मास्तरणीचा, सुईणीचा, नर्सचा कोणताहि पैसे मिळविण्याचा धंदा तिला पत्करणें झाल्यास प्रथम तिनें आपल्या गृहजीवनावर तुळशीपत्र ठेवावयास हवें, अशी परिस्थिति आहे. सध्यांची एकपतिगृहव्यवस्था असो अगर एकपत्नीगृहव्यवस्था असो, ती स्पष्ट अगर प्रच्छन्नपणें स्त्रियांच्या कौटुंबिक गुलामगिरीवर रचलेली आहे सध्यां मध्यम स्थितीतील घरांत तरी पुरुषानें मिळवून आणावें व बायकांनीं मिंधेपणानें त्यावर कसातरी निर्वाह करावा अशी परिस्थिति आहे. पुरुषांच्या या सांपत्तिक वर्चस्वामुळें स्त्रियांना खालच्या हीन पायरीवर डांबून ठेवण्यास पुरुषांना कायद्यांत खास सवलतीची तरतूद करण्याची गरजच पडत नाहीं. कायद्याच्या पुस्तकांत स्त्री-पुरुषांच्या समान दर्जाचे कितीहि पोवाडे गाइले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ती समानता दृष्टिपथांत येत नाहीं. प्रत्येक पुरुष हा भांडवलदार व स्त्री ही मजूरदार असा संबंध आहे. स्त्री-पुरुषांमधील समान दर्जा प्रस्थापित होण्याच्या कामीं सध्यांच्या लोकशाही राज्यपद्धतीचा फारसा उपयोग होणार नाहीं. उलट अशा लोकशाहींत पुरुषांचे हितसंबंध डोळ्यांत तेल घालून रक्षण करण्यांत येतात.

कुटुंबातील पुरुषांचें अनिष्ट वर्चस्व नष्ट होऊन स्त्रीवर्गास योग्य न्याय मिळून त्यांचें बंधमोचन होण्याची वेळ जेव्हां येईल तेव्हां असें दृष्टोत्पत्तीस येईल, कीं सामाजिक उत्पादनाच्या कामीं व सार्वजनिक कर्तव्य बजावण्याच्या कामीं पुरुषांच्या बरोबरीनें त्यांना खरे कायदेशीर हक्क दिल्याशिवाय हें काम होणें अशक्य आहे. अशी परिस्थिति निर्माण झाल्यावर त्या वेळीं कुटुंबसंस्थेचें स्वरूप कसें राहील, स्त्रियांच्या व पुरुषांच्या जीवनात व एकंदर समाजरचनेंत कोणते फेरफार उत्पन्न होतील, याची रूपरेषा पुढील प्रकरणांत देऊन ही लेखमाला पुरी करण्यांत येईल.

# प्रकरण ५ वें

मागील चार लेखांत दाखविलेल्या कुटुंबरचनेच्या इतिहासावरून आपणांस असें आढळून येईल, कीं या रचनेच्या चढत गेलेल्या पायऱ्या व मानवी समाज-उत्क्रान्तीच्या तीन अवस्था या एकमेकांशीं जुळतात. **जंगली** अवस्थेंत प्रथम सपिंड व व नंतर असपिंड पण **संघकुटुंबरचना**; **रानटी** अवस्थेंत **दांपत्य-**कुटुंबरचना व नागरिक अवस्थेंत प्रथम **एकपति** व नंतर **एकपत्नी-**कुटुंबरचना अशी त्यांची मांडणी करतां येते. दांपत्य व एकपति-कुटुंबरचनेच्या दरम्यान स्त्रीवर्गाच्या हक्कांवर **आक्रमण, अनेक पत्नी** करण्याची चाल व त्यालाच चिकटून असलेली **वेश्यावृत्ति** व **व्यभिचार** हीं अमलांत आलीं.

परिस्थितीप्रमाणें बदलत चाललेल्या या कुटुंबरचनापद्धतीचें सिंहावलोकन केल्यास आपल्यापुढें **चार गोष्टी** ठळकपणें उभ्या रहातात. पहिली गोष्ट अशी, कीं ही रचना केव्हांहि स्थिर स्वरूपाची नाहीं. त्यांत अनादि कालापासून टप्प्याटप्प्यानें बदल होत आला आहे. दुसरी गोष्ट अशी, कीं **उपजीवन, संरक्षण** व **सुखसंवर्धन** या कामीं लागणारी **सामुग्री** मनुष्यास जसजशी उपलब्ध होत गेली, त्या मानानें या रचनेंत फेरबदल होत गेला आहे. तिसरी गोष्ट ही, कीं या फेरफारांतील कांहीं टप्प्यापर्यंत स्त्रीपुरुषांचा **सामाजिक दर्जा** समान भूमिकेवर राहिला. परंतु पुढील टप्प्यांत स्त्रियांचा दर्जा खालावत चालला आणि आपल्या पौर्वात्य देशांत त्याची परमावधि झाली. चवथी गोष्ट म्हणजे स्त्रियांच्या या सामाजिक अधःपातास मुख्यतः **पुरुषवर्गाचें**

**आर्थिक वर्चस्व** व पुरुषाला खाजगी मालमत्ता **वंशपरंपरागत** करण्याची मिळालेली संधि ह्या गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत. काहीं लोकांचें असें म्हणणें आहे, कीं स्त्रिया पुरुषांपेक्षां शरीरबलानें कमी आहेत व त्यांच्यामागें जननबालसंगोपनादि कामांची अडचण आहे, या गोष्टी स्त्रीदास्याच्या बुडाशीं आहेत. परंतु हा आक्षेप भ्रामक आहे. याबद्दल खुलासा या प्रकरणाच्या शेवटीं दिला आहे.

स्त्रीपुरुषसंबंधाच्या विकासांत एक सामान्य गोष्ट आपल्या नजरेस येते, ती ही, कीं या दीर्घ कालांतील घडामोडींनीं स्त्रीपुरुषांच्या स्वैरविहारास उत्तरोत्तर आळा पडत चालला आहे व स्त्रियांच्या संबंधांत तरी तो कडक रीतीनें अमलांत आणला जात आहे. परंतु पुरुषांमधील स्वैराचारास कोणत्या ना कोणत्या मार्गानें अद्यापपावेतों मोकळीक आहे. जी आगळीक बायकांच्या संबंधांत 'घोर कृत्य' मानली जाते व जिच्यापायीं स्त्रियांस कायद्यानें व समाजानें दिलेली अत्यंत कडक शिक्षा भोगावी लागते, तो अपराध पुरुषासंबंधानें केवळ एक उपेक्षणीय दोष अगर फार झाल्यास एक लज्जास्पद व्यंग एवढेंच मानलें जातें. परंतु या पक्षपाताचा परिणाम स्त्रियांपेक्षां **पुरुषांच्या वैवाहिक अधःपातासच** कारणीभूत झाला आहे. स्त्रियांचा अधःपात वेश्यावर्गापुरताच मर्यादित राहिला आहे व तो जितका खोल समजला जातो तितका नसतो. परंतु स्वैराचाराची प्रतिक्रिया पुरुषवर्गावर होऊन या **सबंध वर्गाची दानत** त्यामुळें खालावली आहे. सध्यांच्या वैवाहिक जीवनांत खऱ्या प्रेमाची ऊब नाहींशी झाल्यावरहि स्त्रीपुरुषांस नाइलाजानें एकत्र रहावें लागतें; त्यामुळें सध्यांच्या सदोष विवाहसंस्थेमुळें व्यभिचाराला अप्रत्यक्षपणें उत्तेजनच मिळत आहे.

तेव्हां महत्वाचा प्रश्न असा उद्‌भवतो, कीं ज्या अर्थीं सध्यांची दोषयुक्त अपूर्ण विवाहपद्धति समाजांतील **आर्थिक विषमतेवर**

व **वर्गवर्चस्वावर** उभारली आहे,) त्या अर्थी ही विषमता व हें वर्चस्व नष्ट झाल्यास विवाहपद्धतीच नष्ट होऊन **स्वैराचारास** उत्तेजन मिळणार नाहीं कशावरून ? )

सध्यां जगांत अशी एक राजकीय व सामाजिक **क्रान्ति** होऊं पहात आहे, कीं त्यामुळें संपत्तीवरील खासगी मालकी नष्ट होईल व ती पुरुषांचीहि नव्हे अगर बायकांचीहि नव्हे, तर सर्वांची **समाईक** होईल. मुलांस वारसाहक्कानें वडिलोपार्जित मत्ता मिळण्याचा प्रश्नच तेथें रहाणार नाहीं. सध्यांप्रमाणें पुरुष **एकपत्नी** रहात नसले तरी बायकांनीं **एकपति** राहिलेंच पाहिजे अशी सक्ती त्या क्रान्तीनंतर रहाणार नाहीं. पैशाकरितां दुसऱ्याची मजूरी करणारा वर्ग नाहींसा होईल. त्याचप्रमाणें पैशाकरितां आपलें शरीर विकणारा **वेश्यावर्गाहि नाहींसा** होईल. सध्यांची **विवाहपद्धति व वेश्यावृत्ति** हीं परस्पर विरोधी भासणारीं पण एकाच परिस्थितीचीं उत्तर-दक्षिण दोन अविभाज्य टोकें आहेत. सध्यांची **विवाहपद्धति** व **वेश्यावृत्ति** या जुळ्या बहिणी आहेत. त्यांपैकीं एक बहीण वेश्यावृत्ति या नवीन होणाऱ्या समाजांत नष्ट होत असेल तर "इंद्राय तक्षकाय स्वाहाः" याप्रमाणें **विवाहपद्धतीच** त्याबरोबर **नष्ट** होणार नाहीं कशावरून ?

सध्यांच्या समाजांत कुटुंब हा समाजाचा आदर्श उत्पादन-घटक ( Economic Unit) आहे. अनेक स्वतंत्र कुटुंबें मिळून एक समाज होतो. प्रत्येक कुटुंबाची अंतर्व्यवस्था ही **स्वायत्त** आहे. त्यांत **समाजसंस्थेस** हात घालतां येत नाहीं. परंतु क्रान्तीनंतर कुटुंबाची स्वायत्तता नष्ट होईल व कुटुंबाचा कारभार खासगी न रहातां त्यास **सार्वजनिक** स्वरूप प्राप्त होईल. कुटुंबांतील मुलें ही आईबापांची खासगी मालमत्ता न रहातां त्यांचें

संरक्षण, पोषण, शिक्षण, या सर्व बाबी समाजसंस्थेच्या ताब्यांत रहातील. या समाजसत्तेंत **औरस** अगर **अनौरस** मुलें असा भेदाभेद केला जाणार नाहीं. स्त्रियांच्या पोटीं प्रजा उत्पन्न होणें हें त्यांचें एक **सामाजिक कर्तव्य** असें समजलें जाईल. त्यांस झालेलीं मुलें हीं औरस आहेत कीं अनौरस आहेत याबद्दल किंचितहि फिकीर न करतां त्यांस समान **हक्क** व समान **मदत** देण्यांत येईल व सध्यांप्रमाणें चोरटचा कारभारांतील 'घोर परिणामाची' कोणास भीति अगर लज्जा वाटणार नाहीं. अशा परिस्थितींत विवाहसंस्थेचा चक्काचूर होऊन सनातनी म्हणतात त्याप्रमाणें **समाज रसातळास** जाणार नाहीं कशावरून ?

या व अशा प्रकारच्या शंका घेणें सध्यांच्या परिस्थितींत अगदीं स्वाभाविक व क्रमप्राप्त आहे. पुढें पाऊल टाकण्याच्या अगोदर त्यांना समर्पक उत्तर मिळणें जरूर आहे. परंतु या उत्तराची समज पडण्याकरितां प्रथम एका नवीन गोष्टीची चांगली ओळख करून घेणें जरूर आहे. ज्या भावनेची लुडबूड युरोपासारख्या 'प्रीतिविवाहाच्या' माहेरघरांतहि मध्ययुगापर्यंत **कोणीं** चालू दिली नाहीं, अशा वधूवरांमधील व्यक्तिगत **प्रेमाची या** ठिकाणीं आपणांस विशेष ओळख करून घ्यावी लागेल.

(शरीरसौंदर्य, अभिरुचि व स्वभाव यांचा परस्परांस परिचय इत्यादि आकर्षणांचा पूर्वींच्या काळीं विवाहास तयार असलेल्या तरुणांच्या मनांवर कांहींच परिणाम होत नसेल असें संभवत नाहीं. परंतु या बाबींचा **क्षणैक** परिणाम वधूवरांच्या मनांवर होणें वेगळें व परस्परांवरील प्रेम रोमरंध्रांत भिनून परस्परांच्या **चिरसंगतीचा** अभिलाष धरून दोघांनीं आजन्म विवाहबद्ध होण्याचा कृतनिश्चय करणें हें निराळें. यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे) विवाहा-

पूर्वी वधूवरांमध्यें अशा प्रकारचें उत्कट प्रेम असण्याची आवश्यकता आहे, या गोष्टीस प्रथम प्राधान्य मिळालें तें युरोपमध्यें, मध्य-युगाच्या नंतरच (इ. स. १५००) होय. त्या वेळपावेतों वधू-वरांची पसंती करणें हें वडीलधाऱ्यांचें काम होतें. त्यांच्या पसंतीस निमूटपणें आपली संमति देणें हें वधूवरांस भागच पडत असे. ज्या सांपत्तिक कारणामुळें समाजांत स्त्रियांची पीछेहाट होत गेली, तीं कारणें अप्रतिबंधपणें आपलें काम बजावीत होतीं. शिवाय संपन्न वर्गाचें हित साधणें हेंच ज्यांचें अवतारकार्य अशा 'परमार्थजीवि' वर्गाकडून स्त्रियांना प्रज्ञाहत करण्याची क्रिया चालूच होती. अशा परिस्थितींत स्त्रीवर्गाची उत्तरोत्तर अवनति होत जाणें हें अपरिहार्य होतें. असें असतांना त्यानंतर विवाह-पद्धतींत युरोपियन समाजांत एक महत्वाचें पाऊल पुढें पडलें. तें म्हणजे, विवाहापूर्वी वरास वधू निवडण्याचा जितका हक्क होता तितका हक्क वधूस वर निवडण्याचा प्राप्त झाला. वरानें वधूची संमति मिळवल्याशिवाय त्याच्या विवाहास कायद्याची अगर धर्माची परवानगी मिळेनाशी झाली. स्त्रीवर्गाला अत्यंत अनुकूल अशी प्रगति फुकाफुकी होणें शक्य नाहीं. जबरदस्त ऐतिहासिक कारणाच्या लकड्याशिवाय ही गोष्ट कधींहि झाली नसती. आज-पावेतों विवाहसंस्थेंत ज्या ज्या घडामोडी झाल्या, त्यांच्या पाठीमागें समाजांत होणाऱ्या अर्थोत्पादनाच्या समान घडामोडी होत्या हें आतांपर्यंत आपण पहात आलों. या क्रमास अनुसरून युरोपांत मध्ययुगानंतर झालेल्या विवाहसंस्थेंतील वर वर्णन केलेल्या घडा-मोडीसहि तशींच कारणें झालीं. तीं अशीं—

इ. स. १५००च्या सुमारास कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लावला. या गोष्टीचा परिणाम युरोप खंडाच्या प्रगतीवर जितका झाला तितका अन्य कोणत्याहि कारणानें झाला नाहीं. पूर्व ग ला-

र्धाच्या एका कोंपऱ्यांत वसलेल्या युरोपखंडास नवखंड पृथ्वी आपल्या मुठींत आल्याप्रमाणें वाटूं लागलें. या शोधामुळें सबंध युरोपखंडांतील लोकांच्या दृष्टिकोनांत अत्यंत महत्वाची खळबळ उडून गेली. जुने आचार, जुन्या रूढि यांच्या मगरमिठींतून स्वतंत्र होऊन दृष्टिपथापुढें पसरलेल्या अफाट पृथ्वीचें व अलोट संपत्तीचें स्वामित्व मिळवावें अशी महत्वाकांक्षा युरोपांतील प्रत्येक तरुणाच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली. धर्माच्या नांवाखालीं, शिष्टाचाराच्या नांवाखालीं, समाजांत 'स्थैर्य' राखण्याच्या नांवाखालीं सनातनी मंडळींचें दडपण तरुण मंडळींवर होतें. त्यांच्या कोंडमाऱ्यांतून सुटण्याचे अनेक दिशेनें त्या काळीं प्रयत्न चालू झाले. अशा परिस्थितींत एकेक सनातनी पाश तुटत जाऊन ज्याला आपण 'व्यक्तिवाद' ( Individualism ) म्हणतों त्याचा युरोपखंडांत उद्भव झाला. मनुष्याचा आत्मा स्वतंत्र आहे; त्याची कर्तुमकर्तुम् शक्ति ( Freedom of will ) परिस्थितिनिरपेक्ष आहे; व्यक्तीला जन्मसिद्ध हक्क असे कांहीं असतात; त्या हक्कांच्या आड येण्याचा समाजासहि अधिकार नाहीं; व्यक्तीव्यक्तीमधील होणाऱ्या कारभारांत दोघांनाहि एकमेकांशीं स्वेच्छेनें वाटेल ते करार (Free contract) करून त्याप्रमाणें वागण्यास पूर्ण स्वातंत्र्य आहे; राजकारणांत लोकशाहीचा पुरस्कार होऊन दरएक व्यक्तीस मताधिकार आहे; धर्मकारणांत धर्मगुरूंचें महत्व कमी होऊन प्रत्येक मनुष्यमात्रास प्रार्थनेच्या द्वारें ईश्वराशीं स्वतंत्र संबंध ठेवण्याचा अधिकार आहे. उद्योगधंद्यांत स्पर्धेला मुक्तद्वार असावें; त्यानें आपला उत्कर्ष करून घेण्यास त्या वेळच्या गिल्ड ( Guild ) संस्थेची लुडबूड चालूं नये; त्या वेळच्या सरंजामशाहींतील कुळांकडून सक्तीनें शेतीचें अगर घरगुती काम करून घेण्याचा जमीनदारांस हक्क नाहीं; संमति, अनुरोध, रुकार इत्यादि शब्दांनीं व्यक्त

होणारा व्यवहाराचा प्रचार सर्वत्र सुरू व्हावा व येथून पुढें राजा व प्रजा, **पति आणि पत्नी**, माता-पितर व अपत्यें, स्वामी आणि सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेता व ग्राहक यांतील व्यवहारसंबंध उत्तरोत्तर बलात्कारानें न होतां संमतिपूर्वक होत गेले पाहिजेत; अशी **व्यक्तिवादाच्या** तत्त्वज्ञानाची रूपरेषा आहे.

इतक्या विविध संबंधांत समाजाच्या दृष्टिकोनांत व आचारांत खळबळ होत चालली असतांना स्त्रियांवरील सामाजिक, राजकीय व धार्मिक निर्बंध पूर्वींप्रमाणें कायम रहाणें शक्य नव्हतें. स्त्रियांचें अर्थोत्पादनाचें स्वातंत्र्य, खासगी मिळकतीवरील त्यांचा कायदेशीर हक्क, विवाहापूर्वी बराबरोबरीनें वधूला संमति देण्याचा अधिकार इत्यादि सवलती व हक्क स्त्रीवर्गास साहजिकच प्राप्त झाले.

युरोपांत झालेल्या या मूलग्राही परिवर्तनाच्या मुळाशीं अमेरिका खंडाचा शोध, हिंदुस्थानच्या मार्गाचा शोध, अर्थोत्पादक साधनांचा उत्कर्ष हींच कारणें होतीं. या नवीन साधनांचा मनसोक्त उपभोग घेण्यास जून्या **अपरिवर्तनीय** समजल्या जाणाऱ्या आचारविचारांचा विध्वंस होणें हें अपरिहार्य होतें. रूढ झालेल्या या राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रगतींत ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी आहे, कीं या प्रगतीचा थोडाबहुत फायदा समाजांतील सर्व थरांस जरी मिळाला असला, तथापि ज्यांच्या हातांत ससा तो पारधी अशी स्थिति होती. ज्यांच्या हातांत धनोत्पादनाचीं साधनें होतीं, त्यांनीं राजकीय सत्ता काबीज करून समाजांतील खालच्या थराला पिळून आपली संपत्ति वाढविण्याचा सपाटा चालविला होता. त्या वेळच्या प्रागतिक विचारसरणीप्रमाणें व्यक्तीव्यक्तीच्या व्यवहारांत संमति, रुकार, समान हक्क इत्यादि गोष्टींचा जरी शिरकाव झाला होता, तथापि या बाह्य देखाव्याखालीं सत्ताधारी व मत्ताधारी वर्गानें आपलें वर्गवर्चस्व कायम राहील अशी कायद्यांतच खबरदारी

(५७५७)
७८ आब. २३४

घेतली होती. स्त्रियांच्या संबंधानें विवाहांत त्यांच्या संमतीला जरी प्राधान्य दिलें होतें, तरी स्त्रीपुरुषांतील सांपत्तिक विषमता अद्याप नष्ट झाली नव्हती व विवाहबद्ध होण्याच्या कामांत सर्वस्वी प्रेमाचें साम्राज्य स्थापित झालें नाहीं. वधूवरांनीं परस्पर निवड करण्याच्या कामांत सांपत्तिक स्थिति, धर्म, वर्गाचे हितसंबंध इत्यादिकांचें महत्व पूर्वींप्रमाणें कायम राहिलें. यामुळें समाजांत संपत्तीची वाढ जसजशी होत गेली त्या मानानें विवाहांतील सांपत्तिक बाबींचें महत्व जास्त जास्त होत चाललें व निव्वळ प्रेमाच्या वाढीला त्या मानानें अडथळा होत गेला. यास्तव धनिक वर्गांनीं आपल्या फायद्याकरितां घडवून आणलेल्या संमति, रुकार इत्यादि सवलतींचा विवाहाच्या बाबतींत धनिकांनाहि फायदा घेतां आला नाहीं. ' दैवानें दिलें पण कर्मानें नेलें ' या म्हणीप्रमाणें विवाहांतील संमति, रुकार, समान हक्क इत्यादिकांचा फायदा जितका बिनभांडवली मजूरवर्गाला मिळाला तितका धनिक वर्गाला मिळाला नाहीं. धनिक वर्गांत पूर्वापार वहिवाटीप्रमाणें वधूवरांचीं लग्नें मुख्यत्वेंकरून सांपत्तिक स्थिति, सामाजिक दर्जा इत्यादि विचारांच्या प्रेरणेनेंच होत आहेत. नुकतीच झालेली राजे आठवे एडवर्ड व मिसेस सिम्प्सन् यांच्या प्रेमविवाहाची कहाणी ही वरील विधानाचें ठळक उदाहरण म्हणून देतां येईल.

आपल्या इकडे तर विवाहपूर्व निकट प्रेमाची जरुरी पुराणकाळींहि भासली नाहीं. सध्यां बालविवाहाच्या रूढीमुळें तो प्रश्नच उद्‌भवत नाहीं. पूर्वकाळीं व सध्यांहि जो थोडाबहुत प्रेमाचा अंश वैवाहिक जीवनांत दिसून येत आहे, तो विवाहानंतरचा आहे. **विवाहपूर्व** परिचयामुळें उत्पन्न झालेलें उत्कट प्रेम हें विवाहाचें **कारण नव्हे**, तर सामाजिक कर्तव्य म्हणून अंगिकारलेलें वैवाहिक प्रेम हें विवाहाचें **कार्य** आहे. या दोहोंत जमीन-

→ हे चूक आहे. कारण दुष्यंत - शकुंतला
नल - दमयंती, ययाती - देवयानी, भीम - हिडिंबा
तसेच (बहुदा विष्णुपुराणात) नारदांचा प्रेम-
विवाह एका राजकन्येशी तीचे आईवडील भाटा
लावून देतात असा उल्लेख आहे. हीर रांझा, शीरीं फरहाद

अस्मानाचें अंतर आहे. पुराणांतरीं वैवाहिक जीवनाचे आदर्श म्हणून जे दाखले दिले आहेत, ते सर्व या दुसऱ्या प्रकारच्या प्रेमाचे आहेत. खऱ्या उत्कट प्रेमाची **पहिली अट** अशी आहे, कीं तें प्रेम **एकतर्फी** असतां कामा नये. त्याची उत्कटता दोघांतहि सारखीच असली पाहिजे. त्यांत **चिरसहवासाची** गोडी इतकी असली पाहिजे कीं, परस्परांची एका क्षणाचीहि तुटातूट असह्य झाली पाहिजे. परस्परांचें हित साधण्याकरितां **आत्मसमर्पण** इतकें जाज्वल्य असलें पाहिजे, कीं प्रसंगीं जिवाची पर्वा न करतां तें साधण्याची परस्परांची महत्वाकांक्षा असली पाहिजे. अशा निकषास लावून आपल्या पुराणांतील पंचकन्या आणि त्यांचे पति यांच्यांतील प्रेमाची परीक्षा केल्यास त्यांस दुसऱ्या वर्गांत बसविणेंच भाग आहे. ही तुलना करण्यांत आपल्या पौराणिक पात्रांचा कोणत्याहि रीतीनें अनादर करण्याचा आमचा हेतु नाहीं. तीं पात्रें इतर दृष्टीनें आदरणीय आहेत. परंतु प्रस्तुत विषयाशीं त्यांचा संबंध आल्यानें त्यांचा निर्देश या ठिकाणीं करावा लागत आहे. पुराणांतील अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी, दमयंती यांचीं उदाहरणें घेतां विवाहापूर्वीं ज्या निकट प्रेमाची आपण अपेक्षा करतों तसें परस्परप्रेम या कन्या व त्यांचे भावी पति यांच्यांत होतें असें दिसून येत नाहीं. प्रेमाचा जो उद्‌भव झाला आहे, तो विवाहानंतरचा. बरें, या विवाहोत्तर प्रेमाची परीक्षा केल्यास त्यांतहि संपूर्ण **आत्मसमर्पणाची** व **चिरसहवासाच्या उत्कंठेची** तीव्रता फारशी दिसत नाहीं. या पांचहि कन्यांच्या पतींनीं आपल्या प्रेमनिधानासाठीं आत्मसमर्पण करण्याची तयारी दाखविली नाहीं, एवढेंच नव्हे, तर अभिमानाच्या तोऱ्यांत, लौकिकाखातर, द्यूतासारख्या व्यसनांत सांपडून, खोट्या बचनीकपणाच्या भरांत अगर वैभवाच्या उद्दामपणांत आपल्या

प्रणयिनींवर महत् संकटें आणण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. अहिल्येचा अपराध तिला नकळत झाला आहे हें ठाऊक असूनहि तिला शिळा होण्याची शिक्षा देणें; द्रौपदीला एखाद्या गुलामाप्रमाणें पणास लावून शत्रूस देऊन टाकणें; बिनआधारी लौकिकाच्या आक्षेपामुळें सीतेस असहाय स्थितींत वनांत सोडून देणें; मंदोदरीसारख्या पतिव्रता स्त्रीच्या उरावर दुसऱ्याची चोरून आणलेली बायको आणून ठेवणें; तारामतीसारख्या पतिव्रतेस डोंबास विकणें; दमयंतीसारख्या एकनिष्ठ पत्नीस ती निजली असतां तिचें अर्धें वस्त्र चोरून पळून जाणें हीं उदाहरणें फार झालें तर स्त्रीजीवनावर पुरुषानें मिळवलेला संपूर्ण पगडा अगर स्त्रियांची पुरुषांकडून होणाऱ्या अवहेलनेची पराकाष्ठा (Record-breaking) म्हणून देतां येतील; पण तीं विवाहित जोडप्यांच्या **आत्मसमर्पणाचीं** अगर **चिरसहवासाच्या उत्कंठेचीं** म्हणून देतां येणार नाहींत. खऱ्या उत्कट प्रेमाचा कोठें जुन्या वाङ्मयांत उल्लेख केला असेल, तर तो ललित वाङ्मयांत होय. कालिदासाचें शाकुंतल, मेघदूत, बाण कवीची कादंबरी, सावित्री-आख्यान इत्यादि काल्पनिक साहित्यांत ज्या प्रकारचें विवाहपूर्व प्रेम वर्णिलें आहे, त्यांत ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी आहे, कीं त्यांचा आणि सांप्रदायिक विवाहपद्धतीचा फारसा संबंध नाहीं.

सारांश, विवाहामध्यें खऱ्या प्रेमाचा विकास जितका व्हावा तितका या वेळपावेतों झाला नव्हता, हें उघड आहे. खरोखर पहातां प्रेमाचा संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. स्त्रीपुरुषांना एकत्रित करून, त्यांस परस्परांकरितां झीज सोसावयास लावून, संसाराचा गाडा ओढावयास लावणारी प्रभावी शक्ति कोणती असेल तर ती प्रेमच होय. प्रेमाशिवाय अन्य कोणत्याहि एका कारणानें कुटुंबाची

घटना जमून येणें शक्य नाहीं. प्रेमाला वगळून अन्य भावनेवर कुटुंबाची रचना करणें म्हणजे नवरदेवाला सोडून लग्नाला जाणें (Hamlet without the Prince) असें आहे. अशी गोष्ट असतांना विवाहपद्धतींत प्रेमाचा विकास इतका सावकाश व्हावा, इतकेंच नव्हे, तर त्यास प्रत्यक्ष अडथळे उत्पन्न व्हावे ही किती विचित्र व **विपरीत** गोष्ट आहे ? परंतु असे अडथळे समाजाच्या जीवनकलहांत उत्पन्न झाले ही गोष्ट खरी आहे. मागें दिलेल्या समाजरचनेच्या इतिहासावरून हे अडथळे कोणत्या स्वरूपाचे होते हें समजून आलें आहे. धनसंचय करण्याची **वैयक्तिक तृष्णा,** वर्चस्व गाजवण्याची आसुरी **लालसा,** स्वतःच्या लाभासाठीं इतरांच्या व दुसऱ्यांच्या नैसर्गिक अडचणींचा उपयोग करून घेण्याची **प्रवृत्ति** इत्यादि **समाजद्रोही** (Anti-social) भावनांच्या कचाटींतून प्रेमाला आपली वाट मोठ्या मुष्किलीनें काढावी लागली आहे. परंतु प्रेमासारख्या जीवनक्रियेंत अत्यंत जिव्हाळ्याच्या भावनेला फार काल दडपून ठेवणें शक्य नसतें. या दडपशाहीची घातुक प्रतिक्रिया होऊन त्याची झळ समाजाला झोंबल्याशिवाय रहात नाहीं. स्त्रियांची अवनति, त्यांच्या कर्तृत्वशक्तीचा ऱ्हास, अनेक हितविरोध व कलह ह्यांमुळें कुटुंबसंस्थेला लागलेली **कीड** व एकंदर मानवी समाजाच्या प्रगतीस त्यामुळें बसलेली **खीळ** हीं सर्व या प्रतिक्रियेचींच कटु फळें आहेत.

यावरून निश्चित अनुमान असें निघतें, कीं वैवाहिक जीवनास सध्यांपेक्षां वरच्या पायरीवर नेणें झाल्यास त्यांत इतर व्यावहारिक बाबींपेक्षां **खऱ्या प्रेमाची** वाढ होणें अवश्य आहे. विवाहसंस्थेची कमाल मर्यादा अगर अखेरची पायरी म्हणजे त्यांत **प्रेमाचा संपूर्ण विजय होणें** हीच होय आणि अशाच विवाहपद्धतीस **प्रेमविवाह** हें नांव सार्थकतेनें लावतां येईल.

## ( ६ ) प्रेमविवाह– Love Marriage.

( Without distinction of RIGHTS and DUTIES between man and woman. )

विवाहपद्धतींत आजपर्यंत प्रेमाला आपलें योग्य स्थान न मिळण्याला जी आर्थिक परिस्थिति कारणीभूत झाली, तिच्याशीं टक्कर खेळून प्रेमानें **एकपत्नी**-विवाहपद्धतीपर्यंत आपलें पाऊल रेटीत आणलें आहे. यांत लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे, कीं ही प्रगति **स्त्रीवर्गाच्या पुरस्कारानेंच** घडून आली आहे व अखेर प्रेमाला पूर्ण साम्राज्य मिळवून देण्याचें कार्य कोणाकडून होणार असेल तर तें स्त्रियांकडूनच होय. पशुतुल्य स्वैरविहाराच्या स्थितीपासून **दांपत्य**विवाह रूढ होईपर्यंत स्त्रीपुरुषांच्या व्यवहारांत वाढत्या प्रमाणावर **शुद्धि** व **नियंत्रण** हीं येत गेलीं व सामाजिक जीवनांत स्त्रियांचा योग्य हिस्सा कायम राखण्यांत आला या गोष्टी स्त्रीवर्गाच्या प्रोत्साहनानें व सहकार्यानेंच घडून आल्या हें मागें दाखविलें आहे. परंतु **दांपत्य**-विवाहपद्धतीचे **एकपति** रूपांतर होण्याच्या सुमारास स्त्रियांच्या **वासनांची** व **हक्कांची** पायमल्ली होत गेली. तथापि पुढें युरोपखंडांत सांपत्तिक परिस्थितीच्या रेटयांत विवाहपद्धतींत थोडी सुधारणा होऊन त्याचें **एकपत्नी**-विवाहपद्धतींत रूपांतर झालें व प्रेमाला आपलें एक पाऊल पुढें टाकण्याला संधि मिळाली. तथापि त्याचा फायदा धनिक वर्गास किती मर्यादित झाला हें मागें दाखविलें आहे. तेव्हां स्त्रीवर्गावर सध्यां असलेलें **आर्थिक, सामाजिक धार्मिक** दडपण काढून घेतल्यास त्यांच्या सहकार्यानेंच विवाहाचें **उत्तुंग शिखर** गांठतां येईल असें निश्चित अनुमान काढण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

( विवाहसंबंध जुळवितांना प्रेमाच्या पूर्ण विकासास जबरदस्त अडथळा कशाचा होत असेल तर तो स्त्रीपुरुषांमधील **आर्थिक**

**विषमतेचा** होय.) कुटुंबांतील आणि समाजांतील स्त्रियांची मान-मान्यता व समान दर्जा नष्ट होण्यास हीच विषमता कारणीभूत झाली आहे. ' स्त्रिया अद्रव्यवान् आहेत, ' ' स्त्रियांना धनस्वामित्व अगर धनाधिकार नाहीं, ' हें एक वेळ धर्मशास्त्रानें आणि कायद्यानें ठरवून टाकल्यावर पुरुषांच्या वर्चस्वाखालीं स्त्रियांना आपलें प्रेम, वासना, भावना, आकांक्षा या दडपून टाकाव्या लागल्यास आश्चर्य काय ? तेव्हां धनाच्या विषम वांटणीमुळें अगर धनोत्पादनांतील त्यांचा वांटा नष्ट झाल्यामुळें पुरुषांस मिळालेलें वर्चस्व व त्या वर्चस्वाचा पुरुषांकडून झालेला **अश्लाघ्य** उपयोग हीच प्रेमाच्या आड येणारी सर्वांत महत्वाची धोंड आहे. अलीकडे मराठी कादंबऱ्यांतून, तरुण विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या वाद-विवादांतून असा एक सूर निघत असतो कीं, ' आर्थिक स्वातंत्र्य मिळालें कीं, स्त्रीवर्गाचा उद्धार होणें शक्य होईल. ' कांहीं अंशीं यांच्या म्हणण्यांत सत्य आहे. परंतु वरपांगीं विचार करणारांस स्त्रीदास्याचा व स्त्रियांच्या अवहेलनेचा वास्तविक उगम कोठें आहे, याचा नक्की पत्ता लावण्याचें **धैर्य** होत नाहीं. स्त्रियांना पुरुषांबरोबर धनोत्पादनाच्या क्षेत्रांत वाव दिला, कीं स्त्रियांना तक्रार करावयास जागा रहातां कामा नये अशी त्यांची समजूत झालेली असते. परंतु धनाची विषम वांटणी हें एक सहज दिसणारें स्त्रीदास्यरोगाचें लक्षण आहे. या रोगाचें अंतरंगांतील कारण म्हणजे या विषमतेमुळें मिळालेलें पुरुषांचें असमर्थनीय **वर्चस्व** हें आहे. तेव्हां स्त्रीदास्यविमोचनाच्या प्रयत्नांत स्त्रियांना पुरुषांबरोबर धन मिळवण्याची संधि मिळत आहे किंवा नाहीं हा प्रश्न नसून **पुरुषांचें अनिष्ट वर्चस्व** त्यामुळें किती प्रमाणांत कमी झालें आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. पुरुषांचें वर्चस्व स्थापित होऊन स्त्री-वर्गाला हीनपणा येण्यास मुळांत संपत्तीची विषम वांटणी हें जरी

कारण असलें तरी त्या वर्चस्वाच्या जोरावर कायदे, धर्मशास्त्र, रूढि इत्यादि विविध मार्गांनीं पुरुषवर्गानें स्त्रीवर्गावर इतकीं बंधनें निर्माण केलीं आहेत, कीं हीं सर्वच्या सर्व बंधनें **नष्ट होऊन प्रत्येक क्षेत्रांत** स्त्रियांस पुरुषांबरोबर समानतेचे हक्क व सवलती मिळाल्याशिवाय स्त्रियांच्या मनांत समानतेचा भाव व पुरुषांच्या मनांत वर्चस्वाचा अभाव कधींहि निर्माण होणार नाहीं.

यावर पुरुषांच्या वर्चस्वाचा पुरस्कार करणाऱ्यांकडून असा आक्षेप घेण्यांत येईल कीं, स्त्रियांच्या वांट्यास आलेल्या असमान-पणास संपत्तीची व सामाजिक कर्तव्याची विषम वांटणी हीं जरी कारणें धरलीं, तथापि पुरुषवर्गास मिळालेलें आर्थिक वर्चस्व हा स्वाभाविक परिस्थितीचा एक अनिवार्य परिणाम आहे. हा परिणाम होण्यास बलवत्तर नैसर्गिक कारणें आहेत. त्यामुळें स्त्रियांच्या वांट्यास आलेली हीनता ही अनिवार्य आहे. ती त्यांनीं मुकाट्यानें सहन केलीच पाहिजे. हीं नैसर्गिक कारणें अशीं कीं, स्त्रियांच्या शरिराची रचना निसर्गानेंच पुरुषांपेक्षां कमकुवत ठेविली आहे. शिवाय जननाची व बालसंगोपनाची जी नैसर्गिक कामगिरी त्यांच्यावर आहे, त्यामुळें स्त्रियांचें कार्यसामर्थ्य कमी असणें हें स्वाभाविक आहे.

या दोनहि आक्षेपांत गृहित धरलेली नैसर्गिक परिस्थिति नाकबूल करतां येणार नाहीं. किंबहुना स्त्रियांच्या जीवनाला जें वैशिष्टच प्राप्त झालें आहे तें यामुळेंच आहे. परंतु आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, त्यामुळें सध्यां प्रचारांत असलेल्या स्त्रियांच्या हीन सामाजिक गुलामगिरीचें त्रिकालाबाधित समर्थन होऊं शकणार नाहीं. स्त्रियांच्या शारीरिक दुर्बलतेमुळेंच त्यांना पुरुषवर्गाची सामाजिक गुलामगिरी पतकरावी लागत आहे, असें म्हणावें तर, पुरुषवर्गांतच

All page V. Imp



जे वरिष्ठ व कनिष्ठ वर्ग झाले आहेत, एक दुसऱ्या वर्गास हीन स्थितींत ठेवून राबवीत आहे, त्यासहि या दोन वर्गांतील शरीर-सामर्थ्यांतील कमजास्तपणा कारणीभूत झाला असला पाहिजे. म्हणजे, सामाजिक श्रेष्ठतेचा उपभोग घेणारा वर्ग खालच्या वर्गा-पेक्षां शरीरबलानें श्रेष्ठ असावयास पाहिजे. श्रेष्ठ वर्गांतील सर्व लोक गामा, गुंगा, रामस्वामी अगर वेंकप्पा बुरूड असले पाहिजेत. परंतु अनुभव त्याच्या अगदीं उलट आहे. लुबाडले जाणारे कष्टाळु लोकच शरिरानें बळकट असतात; श्रीमंतीचा व सत्तेचा उपभोग घेणारा वर्गच शरिरानें निकस असतो.

बरें, स्त्रियांच्या गळयांत पडलेलें जनन व बालसंगोपनाचें कार्य हेंच जर त्यांच्या सामाजिक गुलामगिरीचें मूळ मानलें, तर **इतिहास** त्याच्या अगदीं उलट साक्ष देत आहे. मनुष्यसमाजाची उत्क्रांति वन्यस्थितीच्या पायरीवर असतांना स्त्रियांची सामाजिक सत्ता व मानमान्यता पुरुषांपेक्षां श्रेष्ठ होती हें आपण पाहिलें आहे. त्या काळीं सामाजिक उत्पादन रोजच्या गुजराण्यास जेमतेम पुरण्याइतकें होतें. संचित धनाचा पाठिंबा कोणत्याच वर्गाला नव्हता. परंतु प्रत्येक जमातीला आपलें संरक्षण करण्याकरितां अगर शत्रूचा पराभव करण्याकरितां मनुष्यबळावरच सारी भिस्त ठेवावी लागत होती. अशा वेळीं **वंशवृद्धीचें** कार्यच अव्वल सामाजिक दर्जाचें समजलें जात असे यांत कांहीं आश्चर्य नाहीं. शिवाय, त्या वेळीं मुलाचा औरसपणा मातेवरूनच ठरवावा लागत असे. त्यामुळें सध्यांप्रमाणें जनन देणें व बालसंगोपन करणें हीं कर्तव्यें स्त्रियांच्या सामाजिक मान्यतेच्या मार्गांतील धोंड अशीं न समजतां तीं त्यांच्या मान्यतेस मूलाधार समजलीं जात.

ही फार जुन्या काळची गोष्ट. परंतु सध्यांच्या परिणत उत्पा-दनाच्या युगांतहि बलहीनता अगर जननक्रिया या नैसर्गिक अड-

All page v. Imp:



चणी स्त्रियांच्या सामाजिक गुलामगिरीचें समर्थन करूं शकणार नाहींत. आधुनिक उत्पादनपद्धति ही आधिभौतिक शास्त्राच्या ज्ञानावर यांत्रिक साधनानें होत आहे. त्यांत उत्तरोत्तर प्रत्यक्ष शारीरिक शक्तीची अगर कौशल्याची गरज कमीकमी होत चालली आहे. यंत्र आपलें काम बरोबर करतें आहे किंवा नाहीं हेंच पहाण्याचें काम तेवढें शिल्लक रहात चाललें आहे. यामुळें सारख्या कामास स्त्री व पुरुष हा भेद लक्षांत न आणतां सारखा पगार देण्याची प्रथा रशिया देशांत सर्रास व इतर देशांत वाढत्या प्रमाणावर दिसून येत आहे. रशिया देशांत तर स्त्रियांच्या व पुरुषांच्या शारीरिक व बौद्धिक वाढीस समान उत्तेजन मिळत असल्यामुळें तेथें एकदोन पिढ्यांतच स्त्रीवर्गांतील नैसर्गिक समजलें जाणारें शारीरिक व बौद्धिक बलांतील अंतर नामशेष होणार आहे. त्याचप्रमाणें त्या प्रदेशांत सर्वस्वीं वैयक्तिक समजली जाणारी बालसंगोपनाची कामगिरी इतउत्तर सामाजिक क्षेत्रांत आणिली जात आहे. ही कामगिरी तज्ञांकडून सामाजिक रीतीनें पार पाडणें कधींहि शक्य होणार नाहीं अशी कांहीं लोकांची समजूत आहे. पण बालसंगोपनाइतकीच महत्वाची बालशिक्षणाची बाब तज्ञांच्या मदतीनें योग्य रीतीनें पार पडत आहे याचा अनुभव येत गेल्यानें त्याचा बागुलबुवा लोकांस वाटेनासा झाला आहे. त्याचप्रमाणें बालसंगोपनाचें काम अशिक्षित आईबापांपेक्षां तज्ञांमार्फत सामाजिक रीतीनें पार पाडतां येतें, ही गोष्टहि पुढें लोकांच्या अंगवळणीं पडणार आहे.

तात्पर्य, सध्यांच्या काळीं स्त्रीपुरुषांतील सामाजिक समतेचा प्रश्न निघाला असतां स्त्रियांच्या ज्या नैसर्गिक अडचणींकडे बोट दाखविण्यांत येतें, त्या अडचणींच्या आधारावर **स्त्रियांच्या सामाजिक विषमतेचें** समर्थन बिलकूल करतां येत नाहीं. स्त्रियांच्या

असमानतेचीं मुख्य कारणें त्यांस अद्रव्यवान् ठरवून, सामाजिक कर्तव्यापासून पराङ्मुख करणें हींच आहेत. यानें उत्पन्न झालेल्या असमानतेला पुढेंपुढें उग्र स्वरूप येण्याला स्त्रियांची शारीरिक दुर्बलता व जननसंगोपनाची अडचण या पुरवणीची त्यांस जोड मिळाली आहे एवढेंच.

परंतु या सर्व अडचणींच्या कात्रींत सांपडल्यामुळें उत्पन्न झालेला सामाजिक हीनपणा **आमूलाग्र** घालविणें झाल्यास सध्यां **धनसंबंधावर** उभारलेल्या समाजरचनेंत कधींहि संधि मिळणार नाहीं.

आगामी सामाजिक **क्रांतीनंतर** ही संपूर्ण समानता दृष्टिपथांत येईल व त्याच वेळीं सांपत्तिक वरचढपणाच्या जोरावर पुरुषांनीं चालविलेल्या अत्याचारास आळा बसून शुद्ध प्रेमाच्या प्रकाशांत विवाहसंबंध जास्त **शुद्ध** व **टिकाऊ** होईल. परंतु ही समानता पदरीं पडेपर्यंत स्त्रीवर्गास हात जोडून स्वस्थ बसण्याची जरुरी नाहीं. सध्यांच्या असमाधानकारक परिस्थितींतच मिळवतां येण्याजोगें सर्व **आर्थिक** व **सामाजिक** स्वातंत्र्य जिंकून घेण्याची कमालीची खटपट त्यांनीं चालूं ठेवली पाहिजे.

सध्यांच्या समाजरचनेंत पुरुषांच्या अनाचारास अनुकूल असलेला **वेश्याव्यवसायहि** नष्ट होणें शक्य नाहीं. शुद्ध प्रेमाच्या प्रेरणेशिवाय जोंपर्यंत विवाह होत रहातील व प्रेम नसतांहि स्त्रीपुरुषांस एकत्र रहाण्याची जबरदस्ती राहील, तोंपर्यंत हा व्यवसाय नष्ट करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे लोहचुंबकांतील उत्तर ध्रुव कायम ठेवून दक्षिण ध्रुव तेवढा नष्ट करण्याच्या प्रयत्नाप्रमाणें तो केव **असाध्य** आहे. वेश्याव्यवसायास वरवर कितीहि निंदाव्यंजक नांवें ठेवण्यांत आलीं तरी तें अरिष्ट समाजांतून समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न कधींहि केला जाणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर

'धर वाचनालय, जळगाव.



कायद्याच्या मदतीनें त्या व्यवसायांतील रोगप्रसाराची भीति काढून टाकून तो जास्त **सुरक्षित** व **आकर्षक** करण्याची सरकार काळजी घेत असतें. लोकांनीं दारूच्या व्यसनापासून मुक्त व्हावें म्हणून गुत्त्यावर टेहळणीची मोहीम ( Picketing ) चालते, त्याप्रमाणें प्रत्येक वेश्येच्या दारावर टेहेळणी करण्याची चळवळ कोणीं कधीं ऐकली आहे काय ?

सारांश, **क्रान्ती**नंतरच्या परिस्थितींत ज्याप्रमाणें आपली श्रमशक्ति दुसऱ्यास विकून आपला उदरनिर्वाह करण्याची कोणवरहि पाळी येणार नाहीं, त्याचप्रमाणें कोणाहि स्त्रीवर शरीरविक्रय करून आपलें पोट भरण्याचा प्रसंग येणार नाहीं, अशाच समाजरचनेंत वेश्याव्यवसायास आपोआप मूठमाती मिळेळ. त्यामुळें सध्यांच्या विवाहपद्धतीचा अंमल जो स्त्रियांवरच चालत आहे तो तसा पुरुषांवरहि चालू लागेल. संपूर्ण समानतेची अमदानी रूढ झाल्यावर स्त्रीवर्गास कोणत्याहि प्रसंगीं पुरुषवर्गावर असहायतेनें अवलंबून रहाण्याची गरज भासणार नाहीं व त्यानंतर पुरुषांचा **बेइमानपणा** स्त्रिया एक क्षणभर सहन करणार नाहींत. अशा प्रकारें **वर्गवर्चस्व** नष्ट झाल्यानंतर सनातनी म्हणतात त्याप्रमाणें स्वैराचारास उत्तेजन न मिळतां पुरुषांच्या **नाकांत वेसण** अडकविली जाऊन त्यांचें वर्तन जास्त **शुद्ध** होईल.

असो. या एकंदर विवेचनावरून आगामी समाजरचनेच्या उलथापालथींत कौटुंबिक संबंध **नक्की** कशा प्रकारचा राहील हें सांगणें फार कठीण आहे. ज्या भविष्यकाळीं अशी पिढी निर्माण होईल, कीं **आजन्मांत** पैशाच्या अगर ऐहिक लोभाच्या जोरावर कोणत्याहि पुरुषास कोणत्याहि स्त्रीस वश करून घेण्याची संधि मिळणार नाहीं, कोणत्याहि स्त्रीला शुद्ध प्रेमाव्यतिरिक्त कोणत्याहि

पुरुषाच्या स्वाधीन होण्याची पाळी येणार नाहीं, अगर ज्यावर तिचें खरें प्रेम आहे, त्याला आपलें शरीर अर्पण करण्याला कशाचीहि आडकाठी रहाणार नाहीं, अर्थात् **सर्व** अन्यायी निर्बंधांस झुगारून देऊन आपल्या कांताबरोबर विवाहबद्ध होण्याची इच्छा करणाऱ्या स्त्रीच्या मुखांत **"कुणि कसें म्हणा, कुणि करा हवें तें अतां ॥ ते कान्त यापुढें मीहि तयांची कान्ता"** असें कविवर्य तांबे यांनीं घातलेले उद्गार ज्या वेळीं निर्भयतेनें निघूं लागतील; अशा परिस्थितींत जन्म काढणारी पिढी एक वेळ अवनीतलावर संचार करूं लागली म्हणजे त्या वेळीं कुटुंबरचना कशी असावी याबद्दलच्या आमच्या मताची ती काडीचीहि पर्वा करणार नाहीं. त्या वेळच्या समाजास युक्त असा व्यक्तिव्यवहार कसा ठेवावा याचा निर्णय लावण्यास ती पिढी सर्वथैव समर्थ होईल. परंतु एक गोष्ट निश्चित आहे, कीं समाजाच्या सांपत्तिक उत्पादनांत, धनसंबंधांत (Property relations) व इतर सांस्कृतिक बाबींत जसजशी प्रगति होत जाईल त्याप्रमाणें विवाहसंबंधांतहि फेरफार होत जातील. विवाह हे केव्हांहि सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचें प्रतिबिंबच राहील. एवढेंच नव्हे, तर विवाहांत अखेर शुद्ध **प्रेमाचें साम्राज्य** स्थापित झाल्याशिवाय कधींहि रहाणार नाहीं.

—संपूर्ण—

वाचनालय सातारा
दा. नं. ८८४७
से. नं. ........
३६. भवानी पेठ

# पातिव्रत्यासंबंधीं एक चालू वाद.

# पातिव्रत्यासंबंधीं एक चालूं वाद

(विवाहसंस्थेच्या इतिहासाचें शास्त्रीय स्वरूप दाखविण्यासाठीं प्रस्तुत पुस्तकांत जें तात्त्विक विवेचन केलें आहे, त्या विवेचनाच्या आधारावर महाराष्ट्रांतील एका चालूं वादावर प्रकाश पाडणारा हा लेख आम्ही प्रसिद्ध करीत आहों.

—प्रकाशक)

अलीकडे महाराष्ट्रांतील मध्यम वर्गाचें प्रकृतिमान फारच नाजूक झालें आहे. दिसण्यांत यःकश्चित् अशा गोष्टीनेंसुद्धां या समाजांत अनपेक्षित खळबळ उडून जाते. निरभ्र दिसणाऱ्या आकाशांत एकादा लहानसा ढग दिसावा व हां हां म्हणता चोहोंकडे अंधःकार व विजेचा कडकडाट व्हावा, त्याप्रमाणें या वर्गांतील एका विवक्षित भागास एकाएकीं कोणत्यातरी अपशकुनाची बाधा होऊन महदरिष्टाच्या भीतीनें त्याचें थैमान सुरू होतें. हा उत्पात ताबडतोब नाहींसा केल्यास अनर्थ कोसळल्याशिवाय रहाणार नाहीं अशी तो इतरांची समजूत करूं लागतो. परंतु या सर्व दंगलीस कारण झालेल्या गोष्टीचें महत्व काय याची जाणीव फारच थोड्यांना झालेली असते. या खळबळीचें मूळ कशांत आहे याची स्पष्ट कल्पना सहजासहजीं ध्यानांत न आल्याकारणानें 'साप! साप!' म्हणून भुई बडवून उठलेल्या धुरळ्यांत जो तो भर घालीत असतो. अशा वेळीं उठलेल्या धुरळ्यानें आपली दिशाभूल न होऊं देतां प्रचलित खळबळीचें योग्य कारण शोधून काढणें फार अगत्याचें आहे.

सध्यां वाङ्मयक्षेत्रांत अशाच प्रकारची एक सामाजिक लाट महाराष्ट्रांत उठली आहे. 'किर्लोस्कर' मासिकाच्या १९३६ च्या दिवाळी अंकांत आलेली 'अभिसार' या नांवाची लघुकथा या लाटेचें मूळ आहे. अशाच प्रकारची एक खळवळ, दोन वर्षांपूर्वी, बर्ट्रंड रसेलच्या सामाजिक विचारसरणीचा अनुवाद करणाऱ्या एका लेखानें झाली होती. या 'अभिसार' कथेंतील अंबी या नायिकेनें आपलें शील विकून अत्यंत अडचणीची वेळ मारून नेली आहे. या कथेंत असंभवनीय अगर वस्तूचा विपर्यास केलेलें असें कांहीं नाहीं. अडचणींत सांपडलेल्या मनुष्यास, अनपेक्षित अशी गोष्ट नाइलाजास्तव केव्हांकेव्हां करावी लागते. समाजांत त्वेष उत्पन्न करण्याजोगें या कथेंत कांहीं असेल असें सकृद्दर्शनीं वाटत नाहीं. 'बुभुक्षितः किं न करोति पापम्,' म्हणजे पोटाकरितां मनुष्य कोणतेंहि पाप करण्यास मागेंपुढें पहात नाहीं, ही म्हण सर्वतोमुखीं आहे. त्याचप्रमाणें जगांत पैशाच्या अडचणीकरितां माणसानें कोणतें पाप करण्याचें मागें ठेवलें आहे? दहापांच रुपयांच्या दागिन्यांकरितां खुनासारखे भयंकर गुन्हे आपल्या डोळ्यांदेखत होत आहेत; मग इतर नैतिक गुन्ह्यांची गोष्टच बोलावयास नको. केवळ उदरनिर्वाह चालविण्याचें साधन न मिळाल्यामुळें आज लाखों स्त्रिया हीन वेश्यावृत्ति पतकरून आपल्या पोटाची खळगी भरीत आहेत. या धडधडांत उघड गोष्टी आबालवृद्धांस अवगत आहेत परंतु 'अभिसार' या गोष्टींतील नाइलाजास्तव कराव्या लागलेल्या व्यभिचाराची गोष्ट वाचून मन व्यग्र झाल्यामुळें समाजांतील बऱ्याच लोकांच्या मनास एकदम भयंकर धक्के बसूं लागले आहेत; व या गोष्टीमुळें समाजांत अनैतिक गोष्टीला उत्तेजन मिळणार आहे अशी त्यांना भीति वाटत आहे. या भेदरट लोकांस असें वाटत असावें असें दिसतें कीं, या अंबीच्या कृत्याचा

मासिकांतून परिस्फोट होतांच, प्रत्येक स्त्रीस पैसे मिळविण्याच्या नवीन मार्गाचा एक अपूर्व शोध लागल्याप्रमाणें वाटून, त्याचा अवलंब करण्यास ती ताबडतोब प्रवृत्त होईल.

'अभिसार' या गोष्टीच्या मथळ्यावरून लेखकानें तात्पर्य सुचविलें आहे कीं, अबीसारख्या सुशील स्त्रीवर भयंकर सांपत्तिक विषमतेच्या पायीं आपलें शील विकण्याची पाळी आली; या सामाजिक परिस्थितीकडे जनतेचें लक्ष वेधावें. जमल्यास ही परिस्थिति कशी दूर करावी याचा विचार व्हावा; निदान परिस्थितीच्या फेऱ्यांत सांपडलेल्या अबीबद्दल थोडी सहानुभूति उत्पन्न व्हावी. लेखकानें स्पष्ट सूचित केलेलें हें तात्पर्य एक वेळ ध्यानांत न आलें तरी त्याबद्दल या भेदरट लोकांस दोषी ठरविता येणार नाहीं. परंतु ही गोष्ट उघडकीस आणून बायकांना नीतिभ्रष्ट करण्याचा, त्यांना व्यभिचारी बनविण्याचा एक नवीन मार्ग संपादकांनीं दाखवून दिला, व त्यामुळें कुटुंबसंस्थेचा चक्काचूर होणार आहे, असें तात्पर्य या गोष्टीपासून निघतें असें म्हणणे हें खरोखर विकृत डोक्याचें तरी काम असलें पाहिजे, अगर असें म्हटल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं असें कांहीं लोकांस वाटण्याजोगी अनिवार्य ऐतिहासिक परिस्थिति तरी निर्माण झाली असली पाहिजे.

वस्तुस्थितीचा हा विपर्यास विकृत डोक्याचा परिणाम असेल असें वाटत नाहीं. एकटयादुकटयाचें डोकें कांहीं आगंतुक कारणामुळें बिघडूं शकेल; पण समाजांतील एका विशिष्ट वर्गाचें डोकें एकदम बिघडावें अशी रोगाची साथ अद्याप कोणास माहीत नाहीं. निदान दुर्दैवी 'अभिसार' गोष्टीच्या तात्पर्याविषयीं मतभेद झाल्यानें ही खळबळ उडाली असण्याचा संभव अगदीं कमी. इसापनीतींतील गोष्टींचीं अनेक लोक अनेक तात्पर्यें काढतात, पण

त्यामुळें कोण्या वेळीं समाजांत बंडाळी उठल्याचें कधीं ऐकिवांत नाहीं.

परंतु सध्यां पहावें तों ज्या मासिकांत ही गोष्ट प्रसिद्ध झाली आहे, त्या मासिकानें अन्य मार्गानें कितीहि उपकारक कामगिरी करून दाखविली असली तरी त्या मासिकाचा नायनाट करण्याकरितां कारखान्याच्या भागीदारांना, डायरेक्टरांना व संस्थानच्या अधिपतींना उद्युक्त करण्याचा हीन प्रयत्न वेदाभ्यास-जड आर्य संस्कृतीचे आधारस्तंभ म्हणून नांवाजलेले पंडित लोक करूं लागलेले आहेत. नांवाजलेलीं कांहीं वृत्तपत्रें उसनें घेतलेलें सिंहाचें कातडें फेंकून देऊन, उघड्या, प्रतिगामी स्वरूपांत सनातनी कंपूंत सामील होत आहेत. कांहीं योगीबुवांचे प्रचारक विकारावर जय मिळविण्याचें क्षणैक विसरून, सभास्थानीं या मासिकाचे अंक टराटर फाडून आपल्या विकारवशतेचें फाजील प्रदर्शन करीत आहेत; तर कांहीं स्त्रियांच्या सात्विक भावनांना इतके जबरदस्त धक्के बसले आहेत कीं, त्यांनीं ठिकठिकाणीं सभा भरवून ठरावांच्या रूपानें आपली झालेली मानहानि लोकांपुढें मांडली आहे.

या सर्व हकीकतीवरून प्रमाणाबाहेर स्फोट पावलेल्या या दंगलीस एखाद्या मासिकांत आलेली काल्पनिक गोष्ट कारण झाली असेल हें बुद्धीला बिलकुल पटत नाहीं. एखाद्या विवक्षित वर्गाकडून चिडखोर, विसंगत अथवा अयुक्तिक वर्तन एकाएकी होऊं लागल्यास त्याच्या बुडाशीं कांहीतरी समर्पक सामाजिक कारण असलें पाहिजे असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं.

अशा सामान्य कारणांचा तलास लावण्याचा आम्हीं या लेखांत प्रयत्न करणार आहों. या कामीं इतिहासाच्या, समाजशास्त्राच्या आणि मानसशास्त्राच्या अंमळ खोल पाण्यांत शिरावें

All page V. S. [stamp partly legible]



लागेल, याबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे. मनुष्य समाज करून राहूं लागल्यास आज हजारों वर्षें होऊन गेलीं आहेत एवढ्या प्रचंड मर्यादेंत टप्प्याटप्प्यानें त्यानें आपली स्पृहणीय उन्नति करून घेतली आहे. या उन्नतीचा मूळ आधार म्हणजे त्यानें आपल्या नैसर्गिक परिस्थितीवर विजय मिळवून जीं जीवधारणेचीं व उपभोगाचीं सुखसाधनें निर्माण केलीं आहेत, हा आहे. हीं साधनें त्यांस उपलब्ध होणें व त्यांच्या सामाजिक जीवनाची पायरी वर चढणें या गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून घडून आल्या आहेत. ही परंपरा प्रदीर्घ कालापासून जरी चालू आहे, तथापि समाज एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर जाण्याच्या दरम्यान अनेक शतकें समाजाचीं धनोत्पादनाचीं साधनें व त्यावर अवलंबून असलेली समाजरचना हीं जवळजवळ स्थिर स्वरूपांत असतात. या थिजलेल्या स्थितींत समाजांतील वेगवेगळ्या गटांचे परस्परसंबंध अपरिवर्तनीय असल्याचा भास होतो आणि या 'समाजस्थैर्या'च्या कालखंडांत हें स्थैर्य टिकविण्याकरितां अनेक निष्ठा अगर नीतिनियम प्रचारांत येतात व या निष्ठांचा खंबीरपणा व त्यांचा त्रिकालबाधितपणा पटवून देण्याकरितां त्या कालखंडांत अभेद्य दिसणारें तत्त्वज्ञान निर्माण करून तें धर्माच्या प्रभावळींत बसवून देण्यांत येतें. परंतु हें तत्त्वज्ञान व त्यावर अधिष्ठित असलेल्या निष्ठा या स्वयंसिद्ध नसून त्या वेळच्या आधिभौतिक स्थितीचें हें एक आध्यात्मिक प्रतिबिंब असतें. कालचक्रांत निर्माण होणाऱ्या फेरबदलामुळें समाजाची एका पायरीवरून वरच्या पायरीवर चढण्याची तयारी झाली म्हणजे त्या वेळच्या प्रचलित नीतिनिष्ठा व तत्त्वज्ञान हीं अपुरीं पडूं लागतात. त्यांत निभाव लागेनासा होऊन समाजांतील सुखासमाधानानें नांदणाऱ्या घटकांत खटके उघडण्याची पाळी येते. कारण ज्या प्रमाणांत समाजानें जोडलेलें सृष्टिज्ञान हळुहळु न कळत वाढत जातें व

All page-V. Imp



समाजाचीं उत्पादनसाधनें जास्त विपुल व जास्त कार्यक्षम होत जातात, त्याच प्रमाणांत समाजांत एक वेळ दृढ झालेल्या कृत्रिम नीतिनिष्ठा बदलूं शकत नाहींत त्या न बदलण्यानें असा प्रसंग येतो कीं, समाजास वरच्या पायरीवर स्थिर करण्याकरितां ज्या नवीन प्रकारची समाजरचना हवी असते, तशी बनविण्यास जुन्या निष्ठांच्या चौकटींत वाव मिळत नाहीं. नवीन परिस्थितीस अनुसरून कुटुंबसंस्था, समाजसंस्था, राज्यसंस्था यांत सुधारणा घडून येण्याच्याऐवजीं हीं जुनीं तत्त्वें समाजाच्या गळ्यांतील धोंड होऊन बसतात.

परंतु दुःखाची गोष्ट अशी आहे कीं, परिस्थितीप्रमाणें समाजरचना जुळवून आणण्याच्या कामीं समाजांतीलच एका अल्पसंख्याक पण बलिष्ठ वर्गाकडून भयंकर अडथळे आणण्यांत येतात. या जुन्या निष्ठा कायम राहण्यावर समाजांतील या विशिष्ट वर्गाचा हितसंबंध अवलंबित असतो. याच भांडवलावर हा वर्ग सत्ता, संपदा आणि संस्कृति लुबाडून बसलेला असतो. त्यामुळें या निष्ठांच्या स्वरूपांत बदल न व्हावा याबद्दल त्याजकडून पराकाष्ठेची काळजी घेण्यांत येते. हातीं असलेल्या सामाजिक अगर राजकीय सत्तेच्या जोरावर या वर्गाकडून जुन्या निष्ठांच्या संरक्षणार्थ कायदेकानूंचा अगर जबरदस्तीचा अवलंब करण्यांत येतो व त्याच वेळीं विरोधी वर्गाची भल्याबुऱ्या अनेक मार्गांनीं दिशाभूल अगर बुद्धिभेद करण्यांत येतो. जबरदस्तीपेक्षा बुद्धिभेदावर अर्थात् या वर्गाची फार मदार असते. दलितवर्गानें आहे त्या स्थितींतच समाधान मानून रहावें, त्याजवर होणाऱ्या अन्यायाकडे त्याचें लक्ष जाऊं नये व त्याचा प्रतिकार करण्याची बुद्धीच त्यांना होऊं नये, याकरितां त्यांच्या विचारशक्तीचा, बुद्धीचा, अभिमानाचा अगर महत्त्वाकांक्षेचा आ

Add page v. Imp



आपल्यास अनुकूल मार्गानें वहात रहावा याबद्दल वरिष्ठ वर्गानें अत्यंत खबरदारी घेतलेली असते.

या एकंदर विधानाचें प्रत्यंतर इतिहासांत पावलोपावलीं आढळून येण्याजोगें आहे. समाजाच्या प्रगतीस उपकारक अशा अनेक निष्ठा त्या त्या काळीं उत्पन्न होऊन, त्यांस तत्त्वज्ञानाचा आधार कसा मिळत असतो व त्याच निष्ठांचा व तत्त्वज्ञानाचा पुढें कसा दुरुपयोग करण्यांत येतो, हें दाखविण्याचा प्रयत्न केल्यास विस्तार फार होणार आहे. करितां बाकीच्यांचा ओझरता उल्लेख करून त्यांपैकीं हातीं घेतलेल्या विषयास विशेष लागू असलेल्या निष्ठेवरच जास्त भर द्यावा लागणार आहे.

सत्ताधारी साम्राज्यवाद्यांना प्रजेच्या ठायीं आज्ञाधारकपणा उत्पन्न करण्याकरितां फार प्राचीन काळापासून उदात्त तत्त्वज्ञानाचा आधार घेणें क्रमप्राप्तच होतें. 'राजा कालस्य कारणम्,' राजाचा अधिकार ईश्वरापासून प्राप्त झाला आहे, राजाकडून कोणतीहि चूक होणें शक्य नाहीं, राजा हा ईश्वराच्या खालोखाल सर्व गुणांचें अधिष्ठान आहे, राजाज्ञा पाळणें हाच प्रजाधर्म, हेंच राजनिष्ठेचें तत्त्वज्ञान होय.

सत्ताधारी वर्गास सेवकांकडून बिनबोभाट काम करून घेण्यास त्यांच्या मनांत उत्साह असण्याची आवश्यकता होती. त्या कामीं कर्मफल व पुनर्जन्माचें तत्त्व अंगिकारण्यांत आलें. श्रीमंती व गरिबी हीं पूर्वजन्मार्जित फलें आहेत, त्यांस अनुसरून ज्याचें काम त्यानें निष्ठापूर्वक करीत जावें, म्हणजे पुढील जन्मीं संसिद्धीचा लाभ होईल, हेंच स्वामिनिष्ठेला आधारभूत तत्त्वज्ञान होतें.

समाजाच्या धारणेस आणि प्रगतीस कांहीं विशिष्ट श्रमविभागाची गरज असते. यास्तव धर्माच्या आधारावर प्राचीन

ऋषींनीं वर्णाश्रमाची व्यवस्था ठरविली. गुणकर्माप्रमाणें ईश्वरानेंच ह्या वर्णाश्रमधर्म निर्माण केला आहे, स्वधर्मात मरण आलें तरी तें श्रेयस्कर, पण परधर्माचा स्वीकार करूं नये, या तत्वज्ञानावर धर्मनिष्ठेची उभारणी झाली होती.

फार प्राचीन काळापासून स्त्रियांकडे सामाजिक उत्पादनाचें व जबाबदारीचें काम न राहिल्यामुळें घरगुती काम व प्रजोत्पादन हींच त्यांच्या वांटयास आलीं. त्याची योग्य अंजलबजावणी होण्यास स्त्रीनें सर्वस्वीं पुरुषाच्या अंकित राहिल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. अशा काळीं पतिसेवा हाच त्यांचा धर्म, पतीच्या वर्चस्वाखालीं राहणें हेंच त्यांचें कर्तव्यकर्म, याच तत्वज्ञानावर पतिनिष्ठा अधिष्ठित झाली होती.

या अनेक प्रकारच्या निष्ठांत आक्षेपार्ह अगर अंगभूत टाकाऊ असें कांहींच नाहीं. कांहीं विविक्षित ऐतिहासिक परिस्थितींतच या सर्व निष्ठा उत्पन्न होतात व त्या त्या वेळीं त्या उपकारक व समाजपोषक असतात. या सर्व निष्ठाकडून समाजोत्क्रांतीच्या विविक्षित पायरीवर स्थिरता उत्पन्न करून उत्पादनास प्रोत्साहन देण्याची कामगिरी उत्तम रीतीनें पार पडलेली असते. वास्तव या निष्ठांचा सर्वस्वीं निषेधात्मक अगर निंदात्मक उपयोग करतां यावयाचा नाहीं. परंतु मोठ्या आढ्यतेनें श्रेष्ठपणाचा अगर दैवी संदेशाचा आव आणून जेव्हां एक वरिष्ठ पक्ष दुसऱ्या हीन पक्षास या निष्ठा पाळण्यास उपदेश करीत असतो व त्याच क्षणीं त्या निष्ठांच्या पकडींत आपण न सांपडण्याची खबरदारी घेत असतो, त्या वेळीं त्याच्या असें करण्यांत हेतु काय आहे इकडे अवश्य लक्ष द्यावयास पाहिजे. केवळ या निष्ठा वरवर पाहणाऱ्यांस निरपवाद व उदात्त तत्त्वांवर आधारलेल्या आहेत एवढेंच पाहून

चालावयाचें नाहीं. एखादा लबाड बुवा आपल्या भक्तास सांगू लागला कीं, "बेटा ! पैसा व स्त्री हें सर्व आपत्तीचें मूळ आहे. तें टाक माझ्याजवळ देऊन, पैसा माझ्या बँकेंत सुरक्षित ठेवतों व तुझ्या स्त्रीस मोक्षमार्गाचा गुरुपदेश देतों," तर अशा प्रसगीं या निष्ठांचा उपदेश करणारांच्या पोटीं काय हेतु दडून ठेविला आहे. याचा विचार कसोशीनें करावयास नको काय ?

या प्रश्नाचा ऐतिहासिक दृष्टीनें विचार केल्यास असें आढळून येतें कीं, या प्रत्येक निष्ठेचा उत्तरोत्तर दुरुपयोग होत आहे. त्याच्या पांघरुणाखालीं विवक्षित वर्ग दलितवर्गाची लुबाडणूक करून त्यास कह्यांत ठेवीत आहे व हा अंतस्थ हेतु उघड न व्हावा याबद्दल खबरदारी घेत आहे.

प्रजावात्सल्याच्या अगर राजनिष्ठेच्या नांवाखालीं कायदा व सुव्यवस्था हीं खानीं आपल्या हातांत घेऊन प्रजेच्या हातीं अधिकाराचें गूळखोबरें देऊन प्रजेची राजरोस लुबाडणूक कशी करण्यांत येत आहे, याचीं उदाहरणें हिंदी प्रजेला देण्याचें कारण नाहीं.

स्वामिनिष्ठेच्या नांवाखालीं पूर्वीच्या काळीं गुलामांचे धनि अगर कुळाचे (serf) धनि व सध्यांच्या काळीं मोठमोठ्या कारखान्यांचे मालक श्रमजीवि कामगार लोकांस पिळून कशी नफेबाजी करीत असतात या गोष्टीहि आतां सर्वश्रुत झाल्या आहेत.

धर्मनिष्ठेच्या नांवाखालीं उभारलेल्या वर्णाश्रमधर्माचा विचका होऊन आपल्या समाजांत असंख्य जातींची बजबजपुरी कशी माजली आहे व अब्राह्मण व अस्पृश्य लोकांची कुचंबणा व लुबाडणूक अलीकडे किती तीव्र झाली आहे याची जाणीव सध्यांच्या काळीं कोणास नव्यानें करून देण्याची गरज नाहीं.

याचप्रमाणें पातिनिष्ठेंतील बुद्धिभेदाचा उल्लेखहि थोडक्यांत करतां आला असता; परंतु हातीं घेतलेला विषय हा लैंगिक स्वरूपाचा आहे व सध्यां महाराष्ट्रांत उठलेल्या वावटळीचा मध्यबिंदु स्त्रियांचें शील हा आहे. यास्तव या शीलरक्षणाच्या व पातिव्रत्याच्या पडद्याआड कोणते अतस्थ हेतु दडून बसले आहेत हें थोड्या विस्तारानें सांगून हें गुप्त मर्मस्थान उजेडांत आणणें अगत्याचें आहे.

आपल्या समाजांतील बहुतेक वर्गकलह अलीकडील म्हणजे सरंजामशाहीच्या उदयापासून निर्माण झाले आहेत. त्यापैकीं दलितवर्गाची हानी गेल्या शेंदीडशें वर्षांपासून वाढत्या प्रमाणावर होत चाललेली आहे. परंतु स्त्री व पुरुष यांमधील स्पर्धा इतिहासकाळाच्या पूर्वीच जुंपली होती. तरी वैदिककाळीं स्त्रियांचा दर्जा फारसा खालावलेला नव्हता व पुराणकाळींहि त्यांस बराच मान होता. परंतु बौद्धकाळानंतर मनूच्या वेळेपर्यंत स्त्रीचा पूर्ण पराजय होऊन, तिची पराधीनता कळसास पोंचली होती. सामाजिक उत्पादनाचा कोणताहि भाग तिजकडे राहिला नव्हता. सार्वजनिक जबाबदारींतूनहि तिची हकालपट्टी झाली होती. त्यामुळें त्या काळीं पतिनिष्ठा हेंच आपलें सर्वस्व, ही भावना तिला मान्य करावी लागली, व जोपर्यंत सामाजिक जीवनाची पायरी तीच राहिली तोंपर्यंत हजारों वर्षें स्त्रीजीवनांतहि बदल होण्याची पाळी आली नाहीं. परवापरवांपर्यंत आपल्या कुटुंबरचनेकडे पाहिल्यास पतिनिष्ठेच्या ओझ्याखालीं स्त्री ही व्यक्ति आहे का वस्तु आहे, याचीच भ्रांत पडण्याजोगी स्थिति होती.

या कारणास्तव इतर दलितवर्गाला आपल्या लगामीं लावण्याच्या कामीं वरिष्ठ वर्गाला घटपटाच्या लटपटाचें तत्त्वज्ञान

 ... वाचनालय, ...

जसें विणावें लागलें, तसें स्त्रीसंबंधानें पुरुषांस करावें लागलें नाहीं. फारशीं सयुक्तिक कारणें देत बसण्याच्या भानगडींत न पडतां लेखणीच्या एका फटक्यासरशीं मनूनें ठरवून टाकलें कीं, "स्त्री ही अधम आहे; रूप, वय न पाहतां ती वाटेल त्या पुरुषाशीं संगत होते; कितीहि काळजी घेतली तरी ती व्यभिचार करते, म्हणून तिला पारतंत्र्य असावें" (मनु ९-१४-१५). स्त्रीला वेदमंत्राचा अधिकार नाहीं, ब्रह्मचर्याचा अधिकार नाहीं, असा दुसऱ्या शास्त्रकारानें निर्बंध घातला. इसवी सनापूर्वी कित्येक शतकें स्मृतिग्रंथांतून "स्त्रिया रजस्वला होतात, अस्पृश्यापेक्षांहि त्या अपवित्र आहेत, म्हणून स्त्रिया यज्ञयागादि धर्मकर्में करण्यास अपात्र आहेत. धन हें केवळ पारलौकिक हिताकरितां आहे; तेव्हां धर्मकृत्यास अपात्र असलेल्या स्त्रिया धनासहि अपात्र आहेत. त्या पित्याकडून विकल्या जातात, म्हणून पित्याच्या धनावर त्यांची सत्ता नाहीं; त्या भर्त्याकडून विकत घेतल्या जातात, म्हणून पतीच्या धनावर त्यांची सत्ता नाहीं;" असें ठरवून टाकलें. स्त्रीला बंधनांत ठेवतां यावें यासाठीं 'ज्ञानानेंच मोक्ष मिळतो' हा वज्रलेप सिद्धान्तहि बदलून तिला पतिसेवेनें मोक्ष मिळतो अशी खात्री देण्यासहि शास्त्रकारांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं.— "पति हाच त्यांचा स्वामी, त्याचें काम त्यांनीं करावयाचें, तें सोडून त्यांनीं दुसरें कर्तव्य करणें अयोग्य होय."

या सर्व शास्त्रार्थाचा रोख उघडउघड स्त्रियांना परतंत्र करून पुरुषांच्या अनन्य सेवेला बद्ध करण्याचा आहे, हें अल्पवयी पोरासहि सहज कळण्याजोगें आहे.

शास्त्रार्थांची ही सरबत्ती किती झाली तरी लटपटीत विचारसरणीवर उभारलेली, स्त्रियांचें शारीरिक स्वातंत्र्य नष्ट करण्या-

करितां बाहेरून (Objective) लादलेली होती. स्त्रियांसहि मानवी अंत:करण असल्यामुळें या निबंधांतील फोलपणा व कमालीचा अप्पलपोटेपणा केव्हांना केव्हां त्यांच्या नजरेस येण्याचा संभव होता. ही आपत्ति टाळण्याकरितां, बाह्य निबंधानें ज्याप्रमाणें स्त्रियांचे हातपाय जखडून टाकतां आले, त्याप्रमाणें त्यांच्या मानसिक आकांक्षांनाहि गुलाम बनविणें अवश्य होतें. यास्तव पुरुषांविषयीं एकांतिक प्रेम, अपत्यांची हौस, अपत्यपालनापायीं स्वार्थत्याग करण्याची तयारी, सौंदर्याची उपासना, इत्यादि स्त्रियांच्या नैसर्गिक भावनांस कलाटणी देऊन त्या पुरुषवर्चस्वाच्या लगामीं लावण्याचें काम आमच्या पुराणिकांनीं फारच उत्तम रीतीनें पार पाडलें आहे. स्त्रियांचें शील, स्त्रियांचें पातिव्रत्य, स्त्रियांचा भाविकपणा इत्यादींवर रचलेल्या भरमसाट, अतिशयोक्तिपूर्ण अवास्तव दंतकथा, पुराणें, व्रतें, वैकल्यें यांचीं पुराणिकांनीं रेलचेल करून टाकिली. स्त्रियांचें शील इतकें नाजूक बनविण्यांत आलें कीं, कांचेप्रमाणें चुकून एक वेळ त्यास तडा गेला कीं तें कायमचें नष्ट झालें म्हणून समजावें! पुरुषांचें शील मात्र पाण्याच्या पृष्ठभागाप्रमाणें! त्यावर कितीहि रेघोट्या ओढल्या तरी पुन्हा अभंग तें अभंग! पुराणिकांनीं शील व पातिव्रत्य यांसंबंधानें स्त्रियांचीं मनें भारून इतकीं अंतर्मुखी व हळुवार केलीं आहेत कीं, त्यांचें रक्षण करण्याकरितां वाटेल त्या प्रकारची हीन गुलामगिरी, वाटेल त्या प्रकारच्या हालअपेष्टा सोसण्यास, प्रसंगीं आपला देह जाळून घेण्यापर्यंत त्यांच्या मनाची तयारी झाली आहे. शीलरक्षणासंबंधानें इतकी अवास्तव भीति यांच्या मनांत भरवून दिलेली असते कीं, एखादा बॉबगोळा पदरीं बांधावा तशी बिचाऱ्यांची अवस्था झालेली असते. त्या बॉंबला कशाचा केव्हां धक्का लागेल व त्याचा स्फोट होऊन त्यांत आपली राखरांगोळी केव्हां होईल, ही

विवंचना यावज्जन्म त्यांच्या पाठीस लागलेली असते. या भीषण चिंतेच्या माराखालीं स्त्रियांच्या भावनांच्या नैसर्गिक वाढीस विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे. स्त्रियांच्या जीवनांतील निर्भय स्वतंत्र वातावरण नष्ट होऊन, अत्यंत ठिसूळ बनलेल्या आपल्या शीलरक्षणापायीं त्यांना आपला सारा जन्म भयभीत अंतःकरणानें चालवावा लागतो.

V. Imp.

याचा परिणाम असा झाला आहे कीं, स्त्रियांचें सारें लक्ष त्यांच्या बाह्य गुलामगिरीवरून उडून तें त्यांच्या अंतर्यामांत (Subjective ) गुरफटून राहिलेलें आहे. शील भ्रष्ट होण्याच्या विवंचनेंत स्त्रिया इतक्या चूर झालेल्या असतात कीं, हें शील भ्रष्ट करणाऱ्या व्यक्तीकडे, अगर पातिव्रत्यावर हक्क सांगणाऱ्या पतिराजांच्या दुर्वर्तनाकडे ढुंकून बघण्याचीहि त्यांस फुरसत होत नाहीं. तारेवर नाच करणाऱ्या बाईप्रमाणें त्यांचें सारें लक्ष आपलाच तोल संभाळण्याकडे गुंतून राहतें.

'अभिसार' गोष्टींतील अंबीनें परिस्थितीच्या फेऱ्यांत सांपडून आपलें शील विकलें. परंतु या उत्पातास कारण झालेल्या 'बापूरावा'कडे कोणाचेंच लक्ष नाहीं. जसें अंबीनें आपलें शील विकलें तसें बापूरावानेंहि आपलें विकलें. फरक इतकाच कीं, अंबीनें तें पोटच्या गोळ्याचा जीव वांचविण्याकरितां विकलें, तर बापूरावानें तें क्षणैक सौख्याकरितां विकलें. यांत अंबीपेक्षां सहस्र पटीनें बापूराव अपराधी आहे. असें असून अंबीची ही करुण कहाणी वाचून श्री. वहिनीसाहेबांसारख्या स्त्रियांना व स्त्रियांच्या शीलरक्षणाकरितां झुरणाऱ्या त्यांच्या पाठीराख्यांना भयंकर धक्के बसले. परंतु चमत्कार असा आहे कीं, बापूरावाच्या पाशवी वृत्ती-बद्दल यांपैकीं कोणासच संताप न येतां बिचाऱ्या अंबीसच सर्वांनीं

दोषी धरलें आहे. इतकेंच नव्हे तर, हें प्रकरण चव्हाट्यावर आणल्याबद्दल मासिकाच्या संपादकावर इतका गहजब करण्यांत आला कीं, त्याला आपली बाजू संभाळण्याकरितां सोळा पानांचें उत्तर लिहावें लागलें. एखाद्याच्या घरीं चोरी व्हावी व चोरास खुशाल मोकळें सोडून घराच्या मालकास व चोरीचा पत्ता लावणाऱ्यास गुन्हेगाराच्या पिंजऱ्यांत उभें करावें असें हें झालें. चोरास सोडून संन्याशास बळी दिल्याचाच हा प्रकार !

असा विपरीत परिणाम होण्याचें कारण उघड आहे. 'अभिसार' या कथेंत अबोच्या शीलभंगाचें भूत उभें करून समाजास भेवडाविण्यांत आल्यानें या गडबडींत बापूराव अजिबात निसटून गेला. भुतानें पछाडलेल्या स्थितीत बापूरावाच्या दुर्वर्तनाची चीड येण्याची आठवण कोणासच राहिली नाहीं ! मग त्याचें पारिपत्य करण्याची बद्धि होणें तर दूरच राहिलें ! ही बुद्धि होण्याच्या अगोदरच, स्त्रियांची परवशता कायम ठेवण्यास सोकावलेल्या वर्गा-कडून एकच गिल्ला करण्यांत आला कीं, "धर्म बुडाला ! स्त्रिया व्यभिचारी होऊं लागल्या ! कुटुंबसंस्था रसातळास चालली !!" या हाकाटींतच भुतानें पछाडलेल्या श्री. वहिनीसाहेबांसारख्या स्त्रियाहि सामील झाल्या. दिशाभूल करणाऱ्या सनातन्यांचा हा अत्यंत कावेबाज धूर्तपणा आहे. स्त्रियांचा प्रज्ञानाश सर्वांत मोठ्या प्रमाणांत कशानें झाला असेल तर तो अशा फसगतींत सांपडल्या-मुळेंच होय.

येथवर सादर केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या हें ध्यानांत आलें असेल कीं, 'अभिसार' या गोष्टीमुळें उठलेलें वादळ 'किर्लोस्कर' मासिकाचे व्यक्तिशः संपादक आणि एका संस्थाना-धिपतींची व्यक्तिशः स्नुषा यांच्यांत माजलेला वाद नसून, दोन परस्परहितविरोधी वर्गांमधील युद्धामुळें उठलेला धुरळा आहे.

अनिवार्य परिस्थितींत कोंडमारा झालेल्या एका वर्गास, ही कोंडी फोडून मोकळ्या हवेंत न येऊ देण्याचा हा कुटिल प्रयत्न आहे. हे दोन पक्ष कोणते हें आतांपर्यंत वाचकांच्या सहज लक्षांत आलें असेल. त्यांपैकीं एक पक्ष स्त्रीवर्ग हा आहे. हजारों वर्षांपासून चालत आलेल्या त्यांच्या परिस्थितींत व सध्यांच्या परिस्थितींत जमीन-अस्मानाचें अंतर पडत आहे. हें अंतर गेल्या शंपन्नास वर्षांत सहज डोळ्यांत भरण्याजोगें ढळढळीत झालें आहे या दोनहि परिस्थितींची मांडणी शेजारीं शेजारीं केल्यास त्यांतील आमूलाग्र भेद कोणाच्याहि सहज लक्षांत येण्याजोगा आहे.

पूर्वींच्या काळीं हिंदुकुटुंबव्यवस्थेंत स्त्रीची भूमिका निश्चित करणाऱ्या मूलभूत समजुती आणि संस्था खाली दिल्या-प्रमाणें असत—

(१) स्त्रियांस स्वतंत्र उपजीविकेचा रोजगार नाहीं.

(२) त्यांस इतर रीतीनें धनसंचय करण्याचा अधिकार नाहीं.

(३) सर्व गृहकृत्यांचे काबाडकष्ट व जोखीम त्यांजवरच.

(४) त्यांस घराबाहेरील कोणतीहि उठाठेव करण्याचें कारण नाहीं.

(५) कथापुराणांशिवाय त्यांस दुसऱ्या शिक्षणाची जरूर नाहीं.

(६) मालमत्तेवर पुरुषांची मालकी.

(७) संततीचें पितृपद निस्संदिग्ध सिद्ध करण्याकरितां पुरुष घालतील त्या अटी स्त्रीनें मान्य कराव्या.

(८) पुरुषांस अनेक स्त्रिया करण्याची व रखेल्या ठेवण्याची सवड असावी.

(९) स्त्रियांना शोभणारे विशेष गुण म्हणजे, विनय, भाविक-

पणा, मार्दव, नाजुकपणा, मर्यादशीलता, भित्रेपणा, बुजरटपणा हे होत.

या जुन्या कुटुंबव्यवस्थेच्या जोडीस आधुनिक स्त्रियांनीं सध्यांच्या परिस्थितीस धरून पसंत केलेली विचारसरणी व व्यवस्था मांडल्यास असें आढळून येईल कीं, गेल्या पन्नाससाठ वर्षांतच या प्रत्येक बाबीचें मूल्य ओळख न पटण्याइतकें बदलून गेलें आहे. सध्यांची परिस्थिति अशी आहे.

( १ ) गेल्या पंधरावीस वर्षांतच हजारों स्त्रियांनीं उच्च शिक्षण संपादिलें असून, त्या स्वतंत्र रीतीनें धनोत्पादनांत भाग घेत आहेत. खालच्या वर्गांतील लाखों स्त्रिया मोठमोठ्या कारखान्यांत स्वतंत्रपणें पोटास मिळवीत आहेत.

( २ ) स्वतंत्र मिळविलेल्या धनावर व वडिलोपार्जित अगर पतीच्या इस्टेटीवर त्या आपल्या हक्क सांगूं लागल्या आहेत.

( ३ ) समाजांतील एक आर्थिक व राजकीय घटक या नात्यानें त्या विचार करूं लागल्या आहेत.

( ४ ) स्त्रीशिक्षणाची प्रगति इतकी झाली आहे कीं, मध्यम वर्गांतील स्त्रिया आतां क्वचितच अशिक्षित राहिल्या आहेत.

( ५ ) त्यांनीं घटस्फोटाचा अधिकार मिळविण्याचा प्रयत्न चालविला आहे.

( ६ ) सध्यांच्या शिक्षित स्त्रीस सनातनी दृष्टीनें शोभणारे कोणतेच गुण पसंत नाहींत. त्याऐवजीं काटकपणा, धैर्य, समाधीटपणा, निर्भीडपणा, विचारस्वातंत्र्य, संततिनियमन, सार्वजनिक जबाबदारीची हौस, प्रत्येक उत्पादनक्रियेंत भाग घेण्याची धमक, या गुणांची त्यांस गोडी लागत चालली आहे.

वाचनालय सातारा
१५७५१
१७ आक्र. २२८

अशा दक्षिणोत्तर ध्रुवांइतकें अंतर पडलेल्या परिस्थितींत, पूर्वीचा वैवाहिक स्थैर्याचा व कुटुंबरचनेचा पाया बदलणें अपरिहार्य आहे. शीलरक्षणाचा बागुलबुवा उभारून त्याच्या पडद्याआड आपली माणुसकी गमाविण्यास अलीकडील स्त्रिया कधींहि तयार होणार नाहींत.

पातिव्रत्याच्या एकांगी कल्पनेच्या ठिकाणीं, स्त्रीपुरुषांच्या वैयक्तिक व बरोबरीच्या प्रेमाचीं व परस्परांना बंधनकारक नियंत्रणें दोघांना सारखींच असलीं पाहिजेत, अशी मागणी स्त्रियांकडून होणें अपरिहार्य व योग्य आहे. अशा प्रकारच्या प्रेमाला पूर्वीच्या समाजधारणेंत जागाच नव्हती. 'सिंधू'चें पातिव्रत्य व आधुनिक स्त्री-पुरुष-प्रेम यांत कांहींच साम्य उरलें नाही. एक अंधभक्ति आहे, तर दुसरी विशिष्ट प्रकारची जोडीदारी ( Companionship ) आहे. एकांत आवडीनिवडीचा प्रश्नच नाहीं. तर दुसरा अशा आवडीनिवडीवरच अधिष्ठित आहे. एकाचें स्थैर्य धार्मिक बंधनांनीं लादलेलें असतें, तर दुसऱ्याचें स्वेच्छेनें निर्माण होतें. वैवाहिक संबंधाचें गांभीर्य, त्याची जबाबदारी, त्याची आदरणीयता एकाला धर्मविहित मंत्रांनीं जाणवते, तर दुसऱ्याला प्रेमानें व सुप्रजाजननाच्या सामाजिक जबाबदारीनें पटलेली असते. एक सर्वस्वीं लुलें व परोपजीवि जिणें आहे; तर दुसरें निर्भय, स्वतंत्र वातावरणांत वावरणारें आहे.

या दोन चित्रांपैकीं एक समाजास आहे त्या स्थितींत जखडून टाकणारें आहे, तर दुसरें इष्ट अशा वरच्या पायरीवर नेणारें आहे. या दोन चित्रांपैकीं कोणत्या चित्राची निवड करावी असा प्रश्न आल्यास श्री. वहिनीसाहेबांसारख्या सुविद्य विदुषीची प्रांजल बुद्धीनें केलेली निवड कोणत्या बाजूनें होईल हें सांगणें फारसें कठीण नाहीं.

असो. येथवर सध्यां आपल्या समाजांत उठलेल्या खळबळीचें सत्य स्वरूप काय आहे, खोटें आकांडतांडव करणाऱ्या सनातन्यांचा

विवाहसंस्थेचा इतिहास / डॉ. किर्लोस्कर ताका.

मर्मभेद कोठें आहे, याबद्दल आमचे विचार आम्ही वाचकांपुढें मांडले आहेत. त्यांत आमच्यावर एक असा गंभीर आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, "आम्हांस राजनिष्ठा, स्वामिनिष्ठा, धर्मनिष्ठा अगर पतिनिष्ठा यांपैकीं कोणत्याच निष्ठा पसंत नाहींत त्या सर्व निष्ठा समाजघातकी असे आम्ही मानतों. त्या सर्व नष्ट करण्याचा आम्हीं विडा उचलला आहे." यावर आमचें उत्तर असें आहे–

या सर्व निष्ठा परिस्थितिनिरपेक्ष नाहींत. विशिष्ट परिस्थितींत त्या सर्व समाजोन्नतीस उपकारक व त्या वेळेपुरतें ' स्थैर्य उत्पन्न करण्यास आवश्यक होत्या. परंतु या लेखाच्या द्वारें आम्हांस प्रामुख्यानें जें दाखवावयाचें होतें तें हेंच कीं, सध्यांच्या काळीं या सर्व निष्ठांचें मूल्य पार बदलून गेले आहे. अशा वेळीं जुन्या निष्ठांचा फाजील लोभ न बाळगितां, समाजास वरच्या पायरीवर नेणाऱ्या नवीन निष्ठांच्या प्राणप्रतिष्ठेचा प्रामाणिक प्रयत्न झाला पाहिजे. परंतु प्रथमतः मतलबी वर्गाकडून अशा प्रयत्नास हाणून पाडण्याकरितां ज्या कावेबाज मार्गांचा अवलंब करण्यांत येतो त्यांचा दंभस्फोट करणें अत्यंत अगत्याचें काम आहे.

ज्याप्रमाणें प्लेगजंतूंनीं दूषित झालेले कपडे सूर्याच्या स्वच्छ प्रकाशांत टाकल्यानें त्यांतील दोष नाहींसा होतो; अगर ज्याप्रमाणें मनोविकार दाबून ठेवण्यानें होणारा भूतोन्माद रोग ( Hysteria) मनोविश्लेषणाच्या ( psycho-analysis ) प्रयोगानें बरा होतो, त्याप्रमाणें गुप्त रीतीनें क्रिया करीत राहणाऱ्या समाजघातकी प्रतिगामी धोरणांचें योग्य आविष्करण करून त्यांचीं मर्मस्थानें चव्हाट्यावर आणल्यानें हा सामाजिक रोगहि नाहींसा करण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत